
CMYK

आज निजानंदमग्नदिन



अक्कलकोट निवासी
श्री स्वामी समर्थ

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

विनम्र अभिवादन



राजर्षी छत्रपती शाहू महाराज
यांची आज पुण्यतिथी

सोलापूर | सोमवार, ६ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अयोध्येला भेट दिली आणि राम मंदिरात जाऊन रामललाचे दर्शन घेत, आरतीही केली. यावेळी मोदी यांनी रामललापुढे साष्टांग दंडवत घातले. त्यानंतर त्यांनी सुग्रीव किला ते लता मंगेशकर चौक असा रोड शो केला

# 'विठ्ठल'सह 'अभिजित'च्या 'पुनर्वसना'ची जबाबदारी माझी

## उपमुख्यमंत्री फडणवीस : कारखान्यावरील सभेत विठ्ठल परिवारास दिला शब्द

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे-**

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या राजवाड्याला पुन्हा गतवैभव प्रात करून देण्याचे अश्वासन देत अभिजित पाटलांचेही पुनर्वसन करण्याची जबाबदारी मी घेतली आहे. यापुढे कोणाचे ऑपरेशन करायचे हे मला चांगले माहिती आहे. ते लवकरच करु अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठल सहकारी कारखान्यावर केली.ते रणजितसिंह निंबाळकर व राम सातपुते यांना पाठिंबा देण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर रणजितसिंह नाईक निंबाळकर, राम सातपुते, आ.महादेव जानकर, आ.शहाजी पाटील, शिवाजी सांवत, स्वेरीचे प्राचार्य बी.पी रोंगे याच्या सह संचालक मंडळ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील महत्त्वाच्या लोकसभा मतदारसंघातील लढतींपैकी माढा व सोलापूर लोकसभा मतदारसंघाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. माढ्यात धैर्यशील मोहिते पाटलांनी ऐनवेळी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर माढ्यात अनेक नवनवीन ट्विस्ट पाहायला मिळाले. त्यातच, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी भाजपाच्या उमेदवारांना पाठिंबा दिल्याने राजकीय गणितं आणखी बिघडली आहेत.यावेळी अभिजीत पाटील यांनी माढा लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर आणि सोलापूर लोकसभेचे उमेदवार राम सातपुते यांना जाहीर पाठिंबा दिल.या दोन्ही उमेदवारांना निवडून आणण्यासाठी आम्ही मोठ्या ताकदीने प्रयत्न करणार असल्याचे अभिजीत पाटील म्हणाले.

**बाज की असली उडान अभी बाकी है,**
**तुम्हारे इरादों का इम्तिहान अभी बाकी है,**
**अभी तो नापी है मुठ्ठीभर जमीन तुमने,**
**अभी पुरा आसमान बाकी है...!**

अशी शायरी म्हणत फडणवीसांनी भाषणाची सुरुवात केली.ते पुढे म्हणाले की,महाराष्ट्रात कुठेही बंद पडलेला कारखाना घ्यायचा आणि तो ३५-४० दिवसांत सुरू करायचा, अशी किमया पाटील यांना जमली आहे.अभिजीत पाटील सहकार क्षेत्रात राहिले म्हणून, जर ते खासगी क्षेत्रात गेले असते तर.. आम्हालाही वाटलं असतं आमचा एक मराठी माणूस अदानी-अंबानी झाला, अशा शब्दात फडणवीसांनी अभिजीत पाटलांचं कौतुक केले. विठ्ठल परिवाराचे प्रमुख तुम्ही आहात, पण हा परिवार मी दत्तक घेतोय, या कारखान्याची संपत्ती मला नकोय. केवळ, तुम्ही मला प्रेम द्या. तसेच, पाटील तुम्ही कितीही मेहनत केली, तरी कंबर मोडेन पण यातून बाहेर पडता येणार नाही. यासाठी वेगळंच ऑपरेशन करावे लागेल. ते ऑपरेशन कसे करायचे हे मला आणि तुम्हाला माहितीय, पुढील ३ ते ४ महिन्यात सरकारकडून या कारखान्याच्या पुनर्वसनाचं काम करू, ही जबाबदारी आता तुमच्यासोबत मी घेतलीय, असा शब्दच फडणवीसांनी येथील जाहीर सभेतून दिला.



### उजनीच्या पाण्याचे नियोजन करणे गरजेचे

उजनीच्या पाण्याचे नियोजन करणं गरजेचं आहे. ते जरा मागे पुढे झाले आहे. त्यामध्ये आपण लक्ष घालावं ,पंढरपूरला विमानतळ झालं पाहिजे, लाईटचा प्रश्न मिटला पाहिजे. पाण्याचा प्रश्न मिटला पाहिजे. साखरेच्या निर्यातीवर असणारी बंधने उठली पाहिजे. ती बंदी उठली आणि साखरेचे दर वाढले तर शेतकऱ्यांच्या ऊसाला ५००० रुपयांचा दर देणं शक्य होणार असून यंदाच्या गळीत हंगामात तीन हजार दर दिला आहे. पुढच्या वेळेस साडेतीन हजार दर आम्ही देऊ ,आमच्या कारखान्याला मदत झाली पाहिजे ही आमची भूमिका होती. असे अभिजीत पाटील म्हणाले.

# तिसऱ्या टप्प्यातील प्रचार संपला

## सोलापुरातही आरोप-प्रत्यारोपांची स्पर्धा थांबली

**वृत्तसंस्था,**

१२ राज्यांतील ९५ जागांसाठी तिसऱ्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारतोफा आज थंडावल्या. या मतदारसंघांमध्ये ७ मे रोजी मतदान होणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात गुजरातमधील २५, कर्नाटकमधील १४, महाराष्ट्रातील ११, उत्तर प्रदेशातील १०, मध्यप्रदेश ९, छत्तीसगड ७, बिहार ५, बंगाल आणि आसामातील प्रत्येकी ४, दीवदमणच्या २ तर जम्मू-काश्मिरातील एका जागेवर मतदान होणार आहे. ९५ मतदारसंघात १,३५१ उमेदवार रिंगणात आहेत. गृहमंत्री अमित शाह, नागरी उड्डयण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया, एमएसएमई मंत्री नारायण राणे यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांचे भाग्य ईव्हीएमध्ये बंद होणार आहे. गुजरातमध्ये लोकसभेच्या २६ जागा आहेत, यापैकी सुरतमध्ये भाजपा उमेदवार अविरोध विजयी झाल्यामुळे उर्वरित २५ जागांवर ७ मेला एका टप्प्यात मतदान होणार आहे. देशात आतापर्यंत दोन टप्प्यात लोकसभेच्या १९० जागांसाठी मतदान झाले आहे. लोकसभा निवडणूक देशात सात टप्प्यात होणार असून, मतमोजणी ४ जूनला होणार आहे.

सोलापुरात गेल्या १५ दिवसांपासून प्रचारादरम्यान मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप सुरू होते. प्रचार थांबल्यामुळे ही स्पर्धा देखील संपली आहे.

### महाराष्ट्रातील ११ मतदारसंघ

तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. यात माढा, सांगली, सातारा, लातूर, रायगड, बारामती, कोल्हापूर, उस्मानाबाद, हातकणंगले आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गचा समावेश आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे (रत्नागिरी-सिंधुदुर्ग), सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार (बारामती) हे राज्यातील प्रमुख उमेदवार आहेत. अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे

# हिंदुत्ववादी नेत्यांच्या हत्येचा कट उधळला, मौलवीला अटक

**सुरत, ५ मे**

सुरत पोलिसांनी एका मौलवीला अटक करीत हिंदुत्ववादी नेत्यांच्या कट उधळला आहे. या नेत्यांच्या हत्येसाठी कित्येक देशांमधून शस्त्रास्त्रांची तस्करी करण्याचा प्रयत्नही करण्यात आला. अटक करण्यात आलेला मौलवी पाकिस्तान आणि बांगलादेशातील अनेकांच्या संपर्कात होता.

सोहेल असे या मौलवीचे नाव आहे. तो मदरशाचा शिक्षक आहे. मागील दोन वर्षांपासून तो पाकिस्तानातील डोंगर आणि नेपाळमधील सहनाज नावाच्या व्यक्तींच्या संपर्कात होता. भारतातील हिंदू संघटना मोहम्मद पैगंबरांचा अपमान करीत असल्याची तसेच त्यांना वठणीवर



आणण्याची गरज असल्याची चिथावणी पाकिस्तानातील डोंगर आणि नेपाळमधील सहनाज सोहेलला देत होते. त्यासाठी या दोघांनी लाओस देशाचे सिमकार्डही सोहेलला उपलब्ध करून दिले होते. त्याची ओळख जाहीर होऊ नये, हा त्या मागील उद्देश होता.

**टी. राजासिंह, नूपुर शर्मा होते लक्ष्य**

हैदराबादेतील भाजपाचे नेते टी. राजासिंह, हिंदुत्ववादी नेते उपदेश राणा, नूपुर शर्मा, सुदर्शन वाहिनीचे प्रमुख सुरेश चव्हाण यांच्या हत्येचा कट रचण्यात आला होता. सोहेलच्या व्हॉट्सॲप चॅटप्रमाणे सुरतमध्ये उपदेश राणा यांच्या हत्येसह हे हत्यासरत्र सुरू केले जाणार होते.

### देशातील वातावरण बिघडवण्याचा होता कट

निवडणुकीपूर्वी हत्या घडवून देशातील वातावरण बिघडवण्याचा कट सोहेलने रचल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यासाठी लवकरात लवकर हत्यांचे सत्र सुरू करण्याच्या प्रयत्नात तो होता. त्याला लवकरच पाकिस्तानातून शस्त्रे मिळणार होती. पण, त्यापूर्वीच पोलिसांनी त्याला अटक केली.



www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### असून... नसून... सून!!!



**निवडणुकीत** 'मुद्दा' हा महत्त्वाचा असतो. तुम्ही कोणत्या मुद्यावर निवडणूक लढवता, याकडे जनतेचे लक्ष असणारच. त्यामुळे प्रत्येक पक्ष (आजकालच्या ट्रेंडनुसार 'आघाडी') आपला मुद्दा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरत असतो. दोन वेळा सत्तेत राहिलेल्या मोदी सरकारने विकासाचा मुद्दा घेऊन २०२४ ची निवडणूक लढविण्याचे ठरविले. तसे विरोधकांनी आपआपल्या परीने मुद्दे वेगवेगळे असले तरी शेवटी मोदीविरोध हाच मुद्दा लावून धरला आहे. असे असले तरी, क्षेत्रीय स्तरावर प्रत्येक पक्षाचा वेगळा अजेंडा असतोच. बरेचदा एकमेकांवर आगपाखड करता करता हे पक्ष आपल्या प्रतिस्पर्ध्याला मुद्दा देऊन जातात.

अगदी सुरुवातीला लालू यादव म्हणाले की, मोदींना स्वत:चा परिवार आहेच कुठे? असे म्हणताच मोदींच्या महापरिवारात इतके लोक जोडले गेले की, विरोधकांना स्वत:च्याच जाळ्यात अडकल्यासारखे वाटले असावे. आता हीच गत शरद पवार आणि त्यांची सुकन्या सुप्रिया सुळे यांची झाली आहे. मुलीच्या विरोधात सूनबाई सुनेत्रा पवार उभ्या ठाकल्याने पवारांनी सहाजिकच मुलीची बाजू उचलून धरली. सून काय दुसऱ्या घरची मुलगी, असे म्हणत 'सुजाण' आणि 'परम अनुभवी' म्हणवल्या जाणाऱ्या शरद पवारांनी स्वत:चीच गोची करून घेतली म्हणायची.

आपली संस्कृती इतकी उदात्त आहे की, दुसऱ्या कुळातील मुलीला आपल्या कुळात घेऊन तिला गृहलक्ष्मीचा मान दिला जातो. लग्नविधींमध्ये सिमांत पूजनाला सासू-सासरे जसे जावयचे पाय धुतात तसेच भावी सुनेचेही पाय धुतले जातात. लक्ष्मी म्हणून तिला मान देण्याची ही परंपरा आहे. विशेष म्हणजे, लग्नविधीतील पाठवणीच्या आधीचा विधी म्हणजे 'झाल'. यात वर-वधुच्या कुळातील सर्व लोक समोरासमोर बसतात आणि या कुळातील लोक आपली लेक समोरच्यांच्या कुळात देतात. तेव्हा मोठी परडी (जी मुलीच्या जबाबदारीचे प्रतीक असते) मुलाच्या कुटुंबीयांच्या डोक्यावर ठेवली जाते. कदाचित पवारांकडे अजित दादांच्या लग्नात हा विधी झालाच नसावा. म्हणूनच तर लग्नाला ३५ वर्षांपेक्षा जास्त काळ उलटलेल्या सुनेत्राताईंना पवारांनी अजूनही सून म्हणून स्वीकारलेले नाही. याचा त्रास त्या सुनेच्या मनाला होतच असावा, पण पवारांनी मात्र बोलून नसते दुखणे ओढवून घेतले आहे. आता सारेच त्यांच्यावर तुटून पडले आहेत. का हो सून परकी कशी, असा सवाल केवळ विरोधी पक्षातील चित्राताई वाघच नव्हे, तर त्यांच्या पक्षातील काही बायकाही आपसात कुजबूजत विचारताना दिसतात.

मुलगी तर लाडकी असतेच हो... यात दुमत नाही. मात्र, सून दोडकी करून कसे चालणार? बरे झाले, पवार कुटुंबीयांच्या चुली वेगळ्या आहेत आणि अजितदादा-सुनेत्राताई कुटुंब वत्सल आहेत, नाहीतर प्रचार सभेत असे बोलल्यानंतर पवारांना घरात जे सहन करावे लागले असते, त्याच्या समोर त्यांचे राष्ट्रपती, पंतप्रधान न होण्याचे दु:ख फारच छोटे वाटले असते.

पवारांना आता निवडणूक उलटल्यानंतरही याविषयी टोमणे ऐकावे लागणार, हे नक्की. मुळात, आज सून आणि मुलगी यात भेद करण्याचा काळच राहिलेला नाही. सुनेची अवहेलना करून चालत नाही आणि मुलीलाही तिचा संपत्तीतील वाटा द्यावाच लागतो. असे असताना शरद पवारांसारख्या दिग्गज नेत्याने स्वत:विरुद्ध बोलायला इतका मोठा मुद्दा देणे म्हणजे ऐन युद्धाआधी कर्णाने आपले कवच-कुंडल दान देण्यासारखे आहे. आता भोगा परिणाम...सांगता कोणाला?


# नड्डा, मालवीय यांच्याविरोधात काँग्रेसची आयोगाकडे तक्रार

◆ **नवी दिल्ली, ५ मे**

भाजपाने आपल्या समाज माध्यम खात्यावर एक चित्रफीत टाकत अनुसूचित जाती आणि जमातीच्या विशिष्ट उमेदवाराला मतदान न करण्याबाबत सांगितल्याचा आरोप करीत काँग्रेसने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, माध्यम प्रभारी अमित मालवीय आणि कर्नाटकमधील भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र यांच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

याबाबत काँग्रेसचे मीडिया प्रभारी रमेश बाबू यांनी सांगितले की, भाजपाने समाज माध्यम मंचावर एक चित्रफीत प्रसारित केली. यात एससी, एसटी समाजाविरुद्ध द्वेष पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. या व्हिडीओचा उद्देश लोकांमध्ये शत्रुत्वाची भावना वाढवणे आणि एससी, एसटी समाजाविरुद्ध द्वेष पसरवण्याचा आहे. हा व्हिडीओ आचारसंहितेचा भंग करणारा आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे एका विशिष्ट धर्माचे समर्थन करणारे आणि एससी, एसटी समाजाचे शोषण करणारे असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कर्नाटक भाजपाच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर एक चित्रफीत शेअर करण्यात आली, ज्यात राहुल गांधी आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या ॲनिमेटेड पात्रांच्या रूपात दाखवले आहेत. पक्ष्यांच्या घरट्यात एससी, एसटी आणि ओबीसी नावाची अंडी ठेवल्याचे दिसत आहे. पण, राहुल गांधी त्यात मुस्लिम नावाची अंडी घालतात. मुस्लिम नावाची पिलं अंड्यातून बाहेर पडल्यावर ती इतर तीन पिलांपेक्षा खूप मोठी दिसतात. त्यानंतर ते सर्व निधी एकटेच खातात आणि उरलेली पिले घरट्यातून बाहेर फेकून देतात. ◂(वृत्तसंस्था)



सातारा येथे रविवारी भाजपाचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नेते मंडळी

# निकालानंतर देशाचे नेतृत्व बदलणार : शरद पवार

## ४०० पार जाणार नाही, जनतेत मोदींची दहशत

◆ **पुणे, ५ मे**

भाजपाने '४०० पार'चा कितीही प्रचार केला, तरी त्यांना तितक्या जागा मिळणार नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालात वेगळे चित्र पाहायला मिळेल. निकालानंतर देशाचे नेतृत्व बदलणार आहे. जनतेच्या मनात मोदी नसून, त्यांच्याबद्दल दहशत असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली.

दौंड येथे प्रचारसभेला संबोधित करताना पवार म्हणाले, माझी खात्री आहे की, सध्या लोक गप्प आहेत. कारण, लोकांमध्ये मोदींची दहशत आहे. त्यामुळे लोक कोणतीही प्रतिक्रिया देताना दिसत नाही. पण, लोक मतदानातून उत्तर सडेतोड उत्तर देतील.

भारतात २००४ मध्ये भाजपाने 'शायनिंग इंडिया' मोहिमेतंर्गत लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू केला होता. या निवडणुकीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखालील भाजपा विजय होईल, अशी खात्री अनेकांना होती. मात्र, तेव्हा माझे मत वेगळे होते. अखेर लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आला, तेव्हा माझे मत खरे ठरले होते. यावेळी सुद्धा तसेच होणार असून, मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा कितीही आटापिटा केला, तरी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागेल, असे भाकीत पवारांनी केले.

### सत्ता जाण्याच्या भीतीने करतात आरोप

» पवार म्हणाले, मोदींना जे साध्य करायचे आहे, ते साध्य करण्याची स्थिती सध्या नाही. लोकांचा पाठिंबा घसरतो आणि जेव्हा सत्ता आपल्या हातातून जाईल, अशी स्थिती निर्माण होते, तेव्हा टोकाची भूमिका घेतली जाते. अशावेळी संबंधित व्यक्तीचे स्वत:वर नियंत्रण राहत नाही. हे नियंत्रण सुटल्यामुळे पंतप्रधानपदाची गरिमा ठेवण्याचे स्मरणही मोदींना होत नाही. त्यामुळे ते वाट्टेल तसे आरोप करीत सुटले आहेत.

### दहा वर्षांत एकही पत्रपरिषद का नाही?

मोदी यांची पद्धत पाहता ते जनमानसासमोर आपण केलेले काम मांडण्यासाठी पुढाकार घेत नाही. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना वर्षातून एकदा प्रसारमाध्यमांशी बोलून आपण काय निर्णय घेतले, याची माहिती देत होते. पण, मोदींनी १० वर्षांमध्ये एकदाही पत्रपरिषद का घेतली नाही, असा सवाल पवार यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

# देशाच्या विकासासाठी मोदींशिवाय पर्याय नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

◆ **सातारा, ५ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वैश्विक नेतृत्व आहे. सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याची आणि देशाचा विकास करण्याची ताकद आजच्या घडीला मोदींशिवाय इतर कुठल्याही नेत्यात नाही. मोदींसारख्या जागतिक नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी उदयनराजेंना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वाई येथे रविवारी प्रचारसभेला संबोधित करताना फडणवीस म्हणाले, लोकांना वेगवेगळ्या गोष्टी सांगून फसवणारे शरद पवार कोल्हापुरात शाहू महाराजांना बिनविरोध करण्याची भाषा करतात. या नेत्याने साताऱ्यात दुटप्पीपणा दाखवला आहे. शौचालयात पैसे खाणाऱ्या उमेदवाराला उदयनराजेंच्या विरोधात सातारा लोकसभेची उमेदवारी दिली, त्याची पिपाणी केल्याशिवाय उदयनराजे थांबणार नाही. सत्ता होती तेव्हा जनतेला वाऱ्यावर सोडलेल्या नेत्याने मोदींना ऊसातले काय कळते, अशी टिंगल केली होती. त्याच मोदींनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या साखर कारखान्यांवर असलेला आयकर रद्द करून शेतकऱ्यांची सुटका केली. मोदींना समजले ते तुम्हाला समजले नाही.

जनतेच्या मनातील स्पंदन, रुदन हे मोदींना थेट समजते. मोदी यांना विरोध करणारे राहुल गांधी आणि शरद पवार केवळ तोंडाच्या वाफा दौडवतात, त्यांना जनतेच्या समस्यांची जाणीव नाही. ◂(वृत्तसंस्था)

### विरोधकांच्या गाडीला फक्त इंजिन, डबे गायब

» फडणवीस विरोधकांवर टीका करताना म्हणाले, महायुतीची गाडी ही सर्वसामान्यांना बरोबर घेऊन जाणारी आहे. मात्र, विरोधकांच्या गाडीला फक्त इंजिन आहे, डबेच नाहीत. राहुल गांधींच्या इंजिनात फक्त सोनिया आणि प्रियांकांची जागा आहे. शरद पवारांच्या इंजिनात सुप्रिया सुळेंशिवाय कोणी नाही आणि उद्धव ठाकरेंच्या इंजिनात आदित्यशिवाय कोणीही नाही. ते तुम्हाला कुठेही जागा देऊ शकत नाहीत आणि तुमचा विकास करू शकत नाहीत.



आसामच्या कामरूप जिल्ह्यात अपक्ष उमेदवार डुलू अहमदच्या प्रचारासाठी रोड शो करताना अभिनेत्री मंदाकिनी आणि अन्य सेलिब्रिटी

# निवडणुकीनंतर मशालीची होणार चिलीम

## मुख्यमंत्री शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

◆ **कोल्हापूर, ५ मे**

धनुष्यबाणाचे बटन दाबून उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी करायचा आहे. ठाकरेंची मशाल निवडणुकीनंतर चिलीम होणार असल्याचा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना प्रचारसभेतून लगावला.

कोल्हापूर लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ कागलमध्ये रविवारी सकाळी आयोजित सभेत शिंदे म्हणाले, काँग्रेसचे उमेदवार मतदारसंघ सोडून पळत आहेत. २०१४ नंतर एक तरी बॉम्बस्फोट झाला आहे का, देशासाठी २४ तास काम करणारा पंतप्रधान पाहिजे की परदेशात जाऊन गार गार वारा खाणारा, हे जनतेने ठरवायचे आहे.

मोदींनी १० वर्षांत केलेले काम आणि ६० वर्षे काँग्रेसने देशाला खड्ड्यात घातलेला काळ पाहा. घरात बसलेल्या व्यक्तीला मत देणार का, फेसबुकवर बोलणाऱ्या व्यक्तीला मतदान करणार, स्वतःच्या स्वार्थासाठी, खुर्चीसाठी काँग्रेसला डोक्यावर घेतले, असे म्हणत शिंदे यांनी ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. ◂(वृत्तसंस्था)



कोल्हापूर येथील जाहीर सभेत जनतेला अभिवादन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. सोबत स्थानिक पदाधिकारी व नेते

### जनतेची साथ महायुती, मोदींसोबतच

» विजयाचा विश्वास व्यक्त करीत शिंदे म्हणाले, हसन मुश्रीफ, समरजित घाटगे, संजय मंडलिक असा त्रिवेणी संगम येथे झाला आहे. त्यामुळे कोल्हापुरातील महायुतीच्या दोन्ही जागा मोठ्या फरकाने जिंकणार, याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात महायुतीला प्रतिसाद मिळाला, तसाच प्रतिसाद तिसऱ्या टप्प्यातील मतदानावेळी मिळेल. महायुती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच जनतेची साथ असून, आम्ही केलेल्या कामाची पोचपावती जनता दिल्याशिवाय राहणार नाही.

# प्रचारादरम्यान उमेदवाराने चक्क महिलेच्या कानशिलात लगावली

◆ **निझामाबाद (तेलंगणा), ५ मे**

एरवी जिंकून आल्यानंतर खासदार, आमदार सामान्यांना विचारतही नाही. मात्र, प्रचारादरम्यान घरोघरी जातात, हात जोडतात, वृद्ध असतील तर पाया पडतात. मात्र, काँग्रेसच्या एका उमेदवाराने मतदारांची एवढीही तमा बाळगली नाही. काँग्रेसचे नेते तथा निझामाबाद लोकसभा मतदारसंघातील उमेदवार टी. जीवन रेड्डी यांनी प्रचारादरम्यान एक वृद्ध महिलेला कानशिलात लगावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

आरमूर विभागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी टी. जीवन रेड्डी यांच्यापुढे एक महिला आली. माझ्याकडे ना घर आहे, ना मला कुठलीही पेन्शन मिळते. तिने त्यांना दया करण्याची विनंती केली. तुम्हाला सर्वकाही मिळेल, असे म्हटल्यावर रेड्डी यांनी तुम्ही कुणाला मतदान करणार आहात, असा प्रश्न विचारला. त्यावर महिलेने माझी फुलाला मत देण्याची इच्छा असल्याचे म्हटले. महिलेचे उत्तर ऐकून रागावलेल्या रेड्डी यांनी महिलेला थापड लगावली.



**व्हायरल झालेल्या व्हिडीओत मी वृद्धेला थापड मारली नाही. प्रेमाने तिच्या गालाला हात लावला.**

☞ टी. जीवन रेड्डी, काँग्रेस उमेदवार

याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाला असून, त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. ◂(वृत्तसंस्था)

इंडिया आघाडी सत्तेत आल्यास टी. जीवन रेड्डी हे केंद्रीय कृषिमंत्री होतील, असे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी म्हणतात, पण जीवन रेड्डी यांचे वृद्ध महिलांबाबतचे वर्तन निंदनीय आहे.

☞ विष्णू वर्धन रेड्डी, भाजपा नेते

# गांधीनगरमध्ये अमित शाह मताधिक्याचा आपलाच विक्रम मोडणार का?

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ५ मे**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या गांधीनगर मतदारसंघात ७ मेला तिसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. मागील वेळी साडेपाच लाखांनी निवडणूक जिंकणाऱ्या शाह यांनी यावेळी दहा लाखांनी निवडणूक जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमित शाह या मतदारसंघातून देशात विक्रमी म्हणजे साडेपाच लाखांहून अधिक मतांनी विजयी झाले होते. त्यावेळी शाह यांना ८ लाख ९४ मते, तर काँग्रेस उमेदवार सी. जे. चावडा यांना ३ लाख ३७ हजार मते मिळाली होती. गेल्या पाच वर्षांत गृहमंत्री म्हणून केलेल्या धडाकेबाज कामगिरीमुळे शाह यांची लोकप्रियता वाढली आहे. त्यामुळे शाह यावेळी किती मताधिक्याने जिंकतील, साडेपाच लाख मतांनी विजयी होण्याचा आपलाच विक्रम मोडतील का, एवढाच चर्चेचा मुद्दा आहे.

यावेळी शाह सलग दुसऱ्यांदा येथून निवडणुकीच्या रिंगणात आहे.



त्यांचा मुकाबला काँग्रेसच्या सोनल शाह यांच्याशी आहे. सोनल शाह महाराष्ट्राच्या सहप्रभारीही आहेत. २०१९ मध्ये शाह यांनी पहिल्यांदा गांधीनगरमधून लोकसभेची निवडणूक लढवली होती. गृहमंत्री म्हणून मोदी सरकारमध्ये दुसऱ्या स्थानावर असलेले अमित शाह भाजपात चाणक्य म्हणून ओळखले जातात. गृहमंत्री म्हणून आपल्या कार्यकाळात शाह यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवण्यासह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

पंतप्रधान मोदींखालोखाल अमित शाह यांच्यावर भाजपाच्या प्रचाराची धुरा आहे, त्यामुळे यावेळी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर फारकमी दिवस आपल्या मतदारसंघात प्रचारासाठी आले होते. गांधीनगरमधून विजयाची खात्री असल्यामुळे ते देशभर भाजपा उमेदवारांच्या प्रचारात व्यस्त आहेत.

गेल्या ३५ वर्षांपासून गांधीनगर मतदारसंघ भाजपाचा गड म्हणून ओळखला जातो. येथे विधानसभेचे सात मतदारसंघ आहे आणि सातही मतदारसंघात भाजपाचे आमदार आहेत. १९८४ मध्ये या मतदारसंघात काँग्रेसने शेवटचा विजय मिळवला होता. तेव्हा काँग्रेसचे जी. आय. पटेल विजयी झाले. त्यानंतर या मतदारसंघातून काँग्रेसला कधीच विजय मिळाला नाही. १९८९ मध्ये या मतदारसंघात भाजपाने पहिल्यांदा विजय मिळवला. शंकरसिंह वाघेला या मतदारसंघातून विजयी झाले होते.

# देशाच्या गृहमंत्र्यांचा मतदारसंघ हीच गांधीनगरची ओळख

◆ **नवी दिल्ली, ५ मे**

१९५२, १९५७ आणि १९६२ अशा देशातील पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकीत गांधीनगर लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात नव्हता. १९६७ मध्ये हा मतदारसंघ अस्तित्वात आला. गांधीनगर लोकसभा मतदारसंघ हा देशाच्या गृहमंत्र्याचा मतदारसंघ झाला आहे.

१९६७ आणि १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून काँग्रेसचे सोळंकी जिंकले. १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाचे पुरुषोत्तम मावळणकर विजयी झाले. मावळणकर नंतर लोकसभेचे सभापती झाले होते. १९८० मध्ये काँग्रेसचे अमृत पटेल या मतदारसंघातून निवडणूक आले.

माजी उपपंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते लालकृष्ण अडवाणी यांनी गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून सहावेळा निवडणूक जिंकली. अडवाणी यांनी १९९१ मध्ये पहिल्यांदा गांधीनगरमधून लोकसभा निवडणूक जिंकली. १९९६ मध्ये अडवाणी यांनी हा मतदारसंघ अटलबिहारी वाजपेयी यांच्यासाठी सोडला; मात्र दोन ठिकाणांहून निवडणूक लढलेल्या वाजपेयी यांनी जिंकल्यानंतर लखनौ लोकसभा मतदारसंघ कायम ठेवत गांधीनगरच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

वाजपेयींच्या राजीनाम्यामुळे १९९६ मध्ये या मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने सुपरस्टार राजेश खन्ना यांना उमेदवारी दिली होती, पण भाजपा उमेदवार विजयभाई पटेल यांनी त्यांचा पराभव केला. १९९९ मध्ये काँग्रेसने माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांना उमेदवारी दिली होती, पण लालकृष्ण अडवाणी यांच्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाही.

१९९८ मध्ये अडवाणी गांधीनगर मतदारसंघात परतले. त्यानंतर १९९८, १९९९, २००४, २००९ आणि २०१४ अशा सलग पाच निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून जिंकल्या. २०१९ मध्ये हा मतदारसंघ अमित शाह यांच्याकडे आला. गांधीनगर हा देशाच्या गृहमंत्र्याचा मतदारसंघ म्हणायला हरकत नाही. कारण, आधी या मतदारसंघातून निवडून येणारे अडवाणी वाजपेयी सरकारमध्ये गृहमंत्री होते, तर आता शाह मोदी सरकारमध्ये. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ६ मे २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक १८५ ।
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## ग्रामविकासामुळेच महाशक्ती होण्याचा भारताचा मार्ग सुकर होणार: सितारामन



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ५ मे -**

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करायला हवा, त्यासाठी मोदी सरकारच्या विशेष योजना सुरु आहेत, ज्याचे अर्थव्यवस्थेत प्रतिबिंब दिसायला लागले आहे. ग्रामविकासामुळेच महाशक्ती होण्याचा भारताचा मार्ग अधिक सुकर होणार आहे, असे प्रतिपादन अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी केले.

पुणे भेटीत ज्येष्ठ उद्योजक, व्यवसायिक, माजी शासकीय अधिकारी, चार्टर्ड अकौंटंट अशा विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीत मान्यवरांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.


ज्येष्ठ उद्योजक आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष अभय फिरोदीया यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी बाबा कल्याणी, राहुल किर्लोस्कर, सुप्रिया बडवे, जगदीश कदम, सुधीर मेहता, दीपक करंदीकर, पांडुरंग राऊत, डॉ. दीपक शिकारपूर, मनोज पोचट, सुधीर पंडीत, सुशील जाधव उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त प्रदीप रावत, कार्याध्यक्ष भूपाल पटवर्धन, मानद सचिव सुधीर वैशंपायन आदींनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी एज्युनॉमिक्स रिसर्च फोरम चे इंद्रनिल चितळे व सौरभ पटवर्धन यांनी पुणे शहराच्या सर्वांगीण विकासाचे व्हीजन डॉक्युमेंट पुढील नियोजनाच्यादृष्टीने अर्थमंत्र्यांना सादर केले. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रदीप आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

# भारत विश्वगुरु होण्यासाठी भाजपाचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा। राजेंद्र मकोटे**
**कोल्हापूर, दि. ५ मे-**

सगळ्यांचा समतोल विकास करत असतांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाचे संतुलन याच्या आधारावर नवीन भारताचे निर्माण करणे हेच भाजपचे स्वप्न आहे. भारत आत्मनिर्भर होण्यासाठी, भारत विश्वगुरु होण्यासाठी भाजपचे प्रयत्न आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय दळणवळणमंत्री नीतीन गडकरी यांनी केले.

ते महासैनिक दरबार हॉल येथे उद्योजक, अधिवक्ता, लेखापरीक्षक, व्यावसायिक यांच्यासाठी आयोजित मार्गदर्शनात बोलत होते. या प्रसंगी भाजप खासदार धनंजय महाडिक, कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक, सुनील देवधर यांसह भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन बी न्यूजचे संपादक चारुदत्त जोशी यांनी केले. कोल्हापूर जिल्ह्याने त्यांच्या जिल्ह्यातील क्षमता ओळखून त्याप्रमाणे मोठे व्यावसाय उभे करण्याचा प्रयत्न केले पाहिजेत. जसे हुपरी येथील चांदी उद्योगासाठी सिल्व्हर डिझाईन इन्स्टिट्यूट, इचलकरंजी येथे टेक्सटाईल डिझाईन इन्स्टिट्यूट चालू करण्याची आवश्यकता आहे. इथे मोठ्या प्रमाणात फाऊंड्री, तसेच अभियांत्रिकी कारखाने असल्याने कोल्हापूर जिल्हा दुचाकी-चारचाकी गाड्यांचे भाग बनवणारे मोठे केंद्र होऊ शकते.



कोल्हापूर येथे मोठ्या प्रमाणात साखर कारखाने असल्याने येथे इथेनॉल उद्योग मोठ्या प्रमणात चालू होऊ शकतो. याचा मोठा लाभ शेतकऱ्यांसाठी होऊ शकतो. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपण विकासाचे मॉडेल सिद्ध केले पाहिजे. भारतातील शेवटचा व्यक्ती केंद्रबिंदू मानून आपण कृती केली पाहिजे. नितीन गडकरी यांच्याशी झालेल्या प्रश्न-उत्तरातून आलेली उत्तरे अशी : यापुढील काळ हा हायड्रोजन वायू आणि द्रवरूप चालणाऱ्या इंधनाचा आहे. त्यामुळे त्याच्या निर्मितीसाठी आपण प्रयत्नशील असले, पाहिजे. चांगल्याप्रकारचे आणि दीर्घपल्ल्यांच्या रस्त्यांसाठी चारचाकी वाहनांची वेगमर्यादा ८० किलोमीटरपेक्षा अधिक वाढवली पाहिजे यासाठी मीही सहमत आहे; मात्र देशात वाढत्या अपघातांची संख्या पहाता सध्यातरी ते शक्य नाही. वेग वाढवण्याच्या प्रस्तावावर विविध राज्य आणि केंद्र यांची सहमत होत नाही.

यापूर्वी खासदार धनंजय महाडिक यांनी आपल्या भाषणामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या भक्कम आर्थिक सहकार्यामुळे कोल्हापूर आता चौफेर विकसित करीत असल्याचे नमूद केलेतर प्राध्यापक संजय मंडलिक यांनी यावेळी बोलताना कोल्हापुरातून पश्चिम महाराष्ट्राचे विकासाचा नवा आयाम आता गतीने पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त केला

यावेळी प्रसाद कामत, श्रीकांत पोतनीस, सुरेश जैन, विश्वजित कुलकर्णी, राजु पाटील, रोटरीचे उदय पाटील, सत्यजित कदम, जयेशभाई कदम, सीमा जोशी, संतोष कुलकर्णी, पचगंगा राजाराम शिपुगडेसह उपस्थित होते.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विकसित भारताच्या दिशेने वाटचाल

एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असतानाच आर्थिक आघाडीवर दोन सकारात्मक बातम्या समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तवली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था 'डेलॉईट'ने वर्तविला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या पृष्ठभूमीवर या दोन महत्त्वाच्या सकारात्मक बातम्या भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच दिलासादायक व आनंददायक आहेत. मोठ्या प्रमाणात जागतिक आव्हाने असूनही आर्थिक व औद्योगिक पातळीवर मोदी सरकारने दाखविलेल्या लवचीकतेचे कौतुक करायलाच हवे. रशिया-युक्रेन युद्ध व तांबड्या समुद्रातील मालवाहतुकीचे संकट यासारख्या भूराजकीय तणावानंतरही केंद्र सरकारच्या लवचीक आणि व्यावहारिक भूमिकेमुळे एकूण निर्यात वाढीत झालेली प्रभावी वाढ ही प्रशंसनीय अशीच आहे. एकीकडे पाश्चिमात्य देश आजही त्यांच्या मध्यवर्ती बँकांनी घेतलेल्या दरवाढीच्या धोरणामुळे तोटा सहन करीत असताना आणि अमेरिकेसह संपूर्ण जगाच्या आर्थिक वाढीचा वेग मंदावलेला असताना मार्च महिन्यात व्यापारी तूट कमी होणे व भारताची अर्थव्यवस्था गतिशील आणि बळकट होणे हा शुभसंकेतच आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला गती आणि बळकटी देण्यासाठी तसेच लोकांच्या इच्छा-आकांक्षांना मूर्त रूप देण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारने गेल्या १० वर्षांपासून प्रामाणिक प्रयत्न केले, हे नाकारण्यात अर्थ नाही. अर्थकारण आणि राजकारण या दोन्हींमध्ये मोदी सरकारने उत्तम समन्वय राखला आहे. एकीकडे स्वयंरोजगाराला व ग्रामोद्योगांना चालना देत असतानाच दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात सातत्याने कशी वाढ होईल, याकडेदेखील मोदी सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणारा भारत हा सातत्याने औद्योगिक उत्पादन वाढीसाठी तसेच निर्यातवृद्धीसाठीदेखील प्रयत्न करीत आहे. केंद्रातील मोदी सरकारच्या स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजना, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा, एक उत्पादन (ओडीओपी) योजना या साऱ्याच महत्त्वाकांक्षी योजनांमुळे देशाचे अर्थचक्र अधिकच गतिमान झाले, ही वस्तुस्थिती आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत आगामी काळात आमच्या माता, भगिनी व मुलींना दर्जेदार शिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी कशा उपलब्ध होतील, यादृष्टीने आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असे अभिवचन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहे. मोदी सरकार पुन्हा तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यास या वचनाची पूर्तता करेल याची महिलाशक्तीला पूर्ण खात्री आहे. 'हा विकसित भारताचा संकल्प आहे. आता देश छोटी स्वप्ने पाहणार नाही व लहानसहान संकल्पही करणार नाही तर आमची स्वप्नेही मोठी असतील आणि संकल्पही प्रचंड असतील. भारताचा विकास करायचा आहे, हे आमचे स्वप्न आणि संकल्पही आहे,' असे मोदी सध्या देशभरातील प्रचारसभांमध्ये तरुणाईला सांगत आहेत. ही 'मोदी की गॅरंटी' भारतीयांच्या सुरक्षित आणि दर्जेदार जीवनासाठी नक्कीच महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे 'मोदी की गॅरंटी' म्हणजे प्रतिकूलतेवर मात करण्याची इच्छाशक्ती ठेवणे व धैर्य, आत्मविश्वास जागविणे होय, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे आज वास्तववादी विचार करून देशाला आर्थिक आघाडीवर पुढे नेणाऱ्या व देशवासीयांना कृतिशील, पुरुषार्थी बनवणाऱ्या देशभक्त राज्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेखाटलेल्या 'विकसित भारत संकल्पचित्रा'त देशातील तरुण, बुद्धिमान, क्रियाशील व उत्साही उद्योजकांनी आपले योगदान दिले पाहिजे. वस्तुस्थिती ही आहे की, पहिल्यांदा म्हणजेच २०१४ मध्ये देशाची सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच केंद्रातील मोदी सरकारने देशाच्या पुनर्बांधणीचे कार्य हाती घेतले होते आणि २०२४ पर्यंत हे सुरूच होते. देशाची पुनर्बांधणी म्हणजे सर्वच स्तरावर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन होय. हे कार्य मुळीच सोपे नाही. यासाठी प्रखर इच्छाशक्ती, सातत्य, प्रयत्न, अविरत कष्ट आणि दूरदृष्टी लागते. या सर्व गोष्टी मोदी सरकारमध्ये आहेत, त्यामुळेच गेल्या ९-१० वर्षांत सर्वच आघाड्यांवर व्यापक व सकारात्मक परिवर्तन झाले असून त्याचे चांगले परिणामही दिसून येत आहेत. जेफरीज आणि डेलॉईट या संस्थांनी वर्तविलेले अंदाज त्याचेच द्योतक आहे. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी पंतप्रधानांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास,' असा नारा दिला. २०२४ पासून भारताचा विकसित देश बनण्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला असून विकासाच्या दृष्टीने पुढचे दशक हे भारताचेच राहणार आहे, अशी ग्वाही आमच्या पंतप्रधानांनी यापूर्वीच दिली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नसून तो आपल्या सर्वांचा उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वतःला दिलेले एक लक्ष्य आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारत संकल्पनेला पुढे नेण्यासाठी देशातील प्रत्येक घटकाचे त्यामध्ये योगदान आवश्यक आहे. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी वृत्तीचा अभाव, तुष्टीकरणाचे घातक राजकारण, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले असून गेल्या १० वर्षांत भारताने नाजूक पाच अर्थव्यवस्था ते सर्वोच्च पाच अर्थव्यवस्था असा प्रवास केला आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत करीत असलेल्या उल्लेखनीय वाटचालीमुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. 'विकास भी विरासत भी' या संकल्पनेनुसार आपली ओळख आणि अभिमान जपून विकास साधला जात आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच भारत हा अतिशय महत्त्वाच्या अशा टप्प्यावर उभा आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतीय नागरिकांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे किंवा आत्मनिर्भरता वाढवण्यावर भर देणे, हे मोदींच्या शासकीय धोरणाचे वैशिष्ट्य आहे. राज्यावर अर्थात सरकारवर अवलंबित्वाची संस्कृती कायम ठेवण्याऐवजी, मोदी सरकारने व्यक्तींमधील आणि समुदायांमधील सुप्त क्षमता बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे. कल्याणकारी कार्यक्रमांच्या माध्यमातून सहाय्य प्रदान करून, कुटुंबांना सरकारी मदतीवर दीर्घकाळ अवलंबून राहण्याच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी सशक्त केले गेले आहे. यामुळे नागरिकांमध्ये स्वयंपूर्णता आणि सन्मानाची भावना वाढली आहे. विकसित राष्ट्र बनत असताना पुढील दशकात आपली वाटचाल कशी असेल, यावर आपले भवितव्य अवलंबून आहे. देशाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून द्यायचे असेल तर पंतप्रधानांनी काही महिन्यांपूर्वी 'पंचप्राणां'चा उल्लेख केला होता. विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी वसाहतवादी, गुलामगिरीची मानसिकता झुगारून देणे, आपल्या मुळांचा, एकतेचा अभिमान बाळगणे, नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना निर्माण करणे, नवीन शक्यता, संभावना जोपासणे व नवे संकल्प लक्षात घेऊन आत्मविश्वासाने पुढे जाणे हे ते पंचप्राण होत. देशाला अधिक गतीने पुढे नेण्यासाठी सामूहिक प्रयत्न आणि सांघिक प्रयत्नांना पर्याय नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# महत्त्वाची तिसरी फेरी!



निवडणूक आयोगाने पहिल्या दोन फेऱ्यातील मतदानाची सुधारित टक्केवारी जाहीर केली. पहिल्या फेरीत ६६.१४ तर दुसऱ्या फेरीत ६६.७१ टक्के मतदान झाल्याचे आयोगाने म्हटले आहे. नवी आकडेवारी पाहत २०१९ च्या तुलनेत मतदानात फार घट झालेली नाही. या मतदानाचे दोन अर्थ लावले जाऊ शकतात. एक म्हणजे मतदारांनी कुणाच्या बाजूने मतदान केलेले नाही आणि दुसरा अर्थ म्हणजे मतदार सरकारच्या विरोधात नाही. १९७७ मध्ये आणिबाणीच्या विरोधात लाट होती. त्याचा परिणाम म्हणजे ६१ टक्के मतदान झाले होते. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येमुळे काँग्रेससाठी सहानुभूतीची लाट होती. त्याचा परिणाम म्हणजे ६४ टक्के मतदान झाले होते. यावेळी सकारात्मक वा नकारात्मक लाट असती तर मतदान जास्त झाले असते. ते झाले नाही याचा अर्थ सत्ताधारी पक्षाला फार चिंता करण्याचे कारण नाही.

**पहिल्या दोन फेऱ्या** : पहिल्या दोन फेऱ्यात केरळ व तामिळनाडू ही दोन राज्ये होती. या दोन्ही राज्यात सत्ताधारी भाजपाला २०१९ मध्ये फारसे यश मिळालेले नाही. या दोन राज्यांत लोकसभेच्या ६० जागा आहेत. म्हणजे पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये जे मतदान झाले आहे, त्याच्या एक तृतीयांश जागा या दोन राज्यांत आहेत. या राज्यांमध्ये यावेळी भाजपाला काही जागा मिळण्याची शक्यता असली, तरी तो पक्षासाठी बोनस मानला जाईल. कारण ही राज्ये कधीही भाजपासाठी चांगली राज्ये मानली जात नव्हती.

**ध्रुवीकरणाचे राजकारण** : केरळ व तामिळनाडूतील राजकारण ध्रुवीकरणाचे राजकारण राहात आले आहे. केरळमध्ये डावी आघाडी व काँग्रेस आघाडी तर तामिळनाडूत द्रमुक व अण्णा द्रमुक असे राजकारण चालत आले आहे. भाजपा यावेळी या राज्यांमध्ये एखादा राजकीय चमत्कार घडवील काय, असा एक प्रश्न विचारला जात आहे. भाजपा यासाठी आशावादी असला, तरी या प्रश्नाचे नेमके उत्तर मिळण्यासाठी ४ जूनची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**तिसरी फेरी** : तिसऱ्या फेरीत ९४ जागांवर मतदान होत असून ही फेरी पूर्ण झाल्यावर लोकसभेची निम्मी निवडणूक आटोपलेली असेल. तिसऱ्या फेरीत मतदान होत असलेले ९४ मतदारसंघ १२ राज्यांमध्ये पसरलेले आहेत. या फेरीचे भाजपासाठी असणारे महत्त्व म्हणजे गुजरातमधील २६ पैकी २५ मतदारसंघांत या फेरीत मतदान होणार आहे. सुरतची जागा भाजपाने याआधीच अविरोध जिंकली आहे. २०१४, २०१९ या दोन्ही निवडणुकीत राज्यातील सर्व २६ पैकी २६ जागा जिंकल्यानंतर भाजपाला यावेळी विजयाची हॅट्‌ट्रिक करावयाची आहे. भाजपासाठी तिसरी फेरी महत्त्वाची असल्याचे जे मानले जाते ते यामुळेच!

**मध्यप्रदेश** : मध्यप्रदेशातील भिंड, भोपाळ, गुना, ग्वाल्हेर, मोरेना, रायगढ, सागर, विदिशा या ८ मतदारसंघांत या फेरीत मतदान होत असून २०१९ मध्ये यातील बहुतेक जागा भाजपाने जिंकलेल्या आहेत. काँग्रेस सोडून भाजपात आलेले ज्योतिरादित्य शिंदे यांचे प्रभाव क्षेत्र असलेल्या ग्वाल्हेरमध्ये या फेरीत मतदान होत आहे. माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान विदिशातून निवडणूक लढवित आहेत. त्या सर्व जागा कायम ठेवणे भाजपासाठी महत्त्वाचे ठरणारे आहे.

**कर्नाटक** : दक्षिणेत भाजपाला चांगले यश देणारे राज्य म्हणून कर्नाटकाचा उल्लेख केला जातो. कर्नाटकातील १४ मतदारसंघांत मतदान आटोपले असून उर्वरित १४ मतदारसंघांत उद्या तिसऱ्या फेरीत मतदान होईल. २०१९ मध्ये भाजपाने राज्यातील २८ पैकी २५ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेस, जनता दल सेक्युलर व अपक्ष यांना प्रत्येकी एक जागा मिळाली होती. वर्षभरापूर्वी राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठा धक्का बसला होता. त्या साऱ्या पृष्ठभूमीवर २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करणे भाजपासाठी एक आव्हान ठरणार आहे. राज्यात भाजपाच्या काही जागा कमी होतील, असे मानले जाते. जागांमध्ये होणारी ही घट कमीत कमी राहावी, असा भाजपाचा प्रयत्न राहणार आहे. पण, तरी किती जागा घटतील, याचा अंदाज बांधता आलेला नाही. काँग्रेस नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी २८ पैकी १८ जागा जिंकण्याचा अंदाज वर्तविला आहे. या निवडणुकीसाठी राज्यात तयार झालेले नवे राजकीय समीकरण म्हणजे जनता दल सेक्युलरशी भाजपाने केलेली युती. कर्नाटकाच्या राजकारणात लिंगायत व वोक्कालिंग हे दोन प्रभावी समाज मानले जातात. यात लिंगायत समाज भाजपाकडे तर वोक्कालिंगांचा पाठिंबा देवेगौडांना अशी एक परंपरा स्थापित झालेली आहे. ही युती भाजपासाठी एक जमेची बाजू राहणार आहे. मात्र, तरीही २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करणे भाजपासाठी एक आव्हान ठरणार असून, ते आव्हान पक्ष कशाप्रकारे हाताळतो, यावर या राज्यात भाजपाची कामगिरी अवलंबून राहणार आहे.

**महाराष्ट्र** : राज्यातील लोकसभा मतदारसंघांची संख्या विचारात घेता उत्तरप्रदेशानंतर महत्त्वाचे मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील ११ मतदारसंघांत उद्या मतदान होत आहे. यात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघाचा समावेश आहे.

**उत्तरप्रदेश** : उत्तरप्रदेशातील संभल, हाथरस, बरेली, आग्रा, फतेहपूर सिक्री, फिरोजाबाद, मैनपुरी, एटा, बदाऊं, आंवला या १० मतदारसंघांत या तिसऱ्या फेरीत मतदान होत आहे. उत्तरप्रदेशातील प्रत्येक फेरी भाजपासाठी महत्त्वाची ठरणार आहे. २०१४ च्या तुलनेत २०१९ च्या निवडणुकीत भाजपाच्या काही जागा कमी झाल्या आहेत. भाजपाला २०१४ च्या कामगिरीची बरोबरी करावयाची असल्यास प्रत्येक फेरीत एखाद-दुसरी जागा वगळता अन्य सर्व जागा जिंकणे पक्षासाठी आवश्यक ठरणार आहे. राज्यातील सुधारलेली कायदा सुव्यवस्था ही भाजपासाठी एक जमेची बाजू राहणार असल्याचे पक्षाला वाटते.

**सपा-काँग्रेस युती** : राज्यात सपा व काँग्रेस याची युती झाली असली, तरी काही मतदारसंघ वगळता या युतीचा फार काही परिणाम होण्याची चिन्हे नाहीत. सपा नेते अखिलेश यादव यांनी कनौज मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. येथील यादव-मुस्लिम समीकरण विचारात घेता ते निवडून येतीलही. काही मतदारसंघांत या युतीचा प्रभाव दिसेल. मात्र, सपा-काँग्रेस युती राज्यात चमत्कार करील, अशी शक्यता नाही. यात मायावतींची बसपा सामील झाली असती तरी काही मतदारसंघांत भाजपासाठी समस्या निर्माण झाली असती. पण, मायावतींनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. बसपाला दलित मते मिळतील. पण, केवळ दलित मतांच्या शिदोरीवर बसपाला निवडणूक जिंकता येणार नाही. २०१९ च्या निवडणुकीत राज्यात बसपा दुसऱ्या क्रमांकावर होती. यावेळी बसपाची स्थिती आणखी घसरण्याची चिन्हे आहेत.

**पहिली निवडणूक** : देशातील काही भागांत मतदानाची टक्केवारी घसरली असली, तरी अन्य काही भागांत ७०-७५ टक्के मतदान होत आहे, ही बाब भारतीय लोकशाहीसाठी अतिशय समाधानकारक आहे. हिंसाचारग्रस्त मणिपूरमध्येही ७० टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. ब्रिटिशांशी लढून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत फक्त ४४ टक्के मतदान झाले होते, हे विशेष. तर, १९५७ मध्ये झालेल्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण एक टक्का वाढून ते ४५ टक्के झाले. नंतर हळूहळू मतदानाची टक्केवारी वाढू लागली. लोकशाहीची जननी मानल्या जाणाऱ्या ब्रिटन-अमेरिकेतही ६०-६५ टक्के मतदान होत आले आहे. त्यामुळे भारतात होत असलेले मतदान कमी नाही. पण, योग्य हवामानात मतदान झाले तर मतदानाचे प्रमाण ७० टक्क्यापर्यंत जाऊ शकते. अर्थात हे सारे निवडणूक आयोगाच्या सुबुद्धीवर अवलंबून आहे.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# कोट्यवधींचा निधी; गावे बकाल तरी!

सध्या संपूर्ण देशात लोकसभा निवडणूक सुरू आहे. या निवडणुकीची ४ जून रोजी मतमोजणी होईल. त्यानंतर ६ महिन्यांनी महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक लागू शकते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका देशहित, पक्षीय विचारसरणी आणि विकासाच्या मुद्यांवर लढविल्या जातात. या निवडणुकांमध्ये जात हा घटक कमकुवत असतो. परंतु, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मात्र जातीचा बागुलबोवा हमखास उभा केला जातो आणि तो तितकाच प्रभावीसुद्धा ठरतो. ग्रामपंचायत निवडणुकांना लोकसभा-विधानसभा निवडणुकांची रंगीत तालीम म्हटले जाते. परंतु, ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये स्थानिक मुद्देच अधिक प्रभावी ठरतात. जाती-पातीच्या या राजकारणात अकुशल आणि अक्षम उमेदवार सरपंच म्हणून निवडून येतो आणि मग गावाची कधीही भरून न निघणारी हानी होते. याला सर्वस्वी जबाबदार गावकरीच असतात. कारण, त्यांनीच दुय्यम उमेदवाराला निवडून दिलेले असते.

शासनाने ग्रामपंचायतींना प्रचंड अधिकार दिलेले आहेत. १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाने ग्रामीण भागाच्या विकासासाठी खोऱ्याने पैसा ओतला. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी केंद्र सरकारसह राज्य सरकारही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तब्बल १ हजार १४० योजना कार्यान्वित आहेत. इतक्या योजना असूनही बहुतांश गावे आजही आपला बकालपणा मात्र घालवू शकलेली नाहीत!

ज्या गावातील नागरिक सुज्ञ व जागरूक असतात, त्याच गावाचा विकास झपाट्याने होतो. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि परिस्थितीशी झगडण्याची तयारी असावी लागते. ज्येष्ठ समाजसेवक देवाजी तोफा यांनी हे सिद्ध करून दाखविले आहे. बहुतांश गावांमध्ये केवळ पांढरे कपडे घालून मिरविणारे लोक सरपंच होऊन बसले आहेत. यात सुशिक्षित म्हणून मिरविणाऱ्या पांढरपेशांचा मोठा भरणा आहे. अशा लोकांमुळे संबंधित गावे आपोआपच विकासाच्या स्पर्धेतून बाहेरी फेकली जातात. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये सरपंचांना विशेषाधिकार प्राप्त आहेत. परंतु, झाडून सर्वच सरपंचांना आपले अधिकार माहीत असतात का, हा खरा संशोधनाचा विषय आहे. गावाच्या प्रमुखाला आपले अधिकारच ठाऊक नसेल तर विकास होणार तरी कसा?

ग्रामसचिव अर्थात ग्रामसेवक म्हणून शासनाने नियुक्त केलेला सेवेकरी ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असतो. परंतु, बहुतांश ग्रामसेवकांना शासकीय योजनांची पुरेपूर माहिती नसते! या लोकांना निव्वळ कागदी घोडे नाचविण्याची सवय आहे. ग्रामसेवक गावकऱ्यांचा नोकर असतो. परंतु, तो मालकाच्या तोऱ्यात वावरतो आणि वागतोसुद्धा! ग्रामसभेला कायद्याने विशेषाधिकार दिलेले आहेत. परंतु, बहुतांश गावांमध्ये ग्रामसभाच होत नाही. झाल्याच तर गावकरी हजर राहात नाही. त्यामुळे संबंधितांना भ्रष्टाचार करण्यासाठी मोकळे रान मिळते. अलिकडे ग्रामीण भागातही जागरूकता येत आहे. ही समाधानाची बाब असली तरी आजही ग्रामपंचायत निवडणुका जाती-पातीच्या आधारावर लढविल्या जातात. हे देश विकासाच्या दृष्टीने खूपच घातक आहे. ग्रामपंचायत निवडणुकाही जेव्हा विकासाच्या मुद्यावर लढविल्या जातील तेव्हा ग्रामीण भागात विकासाची क्रांती घडून आल्याशिवाय राहणार नाही.

घटनाकारांनी मागासवर्गीयांना सत्तेत वाटा मिळावा म्हणून राजकीय आरक्षणाची तरतूद केलेली आहे. परंतु, घटना समितीने राजकीय आरक्षण केवळ १० वर्षांसाठी लागू केले होते. नंतर केवळ मागासवर्गीयांची मते लाटण्यासाठी वारंवार या आरक्षणाला मुदतवाढ देण्यात आली. राजकीय आरक्षणामुळे मागासवर्गीयांचा खरोखरच विकास झाला का? एखादी मागासवर्गीय व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य अथवा सरपंच झालीच तर ती गावाला न्याय मिळवून देऊ शकते का? महिला आरक्षणामुळेही फार काही साध्य होऊ शकलेले नाही. एखादी महिला आरक्षणाच्या जोरावर सरपंच झाली तरी तिचा पती अथवा गावपुढारीच कारभार सांभाळतो. आरक्षित जागांवर हे गावपुढारी मुद्दाम अज्ञानी अथवा कमकुवत व्यक्तीला उमेदवारी देतात. अनेक गावांमध्ये मजूर महिला सरपंच वा ग्रामपंचायत सदस्य होऊन बसल्या आहेत. त्यांना नेमके काय करावे लागते, हेच ठाऊक नसते. अनेक ग्रामपंचायत सदस्य महिला केवळ झेंडावंदनासाठी ग्रामपंचायत कार्यालयात जातात. वर्षभर शेतशिवारातील कामे करण्यातच त्यांचा वेळ जातो. हेतूच साध्य होत नसेल तर या राजकीय आरक्षणाचा फायदा तरी काय? हे कुठेतरी थांबले पाहिजे. ग्रामीण भागातही शैक्षणिक क्रांती घडून आली आहे. ही समाधानाची बाब असली तरी परिस्थिती बदलण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# राजकीय पक्षांकडे कार्यकर्त्यांनी पाठ का फिरविली?

राजकीय पक्ष असो की सामाजिक संघटना या सर्वांकडेच आजकाल कार्यकर्त्यांचा दुष्काळ पडल्याचे चित्र आहे. काही पक्ष, संस्था त्याला अपवाद आहेत. परंतु, त्यांच्याकडे उपलब्ध असलेले कार्यकर्ते इतरांपेक्षा जास्त असले, तरीही पूर्वी त्यांच्याकडे किती होते आणि आता त्यांच्याकडे किती आहेत, याचा त्यांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. तुमच्या जवळचे मुद्दल संपले असेल आणि तुम्ही फक्त व्याजावर दिवस काढत असाल तर ही नक्कीच चिंतेची आणि चिंतनाची गोष्ट आहे.

फार पूर्वी नेत्यांनी एक आवाज दिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते जमा व्हायचे. नेत्यांचे आवाहन तर दूरच राहू द्या; परंतु त्यांच्या चमच्यांच्या आवाहनावरसुद्धा मोठ्या प्रमाणावर लोक जमा व्हायचे. गावातील प्रमुख दोन-चार लोकांना जर पकडले तर संपूर्ण गावाचे मतदान ताब्यामध्ये यायचे; परंतु आता अशी परिस्थिती नाही. आता प्रत्येक जण स्वतंत्र मताचा झालेला आहे किंवा लोकांना जमा करणाऱ्या ठेकेदारांना तो आता मानेनासा झालेला आहे. याला कारणीभूत अनेक गोष्टी आहेत. ज्या वेळेला देश पारतंत्र्यात होता त्यावेळेला समाजाचे नेतृत्व करणारे लोक निःस्वार्थ होते. अशा त्यागी वृत्तीच्या लोकांकडे पाहून 'तेथे कर माझे जुळती' अशा पद्धतीची भावना कार्यकर्त्यांमध्ये व सर्वसामान्य जनतेमध्ये उमटत होती. परंतु, देश स्वतंत्र झाला, देशामध्ये भ्रष्टाचाराचा शिरकाव झाला. त्यानंतर हळूहळू चित्र बदलत गेले. मोठमोठ्या कामांचे कंत्राट नेत्यांना बायको पोरांच्या नावावर मिळू लागले. त्यांचे उद्योगधंदे स्थापित होऊ लागले. पाहता पाहता ते फारच मोठे झाले. त्यानंतर एक काळ असा आला की, त्यांनी त्यांच्या आजूबाजूच्या दहा-पाच लोकांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. हे आजूबाजूचे लोक नंतर कार्यकर्त्यांचे ठेकेदार बनले. नेते मंडळीसुद्धा आश्वस्त झाली. त्यांना वाटले की, चला सर्वसामान्य कार्यकर्त्याला जवळ करण्याची आवश्यकता नाही. आपण दहा-पाच चमच्यांना सांभाळले तरी ते उर्वरित लोकांना सांभाळत राहतील. करता करता काही खास कृपापात्र लोकांना पेट्रोल पंप, आश्रम शाळा मिळू लागल्या. पाहता पाहता हे लोक मोठे प्रस्थापित बनून गेले. अनेक कार्यकर्त्यांचे यांच्या मागे फिरता फिरता त्यांच्या उमेदीचे वर्ष समाप्त झाले. काहींची राजकीय महत्त्वाकांक्षा होती तर काहींची तीही नव्हती. ज्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा होती त्यांना या वेळेला 'तू थांब, पुढल्या वेळेला तुझा नक्की विचार करू,' असे म्हणता म्हणता त्यांची पोरंसुद्धा मोठी होऊन गेली. परंतु यांचा नंबर काही आलाच नाही. असेच दिवस जात गेले आणि मग हे जुने कार्यकर्ते बाजूला पडत गेले. राजकारणाचे गारुड आणि प्रलोभन इतके मोठे होते की, नवनवीन लोकांना त्याचे आकर्षण वाटतच राहिले. विरोधामध्ये बसणारे सत्तेमध्ये आले. सत्तेमधले विरोधामध्ये गेले. परंतु कार्यकर्ते जिथल्या तिथेच राहिले. शिरगणती पूर्ण करण्यासाठी का होईना जुन्या कार्यकर्त्यांच्या जागेवर निवडणुकीपुरते तरी नवीन लोक येत राहिले. जुने मात्र कायमचे दुरावले. ते फक्त मतदार बनले. काही पक्षांमध्ये विचारधारा नावाची गोष्ट होती. त्यांच्याकडे काही कार्यकर्ते विचारधारा म्हणून लाजेस्तव कायम राहिले. त्यांनी मार्ग बदलला नाही. पक्ष बदलला नाही. तरीसुद्धा 'पळसाला पाने तीनच' हाच अनुभव त्यांना आला. अजून दिवस पुढे जात गेले. मग मात्र कार्यकर्त्यांच्या हे लक्षात आले की, पाच वर्षे काम करून काही उपयोग नाही. सत्ता असली काय आणि नसली काय आपला उपयोग गर्दी जमवण्यासाठी आहे, हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले त्यावेळेस जेव्हा निवडणुका येतील तेव्हा पाहू. आपण आपल्या कामधंद्याला लागलेले बरे. असा विचार अनेकांनी केला. त्यामुळे हंगामी स्वरूपाचे कार्यकर्ते तयार होऊ लागले. असे कार्यकर्ते जेव्हा निवडणुका यायच्या त्याच वेळेला कामात यायचे. नंतर पुन्हा पाच वर्षे ते झोपी जायचे. कुठलेही धरणे-आंदोलन म्हटले की, कार्यकर्त्यांपेक्षा पदाधिकारी तिथे मोठ्या प्रमाणावर उपस्थित असतात. असे चित्र सर्वच राजकीय पक्षांमध्ये पाहायला मिळते. बाहेरच्या पक्षामधून आलेल्या आयारामांना प्रतिष्ठा प्राप्त झाली व पक्षनिष्ठांची अवहेलना झाली.

या राजकीय कार्यकर्त्यांनी आपल्या पोरासोरांना सांगितले की, बाबांनो आमची अनेक वर्षे येथे वाया गेली आहेत. तुम्ही ही चूक करू नका. तुम्ही शांतपणे आपल्या कामधंद्याचे बघा. त्यामुळे तरुण वर्ग विचारधारा तीच असली, तरी पुन्हा त्यांच्या वाटेला गेला नाही. राजकीय नेत्यांची जादू समाप्त होत गेली. लोकांमधले त्यांचे आकर्षण समाप्त होत गेले. त्यांच्या चकचकीत गाड्या, मोठमोठ्या इमारती, उभे झालेले उद्योग याच्यामुळे कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल असूयाच जास्त वाटत राहिली.

राजकीय पक्ष हजारो कार्यकर्त्यांचे पुनर्वसन करू शकत नाही, त्यांना नोकरी देऊ शकत नाही. परंतु सरकारी नाही तर खाजगी नोकरीसाठी प्रयास केले जाऊ शकतात. एखादे मोठे कंत्राट देताना 'तुझ्याकडे लागणारे मनुष्यबळ तू आमच्या पक्षाच्या लोकांमधून घे,' असे त्याला ठासून सांगितले जाऊ शकते. वेगवेगळ्या गोष्टीच्या एजन्सी आणि सरकारी गोष्टी वाटप करताना यातील काही कार्यकर्त्यांचा विचार केला जाऊ शकतो. ज्यांना तुम्ही नोकरी-व्यवसाय-उद्योग काहीच देऊ शकले नाही; कमीत कमी त्यांना वेगवेगळ्या निमित्ताने सन्मान तरी तुम्ही देऊ शकता. पक्षांमध्ये संपत चाललेली विचारधारा, निःस्वार्थ नेतृत्वाचा अभाव, कार्यकर्त्यांची संपत चाललेली कदर, पक्षांमध्ये वाढत चाललेली वापरा आणि फेकून द्या, ही मानसिकता, यामुळे बऱ्याच वेळा कार्यकर्त्यांमध्ये 'मला काय त्याचे?' अशा पद्धतीची प्रवृत्ती निर्माण होते आणि ते पाठ फिरवितात. ज्यांना पुढल्या २०-२५ वर्षांची राजकीय योजना करायची आहे, अशा राजकीय पक्षांनी याचा विचार करणे आवश्यक आहे. कुठलाही पक्ष हा जनतेमध्ये पकड असलेल्या कार्यकर्त्यांशिवाय यशस्वी होऊ शकणार नाही. त्या पक्षाचे विचार, त्याचे कार्य हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचणार नाही. असे जर झाले तर केवळ वर्तमानपत्र, दूरदर्शन वाहिन्या यांच्यावर जाहिराती देऊन काम भागणार नाही. याचा फटका राजकीय पक्षांना पडेल. त्यामुळे घरोघरी प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचणारा कार्यकर्ता हाच पक्षाच्या विचारधारेचा वाहक आहे आणि त्याला टिकवून ठेवणे हे कोणत्याही काळामध्ये राजकीय पक्षांसाठी आवश्यक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### रायबरेलीतून राहुल गांधी

काही महिन्यांपूर्वी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी राज्यसभेवर निवडून आल्या तेव्हाच स्पष्ट झाले होते की, यावेळेस त्या रायबरेली येथून लोकसभा निवडणूक लढविणार नाहीत. हा मतदारसंघ त्यांनी प्रियांका वढेरा यांच्यासाठी निश्चित केला असावा, असा समज होता. काँग्रेसमध्ये फक्त गांधी परिवाराची चालते, असा आरोप होत असतो. त्याला अजून गती मिळू नये म्हणून काँग्रेसने प्रियांका वढेरांचे नाव बाजूला ठेवले असावे. राहुल गांधी यांनीच वायनाड (केरळ) या मतदारसंघातून उमेदवारीसाठी अर्ज भरल्यावर ३ मे रोजी रायबरेली येथूनही अर्ज भरला. २०२२ ला उत्तरप्रदेश येथे विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा प्रचंड पराभव झाला होता. जेमतेम दोनच मतदारसंघांत काँग्रेसला विजय मिळाला. तिथेच लक्षात आले की, उत्तरप्रदेशसारखा अत्यंत महत्त्वाच्या राज्यात काँग्रेस पक्ष संपल्यात जमा आहे. अमेठीहून उभे राहिल्यास राहुल गांधी यांचा पराभव पुन्हा एकदा निश्चित आहे, म्हणून तेथून उभे राहणे त्यांनी टाळले. वायनाड येथे विजय निश्चित आहे. कारण मागच्या वेळेस कधी नव्हे ते अंदाजे आठ लाख मताधिक्याने ते विजयी झाले होते. रायबरेली हा काँग्रेसचा नसून नेहरू-गांधी परिवाराचा बालेकिल्ला आहे. पूर्वी इंदिरा गांधी त्यानंतर मागील दोन वेळी सोनिया गांधी बड्या मताधिक्यांनी विजयी झाल्या असल्या, तरी मताधिक्यात घट झालेली आहे. काँग्रेसने राहुल गांधी यांना येथील उमेदवारी देऊन रायबरेलीशी त्यांचा घनिष्ठ संबंध व अतूट नातं आहे, असं दाखविले आहे. दोन मतदार संघांतून उभ्या असलेल्या उमेदवारासमोर एक प्रश्न येतोच; आता दोन्ही जागांवरून निवडून आले तर कोणती तरी एक जागा सोडावी लागते. राहुलच्या बाबतीत तसे झाले तर ते कोणती जागा सोडणार; वायनाड की रायबरेली! याचा निर्णय रायबरेली मतदारांना घ्यायचा आहे.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

### अक्षय्य तृतीयेचे पौराणिक महत्त्व

भगवान श्रीकृष्णाने पांडवांचा मोठा भाऊ सम्राट युधिष्ठिर याला अक्षय्य तृतीया या तिथीचे महत्त्व सांगताना असे सांगितले की, हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान आणि हवन कधीच



क्षयाला जात नाही, म्हणून ऋषी-मुनींनी या तिथीला 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे या दिवशी देव आणि पितर यांच्यासाठी जे काही कर्म केले जाते ते सर्व अक्षय होते. म्हणजेच कधीच नाश पावत नाही. अक्षय्य तृतीयेचा उल्लेख महाभारतातदेखील आढळतो. अक्षय्य तृतीया या दिवशीच कृष्ण आणि सुदामा यांची भेट झाली होती. द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगी श्रीकृष्णाने द्रौपदीला अक्षय वस्त्र पुरवले; तो दिवसदेखील अक्षय्य तृतीयेचा होता. यावरून अक्षय्य तृतीयेचे पौराणिक महत्त्व लक्षात येते.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

### अन्नाची नासाडी

'अन्न हे परब्रह्म' म्हटले जाते, पण, त्याच अन्नाची कदर न करता नासाडी केली जात असेल तर मात्र 'अन्न हे परब्रह्म' म्हणण्यात काय अर्थ? गेल्या काही वर्षांत लग्न समारंभादी कार्यक्रमात जेवणाची पंगत बसवली जात होती; सोबतच पळसाच्या पानांची पत्रावळ असायची. त्यामुळे पंगतीत जेवण करण्याचा आनंद व समाधान हा विशेषतः जगावेगळा होता. आजकाल पळसाच्या पानांची पत्रावळ लुप्त होण्याच्या मार्गावर तर दिसत आहेच; सोबतच पंगतसुद्धा दिसणे हळूहळू कमी होत आहे. प्लॅस्टिकचे ताट, वाट्या, पेले हेच साधन झाले आहेत म्हणून आजाराचे प्रमाण वाढत आहे. गावखेड्यात आजही जेवणाची पंगत बसवली जाते त्यामुळे तेथे अन्न वाया जात नाही. गावखेड्यात गोर, गरीब, कामगार, शेतकरी लोक राहत असतात. त्यांना अन्नाची कदर असते. पण, शहरात मात्र बुफेच्या चालीमुळे जिकडे-तिकडे अन्न पडलेले दिसून येते तरीही त्यांना अन्नाविषयी काहीही वाटत नाही की अन्न पिकविणाऱ्या बळीराजाविषयी आस्था वाटत नाही. लाखोंची उधळण करून बुफेमध्ये अन्नाची नासाडी करतात. भारत देश हा कृषिप्रधान असून त्याच देशात अन्नाची नासाडी अशा प्रकारे केली जात असेल तर जग भारत देशाकडून काय बोध घेणार आणि येणारी पिढी काय शिकणार? ही आजची सत्य परिस्थिती आहे. या देशात बहुतांश लोक भुकेने व्याकूळ होऊन अन्नासाठी वणवण भटकत फिरत आहेत तर काही लोक भीक मागून पोट भरण्यासाठी संघर्ष करीत आहेत, तरी एक वेळचे त्यांचे पोट भरत नाही आणि आज याच बुफेच्या चालीमुळे अन्नाची नासाडी मोठ्या प्रमाणात होत आहे. अन्न कमवणारा बळीराजा उपाशीपोटी दिवसभर काम करत असतो आणि जगाला पोसत असतो; पण त्याच कष्टकरी बळीराजाच्या अन्नाची ही दुर्दशा होत असेल तर मात्र बळीराजाची कोणी कदर करावी? ही बुफेची प्रथा गावखेड्यातून नव्हे तर शहरातून आलेली आहे. हळूहळू तिला आता गावाकडे आणले जात आहे. त्यामुळे हा चिंतेचा विषय आहे. पोट भरण्यासाठी अन्नाचीच गरज असते म्हणून त्या अन्नाची नासाडी होण्यापासून वाचवावे.

**संगीता संतोष ठलाल**/७८२१८१६४८५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकरांच्या प्रचारार्थ सांगोल्यात पदयात्रा

**सांगोला, दि. ५ मे-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरात पदयात्रा काढण्यात आली. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पदयात्रेस प्रारंभ करण्यात आला. सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पदयात्रेचा समारोप महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी संग्रामसिंह जाधवराव, माजी नगराध्यक्षा राणी माने, माजी नगरसेवक आनंदा माने, माऊली तेली, अस्मिर तांबोळी, सोमेश यावलकर, माजी नगरसेविका छाया मेटकरी, माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार, उद्योगपती आनंद घोंगडे, ॲड. गजानन भाकरे, डॉ. मानस कमलापूरकर, शहराध्यक्ष प्रवीण जानकर, शहराध्यक्षा अनिता बेले, शितल लादे, वसंत सुपेकर, आनंद फाटे, चेअरमन लतिका मोटे, मेजर आनंदा व्हटे, काशिलिंग गाडेकर, काशिलिंग गावडे, अरुण पाटील, कीर्तीपाल बनसोडे, सूर्यकांत मेटकरी, समाधान नरुटे, सागर नरुटे, काकासाहेब लेंगरे, विशाल वाघ, सोमनाथ ठोकळे, राहुल दिवटे, सुनील पवार, शिवाजी गावडे, जय बनसोडे, ऋषी जानकर, समीर पाटील, अनुराधा माने, सुवर्णा जाधव, अश्विनी दोलतडे, सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे, फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर, शोभा जाधव, मनीषा दहिवडकर उपस्थित होते.

### काँग्रेस-बहुजन समाज पार्टीच्या उमेदवाराचा प्रचार करणाऱ्या रिक्षांचालकांवर गुन्हे दाखल

**सोलापूर, दि. ५ मे**

लोकसभा निवडणुकीतील काँग्रेस आणि बहुजन समाज पार्टीच्या उमेदवाराचा चालू स्थितीतील रिक्षातून ध्वनिक्षेपकावर प्रचार करणाऱ्या रिक्षाचालकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बझार पोलिस ठाण्यात पोलिस शिपाई अबरार दिंडोरे यांच्या फिर्यादीवरुन रमेश शिरसाट (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द, पोलिस नाईक सागर सरतापे यांच्या फिर्यादीवरून रियाजउद्दीन मौनोद्दीन अबादीराजे (रा. उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर) याच्याविरुध्द, पोलिस शिपाई धर्मराज भोये यांच्या फिर्यादीवरून रिक्षाचालक लिंगप्पा दत्तात्रय जाधव आणि दिनेश दत्तात्रय जाधव (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द,




एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोलिस शिपाई काशिनाथ वाघे यांच्या फिर्यादीवरुन सिध्दाराम महादेव देशमुख (रा. कलावती नगर, सोलापूर) याच्याविरुध्द, पोलिस शिपाई शंकर याळगी यांच्या फिर्यादीवरुन सिध्दलिंग शरणप्पा चिदगुंडी (रा. कलावती नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त यांनी सोलापूरात ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध घालण्याचे आदेश दिलेले आहेत. दिवसा प्रचाराकरीता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनिक्षेपकाचा वापर विशिष्ठ ठिकाणी थांबून करावा व ध्वनिक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध केला आहे. असे असतानाही सदर बझार आणि एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यांमधील वरील सर्वांनी रिक्षांवर काँग्रेसचे तसेच बहुजन समाज पार्टीच्या उमेदवाराचा फोटो लावून रिक्षा चालू स्थितीत असताना माईकवरून प्रचार केला. म्हणून त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### करमाळ्यात फ्लॅटचा कडीकोयंडा तोडून ९ लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. ५ मे-**

करमाळ्यातील कृष्णाजी नगरातील प्रथमेश अपार्टमेंटमधील फ्लॅटचा कडी कोयंडा तोडून चोरून चोरट्यांनी ८ लाख ६२ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले.याबाबत शुभम सुनिल सुंदेचामुथा (वय ३१, रा. मंगळवार पेठ, करमाळा, सध्या रा. प्रथमेश अपार्टमेंट, फ्लॅट नं. बी २, कृष्णाजी नगर, करमाळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



३ मे रोजीचे रात्री १२ ते पहाटे पावणे सहाच्या दरम्याने अज्ञात चोरट्याने प्रथमेश अपार्टमेंटमधील शुभम सुंदेचामुथा यांच्या फ्लॅटचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचा नेकलेस, २० ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, १७ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडल, ७०० ग्रॅम वजनाचे चांदीची दोन ताटे, ६५० ग्रॅम वजनाचे चांदीचे पाच नग ग्लास, २०० ग्रॅम वजनाचे ४ चांदीच्या वाट्या, १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे निरंजन आणि ७४ हजार रुपये रोख असा ८ लाख ६२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील पुढील तपास करीत आहेत.

### फातिमा शेख यांचे निधन

**अकलूज, दि.२ मे -**

राऊतनगर-अकलूज येथील फातिमा शब्बीर शेख (वय ५६) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सूना नातवंडे असा परिवार आहे. अकलूज येथील माळीनगर रोडवरील दफनभूमीत त्यांच्यावर दफन विधी करण्यात आले.



**CHANGE OF NAME**

Today my name is **"IFAT FAYAJ BAGAN"** previously called **"IFATBANU MAHEBOOB PATEL"** I expressly authorise and request all persons in general and relatives and friends in perticular at all times hereafter to designate and address me, my husband, my children's and remitter issues by such name **"IFAT FAYAJ BAGAN"**

# कचरा डेपोतील आग आटोक्यात धग मात्र कायम

**मनपा अग्निशामक दलाचे जवान २४ तास कार्यरत**

**3 दिवसात १२५ पाण्याच्या गाड्यांचा वापर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोस लागलेली आग आज तिसऱ्या दिवशी बऱ्यापैकी आटोक्यात आली मात्र अद्यापही धग बाकी आहे. गेल्या तीन दिवसात महापालिका अग्निशामक दलाच्या वतीने शर्तीचे प्रयत्न सुरू असून आत्तापर्यंत एकूण १२५ पाण्याच्या गाड्यांचा वापर करण्यात आला आहे. दरम्यान, प्रदूषणामुळे परिसरातील लोकांना श्वसनाचा त्रास सहन करावा लागला.



तुळजापूर रोडवरील बायो एनर्जी प्रकल्प येथील कचरा डेपोस शुक्रवारी ३ मे २०२४ रोजी सायंकाळी आग लागली. अधिक तापमानामुळे कचऱ्यातील मिथेन वायू पेट घेऊन ही आग लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. येथील एकूण ५४ एकर जागेपैकी सुमारे २५ एकर परिसर या आगीने

पेट घेतला होता. महापालिका अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही आग विझवण्यासाठी फायर फायटर गेली तीन दिवस २४ तास युद्ध पातळीवर कार्यरत आहेत. धुराचे लोट व दुर्गंधी दूरवर शहरात पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज ५० ते ६० पाण्याच्या गाड्या अशा पद्धतीने या तीन दिवसात एकूण १२५ पाण्याच्या गाड्यांचा वापर आग विझवण्यासाठी करण्यात आला आहे. अग्निशामक दलाचे जवान २४ तास या कामासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करीत आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर सध्या पाण्याचा मारा करण्यात येत आहे, अशी माहिती अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे यांनी दिली.

**कॅनॉलच्या पाण्याचा वापर करणार : उपायुक्त घोलप**

कचरा डेपो येथील आग सद्यस्थितीत आटोक्यात आली आहे. धूर कमी झाला आहे मात्र ढिगाऱ्याखाली धग आहे. आग पूर्णपणे विझवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कॅनॉलचे पाणी कचरा डेपोपर्यंत पोचविण्यासाठी पंप लावून नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे मुबलक पाणी मिळून पाण्याचा मारा मोठ्या प्रमाणात करता येणार आहे. आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत, अशी माहिती महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी दिली.

**विमानातून पाणी फवारणीची गरज**

या ठिकाणी पाण्याची स्प्रिंकलर्स सिस्टीम बसवण्याची गरज आहे. येथील आग जरी आटोक्यात आली असली तरी धग बाकी आहे. सद्यस्थितीत वाढत्या तापमानामुळे ढिगाऱ्या खाली आग पुन्हा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पूर्णपणे आग विझवण्यासाठी विमानाच्या साह्याने पाणी फवारणी करण्याचा प्रयोग करण्यात यावा, अशा सूचनाही सुजाण नागरिकांकडून केल्या जात आहेत.

**संबंधित मक्तेदारांवर काय कारवाई ?**

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोस मोठ्या प्रमाणात आग लागली. वास्तविक पाहता येथील मक्तेदाराकडून परिसरात अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित मक्तेदाराचे याकडे दुर्लक्ष झाले का ? परिणामी याप्रकरणी संबंधित मक्तेदारावर काय कारवाई होणार, असा प्रश्न आता उपस्थित होणार होत आहे.

## दहा वर्षे विकासापासून वंचित ठेवणाऱ्यांचा पराभव करा

**सुशिलकुमार शिंदे यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ मे-**

दक्षिणच्या मतदारांनी दोनवेळा भाजपाच्या खासदारांना निवडून दिले. विकास झाला नाही. काँग्रेसच्या काळात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. त्यामुळे भाजपाच्या दोन खासदारांकडून सोलापूरला विकासापासून वंचित ठेवण्यात आला आहे. त्यांना पराभूत करा, असे आवाहन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी केले.

मंद्रुप येथील महाविकास आघाडीच्या प्रचार सांगता सभेत ते बोलत होते. यावेळी माजी आ. दिलीप माने, बाळासाहेब शेळके, भीमाशंकर जमादार, इंदुमती अलगोंडा-पाटील, धर्मराज



काडादी, सिद्धाराम चाकोते, माजी सभापती गुरूसिध्द म्हेत्रे, बाबा मिस्त्री, शिवानंद झळके, रमेश नवले, अनंत म्हेत्रे, मोतीराम चव्हाण, प्रभाकर कोरे, पिरप्पा म्हेत्रे, रेवणसिध्द मेंडगुदले, महंमद शेख, उमाशंकर रावत, अमृता चव्हाण, सिध्दू खरात, बाबुलाल लिगेवान, अमोगसिध्द पुजारी उपस्थित होते.

भाजपाकडून सर्वधर्मसमभावाच्या विचाराला हरताळ फासून जातीयवाद निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भाजपाने सिध्देश्वर साखर कारखाना चिमणी पाडून शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त केला आहे म्हणून शेतकरीविरोधी भाजपाला धडा शिकविण्यासाठी काँग्रेसला निवडून देण्याचे आवाहन माजी केंद्रीयमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी केले.

माजी आ. माने म्हणाले, भाजपाकडून जनहित व शेतकरीविरोधात काम करण्यात येत आहे. भाजपाकडून स्वार्थी राजकारण होत असल्याने मतदार कंटाळले आहेत. भविष्यात पाणीप्रश्न व शेतकरी समस्या सोडविण्यासाठी काँग्रेसला विजयी करा.

## सिध्देश्वर परिवाराकडून आ. प्रणितींना मोठे मताधिक्य देणार

**शेतकरी, कामगारांच्या मेळाव्यात काडादी यांचा निर्धार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

विमानसेवेच्या नावाखाली भाजपने श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडल्यानंतर शेतकरी सभासद आणि कामगारांचे अश्रू पुसण्यासाठी सर्वप्रथम धावून आलेल्या प्रणिती शिंदे यांना सोलापूर लोकसभा मतदारसंघातून विजयी करण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभे करण्याचे आवाहन सिध्देश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनी केले.

त्यांच्या हाकेला प्रतिसाद देत शेतकरी व कामगारांनी मोठे मताधिक्य देऊन प्रणिती शिंदे यांना निवडून लोकसभेत पाठविण्याचा निर्धार केला. रविवारी, श्री सिध्देश्वर



सहकारी साखर कारखान्याच्या कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन येथे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती यांच्या प्रचारार्थ सिध्देश्वर परिवाराने शेतकरी व कामगारांचा भव्य मेळावा आयोजित केला होता. त्यावेळी काडादी बोलत होते. याप्रसंगी मंचावर माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, उमेदवार प्रणिती शिंदे, माजीमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते, प्रकाश वानकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अमर पाटील आदी उपस्थित होते. प्रारंभी कारखान्याचे संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कारखान्याचे अध्यक्ष अण्णाराज उर्फ पुष्पराज काडादी यांनी प्रास्ताविकात उपस्थितांचे स्वागत करीत सोलापूरच्या विकासासाठी प्रणिती शिंदे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते यांनी आभार मानले.

## 'बाप झाला की पोरगा' धोरणाला मुठमाती द्या

**आ. गोपीचंद पडळकर : आ. राम सातपुते यांच्या प्रचारार्थ घोंगडी बैठका**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे-**

सोलापूर मतदारसंघात एका बाजूला ऊसतोड कामगारांचा मुलगा तर दुसऱ्या बाजूला प्रस्थापित लढत आहेत. बाप झाला की पोरगा, पोरगा झाला की नातू हे इथले धोरण राज्यभर चालू आहे. या प्रस्थापितांना विस्तापित करा. त्यांच्या या धोरणाला मुठमाती देण्यासाठी सर्वांनी राम सातपुते यांच्या मागे खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन भाजपाचे स्टार प्रचारक आ. गोपीचंद पडळकर यांनी केले.



सोलापूर मतदारसंघातील मंगळवेढ्यातील नंदेश्वर, द.सोलापूरातील हत्तूर,मोहोळ येथील सावळेश्वर येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ते त्यावेळी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत या भागातील शेतकऱ्यांचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी अनेक योजनेसाठी निधी दिला असून लवकरच त्या पूर्ण होऊन पाण्याचा प्रश्न सोडविला जाईल. तरुणांसाठी, महिलांसाठी राबविलेल्या योजना याविषयी माहिती देत भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार राम विठ्ठल सातपुते यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले. यावेळी आ. समाधान आवताडे, माऊली हळणवर, शशिकांत चव्हाण, विश्रांती भुसनर, सुजाता वगरे, बापूसाहेब मेटकरी, धनाजी गरंडे, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## द्राक्ष बागायतदारांचे प्रश्न सोडवणार

**धैर्यशिल मोहिते-पाटील : मीनी एमआयडीसी, अर्धवट सिंचनाची कामे, स्थानिक तरूणांच्या रोजगारावर भर**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ५ मे-**

माढा तालुक्यातील एमआयडीसीमध्ये स्थानिक तरूणांना नोकरी, नवीन मीनी एमआयडीसीची निर्मिती, अर्धवट सिंचनाची कामे पूर्ण करणे, कुर्डूवाडी रेल्वे कारखान्यास वाढीव निधी, तालुक्यात उसाव्यतीरिक्तही इतर फळबागा असल्याने हमी भावासाठी प्रयत्न याबरोबरच कृषीमित्र द्राक्षबागायतदारांचे प्रश्न सोडवणे, मार्गदर्शक नितीन कापसे यांच्यामार्फत शेतकऱ्यांच्या बेदाण्याला शिवामृतमार्फत मार्केटिंग करून भाव मिळवून देणार असल्याचे प्रतिपादन माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहीते-पाटील यांनी केले. कुर्डूवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेद्वार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिह मोहिते-पाटील, माजी आ. नारायण पाटील, शिवसेना नेते धनंजय डिकोळे, नगराध्यक्ष समीर मुलाणी, दादा साठे, संजय पाटील-घाटणेकर, दत्ता गवळी, नितीन कापसे, हरी बागल, आनंद टोणपे उपस्थित होते. धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, २०१९ च्या निवडणुकीत माहिते-पाटील घराण्याकडून मोठी चूक झाली. ती चूक यावेळी सुधारावयाची आहे. देव



दाखवतो म्हणून भाजपावाल्यांनी त्यावेळी फसवले. देव तर दिसला नाहीच. पण गाडव मात्र दिसले आणि ते गाडव काहीही कामाचे निघले नसल्याचे नाव न घेता भाजपाचे उमेदवार खा. नाईक-निंबाळकर यांच्यावर टीकात्र सोडले.

## प्रचाराच्या शेवटच्या दिवशी पदयात्रा; आ. प्रणिती शिंदेंचे जोरदार शक्तीप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

हे मतदान लोकशाहीसाठी, गोरगरिबांसाठी आणि लोकशाही वाचविण्यासाठी आहे. या लढ्यात आपण सर्वांनी साथ दिली. खांद्याला खांदा लावून ही लढाई माझ्यासोबत लढलात. प्रणिती यांनी शहरात पदयात्रा काढत प्रचाराचा शेवट केला. यावेळी सोलापूरच्या विकासासाठी तुमच्या सोलापूरच्या लेकीला मतदान करा. तसेच ही निवडणूक माझी एकट्याची असली तरी विजय तुम्हा सर्वांचा असेल, असे ही प्रणिती शिंदे यावेळी म्हणाल्या.

कन्ना चौक येथून या पदयात्रेला सुरूवात झाली. ही पदयात्रा, जोडभावी पेठ, चाटला कॉर्नर, घोंगडे वस्ती, गुरूदत्त चौक, विश्रांती चौक, बलिदान चौक, मंगळवार पेठ पोलिस चौकी, सराफ कट्टा, माणिक चौक, दत्त चौक, राजवाडे चौक, नवी पेठ, मेकनिक चौक, भागवत टॉकिज या मार्गे निघाली. पदयात्रेचा शेवट छत्रपती शिवाजी महाराज चौकात झाला. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ निघालेल्या पदयात्रेमध्ये माजी गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, माजी आमदार आडम मास्तर, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव सचिव बंटी शेळके, निवडणूक प्रमुख प्रकाश यलगुलवार, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी आमदार दिलीप माने, ऊत्तमप्रकाश खंदारे, विश्वनाथ चाकोते, माजी महापौर महेश कोठे, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल, शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, गणेश वानकर, शिवसेना नेते अजय दासरी, अमर पाटील, गणेश वानकर, कार्याध्यक्ष नंदकुमार पवार, राष्ट्रवादीचे भारत जाधव, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अबू तालिब डोंगरे, यू. एन बेरीया, मनोहर सपाटे, प्रताप चव्हाण, एम एच शेख, विष्णू कारमपुरी, महेश धाराशिवकर, यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**प्रणिती एकटी निवडणूक लढवायला समर्थ**

या भव्य पदयात्रेच्या प्रारंभी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, सोलापूर लोकसभा मतदार संघात सत्ताधाऱ्यांचे पाच आमदार असताना देखील प्रणिती शिंदे एकटी असून ती ही निवडणूक लढवायला समर्थ आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी ती एकटी फाईट करू शकते. ती सोलापूरकरांना न्याय मिळवून देईन, असा विश्वास आता जनतेमध्ये निर्माण झाला असल्याचे मत शिंदे यांनी व्यक्त केले.

## खुनाचा प्रयत्न : आरोपीस उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

कासेगाव, ता. पंढरपूर येथे कुत्रा भुंकल्याच्या कारणावरून झालेल्या खुनी हल्ल्याप्रकरणी आरोपी माऊली उर्फ हरिदास वाघमारे रा. कासेगाव, ता. पंढरपूर यास मुंबई उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.



या प्रकरणाची हाकिकत अशी की, कासेगाव, ता. पंढरपूर येथे आरोपी वाघमारे कुटुंबियांचा पाळीव कुत्रा घटने दिवशी फिर्यादीवर भुंकलेच्या कारणावरून झालेल्या भांडणात फिर्यादीवर सत्तुर ने वार करून खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून आरोपी माऊली उर्फ हरिदास वाघमारे यांच्याविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे भा. द. वि. कलम ३०७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. आरोपीने पंढरपूर सत्र न्यायालयात केलेल्या अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावण्यात आला होता. त्या निकाला विरुद्ध आरोपीने ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात होऊन उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. फिर्यादीचा खून करण्याचा कोणताही उद्देश नव्हता असे घटनेवरून दिसून येते असा युक्तिवाद आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी मुंबई उच्च न्यायालयातील अटकपूर्व जामीनाच्या सुनावणी दरम्यान केला. न्यामुर्तींनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपी हरिदास माऊली वाघमारे याचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. याप्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. राजश्री न्यूटन यांनी काम पाहिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भारतीय बुद्धिबळासाठी ६५ कोटी रुपयांची तरतूद



**चेन्नई :** अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने (एआयसीएफ) भारतीय बुद्धिबळ इकोसिस्टम सुधारण्यासाठी ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एआयसीएफच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तळागाळातील खेळाडूंसह व्यावसायिक खेळाडूंना आर्थिक आणि संस्थात्मक पाठबळ देण्यासह महत्त्वाच्या उपक्रमांवर इतर निर्णय घेण्यात आले. देशभरात बुद्धिबळाचा व्यापक स्तरावर प्रचार करण्यासाठी एआयसीएफ दोन उपक्रम - एआयसीएफ प्रो आणि एआयसीएफ पॉप्युलर उपक्रम करणार आहे. बैठकीत चर्चा करण्यात आलेल्या इतर प्रस्तावांपैकी एक बुद्धिबळ विकास निधी आणणे, खेळाडूंच्या करारासह मजबूत आर्थिक पाठबळ आणि स्तरावरील प्रशिक्षण, उपक्रम राबविणार आहे. तसेच बुद्धिबळपटूंना पुरस्कार आणि सात ते एकोणीस वयोगटातील खेळाडूंना ५०,००० रुपयांपर्यंतचे निधी वितरित करण्यात येणार आहे.

### मनिका बत्राचा पहिला विजय

**रियाध :** येथे सुरु असलेल्या सौदी स्मॅश २०२४ टेबल टेनिस स्पर्धेत भारतीय टेबल टेनिसपटूंसाठी पहिला दिवस कठीण राहिला. केवळ मनिका बत्रा हिने एकेरीच्या पहिल्या फेरीतील सामना जिंकला. पुरुष आणि महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत अचंता शरथ कमल, श्रीजा अकुला व मनिका बत्रा हे भारतीय खेळाडू होते, मात्र केवळ मनिका विजयी ठरली. मनिकाने अंतिम ६४ च्या फेरीत रोमानियाच्या ॲण्ड्रिया ड्रॅगोमनचा सरळ गेममध्ये पराभव केला. पहिल्या गेममध्ये चांगली सुरुवात करत मनिकाने ११-६ ने जिंकून १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये ड्रॅगोमनने ११-११ अशी परतफेड केली, पण मनिकाने अनुभव पणाला लावत दुसरा गेम जिंकला. मनिकाने तिसऱ्या गेममध्ये वर्चस्व राखत सामना ११-८ असा जिंकला. श्रीजा अकुला हिला पहिल्या फेरीच्या सामन्यात पोर्तुगालच्या जिएनी शाओ हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. शरथ कमलने प्रारंभी २-० अशी आघाडी घेतल्यानंतरही नायजेरियाच्या क्वाद्री अरुणाकडून २-३ ने पराभव सहन करावा लागला.

### इगा स्वियातेकला माद्रिद ओपनचे विजेतेपद

**माद्रिद :** अव्वल मानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकने तीन तास ११ मिनिटांच्या संघर्षपूर्ण अंतिम लढतीत बेलारूसच्या आर्यना सबालेन्कावर मात करून प्रथमच माद्रिद ओपन ट्रॉफी जिंकली. निर्णायक सामन्यात २२ वर्षीय इगा स्वियातेकने १-३ ने पिछाडीवर राहिल्यानंतर एकूण तीन मॅच पॉइंट्स वाचवत जोरदार मुसंडी मारली व सबालेन्कावर ७-५, ४-६, ७-६ (९/७) असा विजय मिळविला. या विजयाबरोबरच स्वियातेकने कारकिर्दीतील २० वे विजेतेपद आणि डब्ल्यूटीए १००० स्तरावरील नववे विजेतेपद पटकावले. या सामन्यात खेळताना मला राफेल नदालकडून प्रेरणा मिळाली. मानसिकदृष्ट्या पाऊल उचलण्याची नदालची क्षमतेमुळे मला प्रोत्साहन मिळाले, असे इगा म्हणाली. नदालमुळेच मला माद्रिद ओपनचे विजेतेपद जिंकण्याची प्रेरणा मिळाली असे ती म्हणाली.

# जडेजाचा चमकदार अष्टपैलू खेळ

## चेन्नई किंग्जचा पंजाब किंग्जवर 'सुपर' विजय

◆ **धर्मशाळा, ५ मे**

हिमाचल प्रदेशच्या निसर्गरम्य वातावरणात खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात रवींद्र जडेजाच्या सुंदर अष्टपैलू खेळाच्या जोरावर गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्जने (सीएसके) पंजाब किंग्जवर २८ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच सीएसकेने ११ सामन्यातील १२ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली. राजस्थान (१६) व कोलकाता (१४) पहिले दोन स्थानावर कायम आहे, परंतु चेन्नईने मुसंडी मारल्यामुळे लखनौ (१२) व हैदराबादची अनुक्रमे चौथ्या व पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे.

पंजाब किंग्जचा हंगामी तकर्णधार सॅम करनने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत गोलंदाजांनी सीएसकेला डावाच्या प्रारंभीच जबरदस्त हादरा दिला. त्यांचा सलामीवीर अजिंक्य रहाणेला (९) अर्शदीप सिंगने कॅगिसो रबाडाकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. परंतु त्यानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड (३२) व डॅरील मिचेलने (३०) जबरदस्त फलंदाजी करत सीएसकेचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ५७ धावांची भागीदारी केली. पुढे रवींद्र जडेजाने




अष्टपैलू रवींद्र जडेजा सामनावीर

सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. त्याला मिचेल सॅण्टनर व शार्दुल ठाकूरची उत्तम साथ मिळाली, परंतु महेंद्रसिंह धोनी भोपळा न फोडताच तंबूत परतला. मात्र तोपर्यंत सीएसकेने १८.५ षटकांत ८ बाद १५० धावांचा टप्पा गाठला होता. यात चौदा धावांची भर पडत नाही तोच जडेजा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगच्या चेंडूला बळी पडला. रवींद्र जडेजाने २६ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ४३ धावांचे योगदान दिले. पुढे तुषार देशपांडे व रिचर्ड ग्लिसनने नाबाद खेळी करत सीएसकेला मर्यादित षटकांत ९ बाद १६७ धावा रचून दिल्या व पंजाब किंग्जला विजयासाठी १६८ धावा काढण्याचे आव्हान दिले. पंजाबकडून राहुल चहर व हर्षल पटेलने प्रत्येकी ३ बळी, अर्शदीप सिंगने २, तर सॅम करनने एक बळी मिळविला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्जचे फलंदाज गडबडले. पंजाबने दोन षटकांत जॉनी बेअरस्टो (७) व रिली रोसोव (०) हे दोन फलंदाज अवघ्या नऊ धावांत गमावले, परंतु सलामीवीर प्रभसिमरन सिंग (३०) व शशांक सिंगने (२७) संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु पुन्हा एकदा पंजाबची घसरगुंडी उडाली व त्यांनी कर्णधार सॅम करन (७), जितेश शर्मा (०) व आशोतुष शर्माच्या (३) रुपाने आणखी तीन मोहरे गमावले. त्यामुळे त्यांच्या हातातून विजय निसटत गेला. १२.३ षटकांत पंजाबची ७ बाद ७८ अशी दयनीय स्थिती झाली होती. पुढे हरप्रीत ब्रारने एक बाजू सांभाळत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, परंतु दुसऱ्या टोकावरून हर्षल पटेल (१२) व राहुल चहर (१६) बाद होत गेले. हरप्रीत व कॅगिसो रबाडाने नाबाद खेळी केली,परंतु त्यांना मर्यादित षटकांत ९ बाद १३९ धावांपर्यंतच मजल मारता आली. सीएसकेकडून रवींद्र जडेजाने २६ धावंत ३ बळी, तुषार देशपांडे व सिमरन सिंगने प्रत्येकी २ बळी, तर मिचेल सॅण्टनर व शार्दुल ठाकूरने प्रत्येकी १ बळी मिळवत पंजाबला ९ बाद १३९ धावांत रोखले. (वृत्तसंस्था)

# कुस्तीपटू बजरंग पुनिया तात्पुरता निलंबित

**डोपिंग चाचणीत अनुपस्थित**

◆ **नवी दिल्ली, ५ मे**

कुस्तीपटू बजरंग पुनिया १० मार्च रोजी सोनीपत येथे निवड चाचणी दरम्यान डोपिंग चाचणीसाठी मूत्र नमुना सादर करण्यात अयशस्वी ठरल्याबद्दल राष्ट्रीय उत्तेजक विरोधी एजन्सीने (नाडा-) त्याला तात्पुरते निलंबित केले आहे. या निर्णयामुळे जुलैमध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरण्याची पुनियाची संधी वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

नाडाच्या २०२१ च्या अनुच्छेद ७.४ नुसार या प्रकरणातील सुनावणीत अंतिम निर्णय होण्यापूर्वी बजरंग पुनियाला कोणत्याही स्पर्धेत किंवा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यापासून तात्काळ निलंबित करण्यात येत आहे, असे नाडाने म्हटले आहे.

हे आरोप कायम राहिल्यास टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या बजरंग पुनियाला पुढील महिन्यात होणाऱ्या



निवड चाचणीपासून रोखले जाईल. आतापर्यंत कोणत्याही भारतीय कुस्तीपटूने ६५ किलो वजनी गटात कोटा स्थान मिळवलेले नाही. सुजीत कलकल ९ मेपासून इस्तंबूल येथे होणाऱ्या जागतिक पात्रता स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

विशेष म्हणजे पुनियाने काही महिन्यांपूर्वी एक्सपायर्ड डोप कलेक्शन किट असल्याचा आरोप करणारा व्हिडीओ शेअर केला होता व त्यानंतर त्याने डोप कंट्रोल अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन करण्यास नकार दिला. नाडाचे अधिकारी आपल्या तक्रारीकडे लक्ष देत नाही, असा युक्तिवादही त्याने केला होता.

नकार दिल्यास डोपिंग विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल नोटीस दिली जाईल, असे डोप अधिकाऱ्यांनी कुस्तीपटू बजरंग पुनियाला सूचित केले होते.

तथापि बजरंग पुनियाने सतत आपल्या विधानाची पुनरावृत्ती केली आणि डोप नमुना देण्यास नकार देऊन ताबडतोब घटनास्थळ सोडले, असे डीसीओच्या अहवालात म्हटले आहे.

मूत्र नमुना देण्यास नकार दिल्याबद्दल लेखी स्पष्टीकरण देण्यासाठी ३० वर्षीय कुस्तीपटू बजरंग पुनियाकडे ७ मे पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. उत्तर न दिल्यास हे प्रकरण डोपिंगविरोधी शिस्तपालन समितीकडे निर्णयासाठी पाठवले जाईल, असेही पत्रात म्हटले आहे.

विशेष म्हणजे, निलंबन पत्र आता युनायटेड वर्ल्ड रेसलिंग (यूडब्ल्यूडब्ल्यू) द्वारे मान्यताप्राप्त अ.भा. कुस्ती महासंघाऐवजी कुस्ती महासंघाच्या (डब्ल्यूएफआय) आता बंद पडलेल्या अस्थायी समितीला पाठविले. (वृत्तसंस्था)

# दीपक भोरियाने आयबीए विजेता

◆ **माद्रिद, ५ मे**

जागतिक स्पर्धेतील पदक विजेता भारतीय मुष्टियोद्धा दीपक भोरियाने माद्रिद, स्पेन येथे आयबीए चॅम्पियन्स नाईटमध्ये स्पेनच्या विश्व पदक विजेत्या मार्टिन मोलिनाचा पराभव केला. आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध संघटनेच्या वतीने 'आयबीए चॅम्पियन्स नाईट' आयोजित केली जाते आणि हा संस्थेचा या व्यावसायिक मुष्टियुद्ध सामन्यांचे आयोजन करण्यात येते. या लढतीत प्रत्येकी तीन मिनिटांच्या आठ किंवा दहा फेऱ्या असतात. सध्या, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) वाईट कार्यप्रणालीमुळे आयबीएवर बंदी घातली आहे आणि ते २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये होणाऱ्या मुष्टियुद्ध स्पर्धेत सहभागी नाही.



दीपक भोरियाला विजयी घोषित करताना पंच

पहिल्या ऑलिम्पिक पात्रता फेरीत पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता सिद्ध करण्यात अपयशी ठरल्यानंतर आणि दुसऱ्या पात्रता फेरीसाठी त्याच्या जागी अमित पांघलने भारतीय संघात स्थान मिळविल्यानंतर दीपक भोरियाने (५१ किलो) आपला मोर्चा व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे वळविला.'आयबीए चॅम्पियन्स नाईट'मध्ये दीपकने स्थानिक मुष्टियोद्धा मार्टिन मोलिना या प्रतिस्पर्ध्याला तोंड देत आपला दर्जेदार खेळाचे प्रदर्शन करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. उंचीचा फायदा मिळाल्याने, दीपकने डाव्या हुकसह चांगली सुरुवात केली. पहिल्या फेरीनंतर दीपकने पुढच्या दोन फेऱ्यांमध्ये वर्चस्व राखून मार्टिनला बॅकफुटवर फेकले. (वृत्तसंस्था)


# हैदराबाद मुंबईवर वर्चस्व गाजविणार?

◆ **मुंबई, ५ मे**

सतराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी येथे आत्मविश्वासाने भरलेला सनरायझर्स हैदराबाद मुंबई इंडियन्स संघाविरुद्ध वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न करणार आहे. आयपीएलच्या गुणतालिकेत मुंबई तळाच्या स्थानी असून हैदराबाद अव्वल चार क्रमांकात आहे.

आयपीएल गुणतालिकेत १० सामन्यांत सहा विजय आणि चार पराभवांसह १२ गुणांसह चौथ्या स्थानावर असलेले सनरायझर्स हैदराबाद अष्टपैलू कामगिरी करण्यासाठी आणि विशेषत: आपल्या गोलंदाजी विभागात सुधारणा करण्यास उत्सुक असेल.

पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील हैदराबाद संघ राजस्थान रॉयल्स (१६ गुण), कोलकाता नाईट रायडर्स (१४ गुण) आणि लखनौ सुपर जायण्ट्स (१२ गुण) यांच्यासह अंतिम चारमध्ये आपले स्थान बळकट करण्यास



पॅट कमिन्स



हार्दिक पांड्या

प्रयत्नशील आहे.

चेन्नई सुपर किंग्ज (१० गुणांसह ५ व्या स्थानी) आणि दिल्ली कॅपिटल्स (१० गुणांसह ६ व्या स्थानी) हे संघ अव्वल चारमध्ये स्थान मिळविण्यास उत्सुक आहे. अशा परिस्थितीत कोणताही संभाव्य धोका दूर करण्यासासाठी २०१६ च्या विजेत्या हैदराबाद संघाला तीव्र लढाई द्यावी लागणार आहे.

येथील खेळपट्ट्या सामान्यत: फलंदाजीसाठी अनुकूल असतात आणि या मैदानावरील लहान सीमारेषेमुळे २०० पेक्षा जास्त धावा होतात.

**आजचा आयपीएल सामना**

**मुंबई इंडियन्स वि. सनरायझर्स हैदराबाद**

**स्थळ :** वानखेडे स्टेडियम, मुंबई

**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

अव्वल स्थानावर असलेल्या राजस्थान रॉयल्सला गत सामन्यात अवघ्या एका धावेने पराभूत केल्यामुळे सनरायझर्स हैदराबादचा आत्मविश्वासाने उंचावला असेल. त्यांच्या गोलंदाजांनी रोमहर्षक विजय मिळवून दिला. ट्रॅव्हिस

हेड (३९६ धावा), अभिषेक शर्मा (३१५) आणि हेनरिक क्लासेन (३३७) हैदराबादच्या फलंदाजीतील महत्त्वपूर्ण खेळाडू आहेत, पण दक्षिण आफ्रिकेचा एडन मार्कराम आतापर्यंत संमिश्र धावा करत आला व तो आता मोठी खेळी उभारण्यासाठी उत्सुक असेल. नितीश कुमार रेड्डी (२१९ धावा) गत काही सामन्यांमध्ये हैदराबादसाठी सर्वात आशादायक खेळाडू म्हणून उदयास आला आहे.

डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज टी. नटराजन् (१५ बळी) अचूक मारा करत हैदराबादसाठी उपयुक्त गोलंदाज ठरेल. तो पर्पल कॅप्सच्या शर्यतीत मुंबई इंडियन्सच्या जसप्रीत बुमराहच्या (१७) पाठोपाठ आहे.

शनिवारी रात्री रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सवर मात करताना पाच वेळा विजेता मुंबई इंडियन्स पुन्हा तळाशी घसरला.११ सामन्यांमध्ये केवळ तीन विजयांसह मुंबईचे आव्हान संपले आहे.

तथापि, आगामी टी-२० विश्वचषकासाठी मुंबई इंडियन्सचे प्रमुख भारतीय खेळाडू रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या आपल्या वैयक्तिक फॉर्मवर लक्ष केंद्रित करतील. (वृत्तसंस्था)

## बंगळुरूच्या आशा धूसर : अजय जडेजा

◆ **बंगळुरू, ५ मे**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या (आरसीबी) गोलंदाज व फलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत गुजरात टायटन्सवर विजय मिळविला असला तरीही आरसीबीच्या प्ले-ऑफच्या आशा धूसर झाल्या असून ते अजूनही बरेच पिछाडीवर आहे, असे भारताचा माजी अष्टपैलू अजय जडेजा म्हणाला.

आरसीबीने शनिवारी गुजरात टायटन्सविरुद्धच्या १४८ धावांचा पाठलाग करताना चार गडी व ३८ चेंडू राखून विजय मिळवला. हा विजय गोलंदाजांनी उभारला होता.

फाफ डु प्लेसिस (६४) व विराट कोहलीने (४२) पॉवरप्लेमध्ये ९२ धावांची भागीदारी केली. कोहली व डु प्लेसिसची फलंदाजी पाहिल्यानंतर आम्हाला आनंद झाला, पण खरी कामगिरी गोलंदाजांनी केली. एकूणच आरसीबीने ऐतिहासिक संघर्ष केला आहे, असे तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# मुंबई सिटीने जिंकले आयएसएल विजेतेपद

## मोहन बागानच्या आशेवर फेरले पाणी

◆ **कोलकाता, ५ मे**

विपीन सिंगच्या शानदार गोलच्या बळावर मुंबई सिटी एफसीने जोरदार मुसंडी मारत मोहन बागान सुपर जायण्टवर ३-१ अशा गोलफरकाने शानदार विजय नोंदवत दुसऱ्यांदा इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

६२ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळल्या गेलेल्या या सामन्यादरम्यान काही चाहते मोहन बागानचा जय-जयकार करत होते, परंतु सामन्याच्या निकालामुळे त्यांच्यापैकी बहुतेकांना निराश




विजयाचा आनंद साजरा करताना मुंबई सिटी एफसीचे खेळाडू

होऊन मायदेशी परतावे लागले, कारण त्यांचा लाडका मोहन बागान गत हंगामातील आपली जादू पुन्हा करू शकला नाही.

मध्यंतरापूर्वी जेसन कमिंग्जच्या गोलच्या जोरावर मोहन बागानने सुरुवातीला आघाडी घेतली. तथापि, अल्बर्टो नोगुएराने दिलेल्या पासवर जॉर्ज पेरेरा डायझने अचूकपणे गोल नोंदवून मुंबई सिटी एफसीला ५३ व्या मिनिटाला बरोबरी साधली. बेंचवरून उतरून बिपीन सिंगने ८१ व्या मिनिटाला विजयी गोल केला. या विजयाबरोबरच मुंबई सिटीने २०२०-२१ हंगामातील आपल्या यशाची पुनरावृत्ती केली. त्या सामन्यातही बिपीनने महत्त्वपूर्ण गोल केला होता.

उत्तरार्धात ९ मिनिटांचा अतिरिक्त वेळ मिळूनही मोहन बागानला बरोबरी साधता आली नाही. बदली खेळाडू जेकब वोजटसने डेथ इंज्युरी टाईममध्ये सातव्या मिनिटाला गोल करून 'द आयलँडर्स'चा विजय निश्चित केला. (वृत्तसंस्था)

## भारताला मास्टर्स टेनिसचे उपविजेतेपद

◆ **मेक्सिको, ५ मे**

मेक्सिको शहरात आयोजित फ्रेड पेरी चषक आयटीएफ मास्टर्स टेनिस स्पर्धेत भारतीय संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. ५० वर्षांवरील वयोगटाच्या प्रौढांच्या टेनिस स्पर्धेत अंतिम सामन्यात भारताला इटलीकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला.

स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत अभूतपूर्व फॉर्ममध्ये असलेल्या नितीन किर्तनेला ग्रेगियानिनकडून २-६, ७-५, ६-४ असा पराभव सहन करावा लागला. त्यामुळे भारताच्या आवाक्यातील विजेतेपद हातातून निसटले. तत्पूर्वी, लॉरेन्झो पेनिसीने जगदीश तन्वरवर विजय नोंदवत इटलीला दमदार सुरुवात केली. इटालियन खेळाडूंनी दुहेरीच्या साममन्यात भारताला पुढे चाल दिली, मात्र परतीच्या एकेरीच्या सामन्यात



किर्तनेला पराभवाचा सामना करावा लागला.

भारतीय खेळाडूंनी या स्पर्धेत आपल्या खेळाची चांगली छाप सोडली, त्यांनी गुरुवारी ब्रिटनचा २-१ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. किर्तने हा भारताच्या शानदार विजयाचा शिल्पकार होता. त्याने एकेरी आणि दुहेरीचे दोन्ही सामने जिंकून भारताला ब्रिटनविरुद्ध विजय मिळवून दिला. भारताने साखळी फेरीत कॅनडा, फ्रान्स आणि तुर्की सारख्या देशांना पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला. (वृत्तसंस्था)

# भारत-पाकिस्तान सामना ६ ऑक्टोबर रोजी

■ **बांगलादेशमध्ये महिलांची टी-२० विश्वचषक स्पर्धा**

■ **अ गटात भारत, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, न्यूझीलंड व पात्रता संघ**

◆ **दुबई, ५ मे**



आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धा बांगलादेशमध्ये होणार असून ऑक्टोबरमध्ये महिला क्रिकेटच्या महाकुंभाला सुरुवात होणार आहे. ६ ऑक्टोबर रोजी सिल्हेटमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान 'हायहोल्टेज' सामना होणार आहे.

या स्पर्धेत सहावेळच्या विजेत्या ऑस्ट्रेलियासह जगातील सर्वोत्कृष्ट संघ सहभागी होणार असून ऑस्ट्रेलिया अद्याप निश्चित न झालेल्या पात्रता फेरीतील विजयी संघाविरुद्धच्या सामन्याने आपल्या जेतेपदाचा बचाव सुरू करतील.

रविवारी, ५ मे रोजी या प्रतिष्ठेच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेचे गट व सामने जाहीर करण्यात आले. गत वर्षी केपटाऊनमध्ये सहावे विजेतेपद पटकावणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघाला अ गटात ठेवण्यात आले आहे. त्यांना भारत, २०२० उपविजेता, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि पात्रता संघ यासह प्रबळ दावेदारांचा सामना करावा लागणार आहे.

ब गटात दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, २०१६ चा विजेता वेस्ट इंडिज, यजमान देश बांगलादेश आणि दुसरा पात्रता संघ यांचा समावेश आहे. ढाका आणि सिल्हेट शहरांमध्ये १९ दिवसांच्या कालावधीत २३ सामन्यांसह ही स्पर्धा तीव्र क्रिकेटचे प्रदर्शन असेल.

**अ गट :-** ऑस्ट्रेलिया, भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान, पात्रता संघ-१.

**ब गट :-** दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांगलादेश, पात्रता संघ-२.

संघ प्रत्येकी चार गट साखळी सामने खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उपांत्य सामने खेळतील. अंतिम सामना २० ऑक्टोबर रोजी ढाका येथे होईल. उपांत्य फेरीसाठी व आवश्यक असल्यास अंतिम सामन्यासाठी राखीव दिवसांची योजना आहे.

ढाका येथे ३ ऑक्टोबर रोजी इंग्लंड व दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान सलामीचा सामना खेळला जाणार आहे. ११ ऑक्टोबर रोजी सिल्हेटमध्ये ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांच्यादरम्यान चुरशीचा सामना खेळला जाणार आहे.

### महिलांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ३ ऑक्टोबर, ढाका | : | इंग्लंड वि. दक्षिण आफ्रिका |
| ३ ऑक्टोबर, ढाका | : | बांगलादेश वि. पात्र संघ-२ |
| ४ ऑक्टोबर, सिल्हेट | : | ऑस्ट्रेलिया वि. पात्र संघ-१ |
| ४ ऑक्टोबर, सिल्हेट | : | भारत वि. न्यूझीलंड |
| ५ ऑक्टोबर, ढाका | : | दक्षिण आफ्रिका विरुद्ध वेस्ट इंडिज |
| ५ ऑक्टोबर, ढाका | : | बांगलादेश वि. इंग्लंड |
| ६ ऑक्टोबर, सिल्हेट | : | न्यूझीलंड वि. पात्र संघ-१ |
| ६ ऑक्टोबर, सिल्हेट | : | भारत वि. पाकिस्तान |
| ७ ऑक्टोबर, ढाका | : | वेस्ट इंडिज वि. पात्र संघ-२ |
| ८ ऑक्टोबर, सिल्हेट | : | ऑस्ट्रेलिया वि. पाकिस्तान |
| ९ ऑक्टोबर, ढाका | : | बांगलादेश वि. वेस्ट इंडिज |
| ९ ऑक्टोबर, सिल्हेट | : | भारत वि. पात्र संघ-१ |
| १० ऑक्टोबर, ढाका | : | दक्षिण आफ्रिका वि. पात्र संघ-२ |
| ११ ऑक्टोबर, सिल्हेट | : | ऑस्ट्रेलिया वि. न्यूझीलंड |
| ११ ऑक्टोबर, सिल्हेट | : | पाकिस्तान वि. पात्र संघ-१ |
| १२ ऑक्टोबर, ढाका | : | इंग्लंड वि. वेस्ट इंडिज |
| १२ ऑक्टोबर, ढाका | : | बांगलादेश वि. दक्षिण आफ्रिका |
| १३ ऑक्टोबर, सिल्हेट | : | पाकिस्तान वि. न्यूझीलंड |
| १३ ऑक्टोबर, सिल्हेट | : | भारत वि. ऑस्ट्रेलिया |
| १४ ऑक्टोबर, ढाका | : | इंग्लंड वि. पात्र संघ-२ |
| १७ ऑक्टोबर, सिल्हेट | : | पहिला उपांत्य सामना |
| १८ ऑक्टोबर, ढाका | : | दुसरा उपांत्य सामना |
| २० ऑक्टोबर, ढाका | : | अंतिम सामना |

पात्रता स्पर्धेतील दोन अंतिम स्पर्धकांची नंतर ओळख झाल्यानंतर दोन्ही संघ मुख्य स्पर्धेत प्रवेश करतील. आयर्लण्ड, संयुक्त अरब अमिरात (यूएई), श्रीलंका आणि स्कॉटलंड हे संघ रिंगणात आहेत. पहिल्या उपांत्य फेरीत आयर्लण्डचा सामना स्कॉटलंडशी होईल, तर दुसऱ्या उपांत्य फेरीत यूएईचा सामना श्रीलंकेशी होईल. हे दोन्ही सामने आज अबुधाबीच्या शेख झायेद स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. (वृत्तसंस्था)

# हीटमध्ये पुरुषांचा रिले संघ अपयशी

● **जागतिक ॲथ्लेटिक्स स्पर्धा** ● **भारताला आज आणखी एक संधी**

◆ **नासाऊ (बहामास), ५ मे**

रविवारी येथे जागतिक ॲथ्लेटिक्स स्पर्धेत पॅरिस ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या पहिल्या फेरीत भारतीय पुरुषांचा ४ बाय ४०० मीटर रिले संघ आपली हीट शर्यत पूर्ण करू शकला नाही. दुसऱ्या चरणातील धावपटू राजेश रमेश पायाच्या नसा अखडल्यामुळे शर्यतीच्या बाहेर निघाला. ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या दुसऱ्या फेरीत सोमवारी भारताला आणखी एक संधी मिळेल.

मोहम्मद अनस याहिया, राजेश रमेश, मोहम्मद अजमल आणि अमोज जेकब या भारतीय चौकडीला हीट क्रमांक ४ मध्ये अव्वल दोन क्रमांकात स्थान मिळवून पॅरिसचे तिकीट निश्चित करण्याची आशा होती, परंतु दुर्दैवाने शर्यतीदरम्यान रमेशच्या डाव्या पायाच्या नसा अखडल्या व त्याला शर्यत अर्ध्यातूनच सोडावी लागली. अनसने याआधीच आपले पहिले चरण पूर्ण केले होते.

पुरुषांच्या ४ बाय ४०० मीटर रिले संघाची सुरुवात चांगली झाली. मुहम्मद अनसने पहिल्या चरणात ४५.९३ सेकंदांचा वेळ नोंदवला, परंतु दुसरा धावपटू- राजेश रमेश धावताना त्याच्या पायाच्या स्नायूंना दुखापत झाल्यामुळे तो खाली पडला,




भारतीय पुरुषांचा ४ बाय ४०० मीटर संघ

असे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने एका निवेदनात म्हटले आहे.

पुरुषांच्या स्पर्धेच्या तीन तास आधी रमेशने मिश्र ४ बाय ४०० मीटर शर्यतीत भाग घेतला होता. ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या दुसऱ्या फेरीत सोमवारी भारताला आणखी एक संधी मिळेल. या दुसऱ्या फेरीत रविवारी अव्वल दोन क्रमांकाच्या बाहेर राहिलेले अन्य सर्व संघ पॅरिस ऑलिम्पिकच्या संधीसाठी पुन्हा आपले नशीब आजमावतील. संघांना तीन हीटमध्ये विभागले जाण्याची अपेक्षा आहे आणि त्यापैकी प्रत्येकी दोन संघ पॅरिसचे तिकीट बुक करतील. याच चौकडीने २०२३ बुडापेस्ट जागतिक स्पर्धेत २ मिनिटे आणि ५९.०५ सेकंदांचा आशियाई विक्रम केला होता. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला हीट राउंड पार करण्यात अपयश आले होते.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पात्रतेच्या पहिल्या दिवशी महिलांच्या ४ बाय ४०० मीटर आणि मिश्र ४ बाय ४०० मी. रिलेमध्येही भारताला अपयश आले. मिश्र ४ बाय ४०० मी. आणि महिला ४ बाय ४०० मीटर या दोन्ही भारतीय संघांना सोमवारच्या ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या दुसऱ्या फेरीसाठी प्रतीक्षा करावी लागेल.

मिश्र ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत राजेश रमेश, रुपल चौधरी, अविनाश कृष्ण कुमार व ज्योतिका श्री दांडी या भारतीय चौकडीने ३ मिनिटे आणि २०.३६ सेकंदांच्या वेळेसह हीट क्रमांक दोनमध्ये सहाव्या स्थान मिळविले. नंतर, विथ्या रामराज, एमआर पूवम्मा, ज्योतिका श्री दांडी आणि सुभा वेंकटेशन या भारतीय चौकडीने ३ मिनिटे आणि २९.७४ सेकंद वेळेसह हीट नंबर एकमध्ये पाचवे स्थान पटकावले. येथील चार हीट शर्यतींमधील प्रत्येकी दोन अव्वल संघ १६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरतील. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### वळसंग येथे आज महात्मा बसवेश्वर मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, पुराण समाप्ती कार्यक्रम

**वळसंग, दि. ५ मे-**
वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे १६ एप्रिलपासून सुरू असलेल्या १२ व्या शतकातील जगद्ज्योती श्री महात्मा बसवेश्वर पुराणाचा समारोप, श्री बसवश्वर मंदिरात नव्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना मंगळवारी ६ मे रोजी होणार आहे. ६ मे सोमवार रोजी पहाटे ५ वा. श्री नंदी बसवेश्वरांची महापूजा, रुद्राभिषेक, प्राणप्रतिष्ठापना, होमहवन होणार आहे. त्यानंतर लिंगदीक्षा, अय्याचार, सकाळी ७.३० वाजल्यापासून श्री बसवेश्वरांची पालखी मिरवणूक, कुंभ मिरवणूक होणार आहे. यावेळी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, विश्वाराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामी, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, श्रीमनिप्र बसवलिंग शिवाचार्य महास्वामी यांची धर्मसभा होणार आहे. भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आल्याचे श्री चन्नबसवेश्वर देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष मल्लिनाथ बाबानगरे यांनी सांगितले. विधिवत पूजा वे. कल्लय्या स्वामी व वे. नागय्या स्वामी यांच्या शुभ हस्ते होणार आहे. यावेळी उपाध्यक्ष अनिल शहापुरे, सचिव चंद्रशेखर केशट्टी, श्रीशैल भैरामडगी, सोमनाथ केशट्टी, बसवराज किणगी, खजिनदार सचिन तडलगी, शिवबसप्पा कलशेट्टी, शिवानंद घोडके उपस्थित होते.




### प्रशासनाच्या वतीने इंदापुरात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांसाठी गृहभेट मतदान मोहीम

**इंदापूर, दि. ५ मे-**
इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखली ८५ वयावरील व दिव्यांग मतदारांसाठी गृहभेट मतदान मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत ८५ वयावरील ५९ मतदार व ११ दिव्यांग मतदारांसाठी गृहभेट मतदान मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ८५ वयावरील ५५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दोन मतदारांनी मतदान करण्यास नकार दिला. १ मतदार मयत आढळून आला. १ मतदार ८ दिवसांसाठी बाहेरगावी उपचारासाठी गेला असल्याने तो मतदानाचा हक्क बजावू शकला नाही. ११ दिव्यांग मतदारांपैकी सर्व ११ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.



### वैराग ब्लॉक काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी अमोल भूमकर यांची एकमताने निवड

**वैराग, दि. ५ मे-**
वैराग ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्षपदी अमोल अण्णासाहेब भूमकर यांची निवड करण्यात आली .निवडीचे पत्र सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले .यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अँड. अर्जुनराव पाटील, गोविंदराव पंके, अशोकराव देवकते, राधाकृष्ण पाटील, शरणाप्पा कोळी, सोमनाथ सोनटक्के, रामण्णा माळी, भीम नवगिरे, राजकुमार राठोड, ईश्वर वावरे, देवेंद्र सैनसाखळे, गेनसिद्ध मोटे, फरजाना बागवान आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घरफोडी, चोरीच्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. ५ मे-**
घराचे कुलूप काढून दागिने चोरल्याच्या आरोपातून अशोक काटमोरे व दिगंबर भारती यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. १८ नोव्हेंबर २०११ रोजी फिर्यादीच्या घरी चोरी झाली होती. दागिन्याचा डबा चोरीला गेल्याचे त्यांना दिसून आले. त्यांचा दीड तोळ्याचा लक्ष्मी हार, अर्धा तोळ्याचे झुबे इत्यादी चोरीला गेल्याचे दिसून आले. सदरील प्रकार हा भरदिवसा घडला होता. त्यांनी चौकशी केली असता बबन गुंड (रा. जागाव) हा त्या दिवशी दुपारी घराजवळ फिरत होता, असे त्यांना समजले. फिर्यादीने बबन गुंड याची भेट घेतली असता त्याने त्या दिवशी दुपारी चार वाजता घरात प्रवेश करुन चोरी केल्याचे कबूल केले. त्याला सदर प्रकरणी आरोपी अशोक काटमोरे व दिगंबर भारती यांनी मदत केल्याचे त्यांनी सांगितले. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलिसांनी चोरीचा माल सराफाकडून जप्त केला व पूर्ण तपास करुन आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील न्यायदंडाधिकारी वर्ग १ एस. बी. विजयकर यांच्यासमोर झाली. सरकार पक्षातर्फे एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांच्या जबाबदातील विसंगती निदर्शनाला आणून दिल्याने आरोपीतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. केस प्रलंबित असताना आरोपी बबन गुंड याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणांमध्ये आरोपीच्यावतीने अॅड. शिवाजी क्षीरसागर यांनी काम पाहिले व त्यांना अॅड. अक्षय बिडबाग तसेच अॅड. पवन क्षीरसागर यांनी सहकार्य केले.

# नेते कुठेही असू द्या, जनता आमच्या सोबत

## महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ मे-**
नेते कुठेही असू द्या. जनता आमच्या पाठीशी आहे. गेल्या १५ दिवसांत विजयदादा व बाळदादांच्या मार्गदर्शनाखाली माढा लोकसभा मतदारसंघातील ८३५ गावांचा आपण झंझावती प्रचार दौरा केला. महाविकास आघाडील नेत्यांनी प्रचाराची बाजू संभाळली. त्यांच्या प्रचारसभांना जनतेने उत्स्फूर्त पाठिंबा दिला व या सभा यशस्वी केल्या. जनतेनेच ही निवडणूक हातात घेतल्याने आमचा विजय निश्चित आहे, असा विश्वास महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

माढा लोकसभा मतदारसंघाच्या प्रचार दौऱ्याची सांगता करण्यात आली, यावेळी ते बोलत होते. सन २०१९ ला पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील सहा जिल्हे व



३१ दुष्काळी तालुक्यातील शेतीला कृष्णा-भीमा स्थिरीकरणाच्या माध्यमातून पाणी मिळावे यासाठी आम्ही भाजपात प्रवेश केला. यात स्वार्थ नव्हता. लोकसभेला एक लाख १६ हजार मतांनी विजयी केले. एका रात्रीत नवख्या सातपुतेंना आमदार केले. जिल्हा परिषदेसह तीन नगरपालिका, माळशिरस पंचायत समितीत भाजपाची सत्ता आणली. तरीही आम्हाला गद्दार म्हटले जाते. ज्यांना खासदार म्हणून आम्ही निवडून दिले त्यांना त्यांच्या तालुक्यात एक ग्रामपंचायतसुध्दा आणता आली नाही आणि माढा लोकसभेतील नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी साधा उमेदवारही मिळाला नाही. तरीही ते निष्ठावंत? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी आमच्या मनात कोणताही राग अथवा द्वेश नाही. पण खा. नाईक-निंबाळकर, आ. जयकुमार गोरे व आ. श्रीकांत भारतीय यांनी आमच्याविषयी चुकीची माहिती देऊन नेतृत्वाचे कान भरले. कालपर्यंत आम्ही चांगले होतो. पक्ष सोडला की गुंड झालो काय? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

मोहिते-पाटील म्हणाले, नीरा-देवधर धरणासाठी विजयदादा व रामराजेंनी १९८४ पासून प्रयत्न केले. जमिनीचे अधिग्रहण करुन घेतले. १५-२० वर्षे विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी राज्यपालांनी पश्चिम महाराष्ट्रातील योजनांना स्टे दिला. त्यामुळे निधी मिळाला नाही म्हणून ही योजना रखडली. आता हा स्टे उठला आहे. नीधी आला आहे. त्यामुळे नीरा-देवधर योजना सुरु झाली. शरद पवार, विजयदादा, रामराजे यांनी कधी श्रेयासाठी काम केले नाही. परंतु अलीकडे काम न करता पाणीदार, जलनायक अशा बिरुदावली लावून फिरणारे वाढले आहेत असे म्हणत खा. नाईक-निंबाळकर व आ. गोरे यांच्यावर त्यांनी जोरदार टीका केली.

> **या प्रश्नांवर करणार काम**
> माढा लोकसभेतील शेती व शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी, युवकांच्या हाताला काम मिळावे यासाठी प्रत्येक तालुक्यात मीनी एमआयडीसी, केळी संशोधन केंद्र, किसान रेल्वे आदी प्रश्नांबाबत आपण सतर्क राहून काम करु असा विश्वासही धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

# स्वामी भक्तांसाठी अन्नछत्र मंडळ सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ मे-**
तीर्थक्षेत्र अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४६ वा पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वखाली महाप्रसाद, यात्री निवास, यात्री भुवनासह विविध उपक्रम हे लाखो स्वामी भक्तांच्या सेवार्थ सज्ज आहे.

या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यातील विविध भागातून दिंडी व पालख्या श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये दाखल होत आहेत. याचीदेखील सोय करण्यात आली आहे. मंगळवारी ६ मे रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४६ वा पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात महाप्रसाद पूजा, धार्मिक विधी संपन्न होणार आहेत.



यानंतर आलेल्या भक्तांना महाप्रसादाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. तीर्थटणातून पर्यटनबाबत न्यासाच्या परिसरात दत्त मंदिर, स्वामींच्या रथासह श्रीमंत कांतामतीराजे भोसले वाचनालय, अश्रयदात्यांचे कक्ष, स्वामी सदन-धान्य कोठार, सभागृह, कार्यालय, सिंहानाधिष्ठ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, स्वामींची भव्य उभी ३० फुटी मूर्ती, दिपमाळा, वारूळातून प्रकटले परब्रह्म, कपिला गाय, शिवस्मारक, श्री गणेश मंदिर इमारत, श्री शमी विघ्नेश गणपती मंदिर, हिरकणी कक्ष, दिव्यांग रुग्णांसाठी बग्गी, आऊटडोअर जीम, यात्री भवन, यात्री निवास, अतिथी निवास, रूग्णवाहिका, अग्निशामक वाहन, एटीएम, श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्योन, जॉगिंग ट्रॅक, वाहन तळ, भक्तांची सोय, याबाबत तीर्थ क्षेत्र नगरीतील विविध मुख्य मार्गावर कटाऊटस् लाऊन स्वामभिक्तांना सुलभ व्यवस्था होण्याकामी अन्नछत्र मंडळाकडून सोय करण्यात आली आहे.

> **वातानुकूलित महाप्रसाद गृह**
> उन्हाचा पार हा वाढत चालल्याने महाप्रसाद गृह हे एयर कुलर सिस्टिमने सज्ज करण्यात आले असून, स्वमभिक्तांच्या सेवार्थ न्यासाने सदरची यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे.

# धनगर, मराठा समाजाला फसवणाऱ्यांना आता हद्दपार करा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ मे-**
आरक्षणाबाबतीत धनगर व मराठा समाजाला फसवणाऱ्या सरकारला हद्दपार करा असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंहराजे होळकर यांनी केले.

माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ सावतामाळी मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी अॅड. मिलिंद कुलकर्णी, माणिकराव वाघमोडे, पांडुरंग वाघमोडे, तुकाराम देशमुख, नंदकुमार गांधी, खलील मुलाणी, रामभाऊ सीद आदी उपस्थित होते.

होळकर म्हणाले, भाजपा सरकारने शेतकऱ्यांना फसवले. बँक घोटाळे केले, त्यांच्यावर कारवाई केली नाही. शासनाने १० वर्षांत कोणती कामे केली ती जनतेला सांगावी. कामे न केल्याने कामावर मते न मागता रामावर मते मागितली जात आहे. देशाला हुकुमशाहीकडे नेला जात असून त्यास रोखण्यासाठी व आपली कामे करण्यासाठी हक्काचा माणूस देण्याची आवशकता आहे. त्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी सोमनाथ पिसे, पांडुरंग वाघमोडे यांनी मनोगत व्यक्त करून धैर्यशील मोहिते-पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी श्रीरंग तरडे, शौकत शेख, रमेश पिसे, धनंजय मस्के, समाधान भोसले, अस्लम मुजावर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

> **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे वंशज भूषणसिंहराजे होळकर यांचे आवाहन**

# फसव्या सरकारला घरी बसवा : अंबादास दानवे

**ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बार्शीत सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे-**
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन करणाऱ्यावर गोळीबार केला जातो. शेतकऱ्यांच्या पिकाला भाव नाही. त्यामुळे खोटी आश्वासने देणाऱ्या फसव्या सरकारला घरी बसवा, असे आवाहन विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केले.

बार्शी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत दानवे बोलत होते.




यावेळी माजी मंत्री दिलीप सोपल, माजी नगराध्यक्ष बारबोले, उमेदवार ओमराजे निंबाळकर उपस्थित होते. दानवे म्हणाले, राज्यातील सरकारही केंद्रातील सरकारप्रमाणेच गद्दार सरकार आहे. राज्यात गद्दार सरकार आल्यापासून साडेतीन हजार तर केंद्रामध्ये २६,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. फसव्या घोषणा अन् फसव्या जाहिराती करणारे सरकार आहे. घटना बद्दलण्यासाठी ४०० जागा पाहिजे, अशी टीकाही दानवे यांनी केली. माजी मंत्री दिलीप सोपल, ओमराजे निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून पंढरपूरच्या निवडणूक स्ट्रॉंग रुमची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ५ मे -**
सोलापूर लोकसभा मतदारसंघांतर्गत पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील स्ट्रॉग रुमला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भेट देवून सुरक्षा, सोयी-सुविधांची पाहणी केली.

यावेळी सहा. निवडणूक अधिकारी सचिन इथापे, अति.सहा निवडणूक अधिकारी सचिन लंगुटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, योगेश कदम, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, चरण कोल्हे, नायब तहसिलदार चंद्राकंत



हेडगिरे, मनोज श्रोत्री, वैभव बुचके, पंडीत कोळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र मतदान यंत्रे ठेवण्यासाठीची व्यवस्था, स्ट्रॉग रुम येथील सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निशमन, पोलीस बंदोबस्त, कर्मचाऱ्यांसाठी सुविधेबाबतची माहिती घेतली. स्ट्रॉग रुम व्यवस्थापन, नियोजनाबाबत आढावा घेऊन सूचना दिल्या. स्ट्रॉग रुमच्या सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी अशा सूचनाही दिल्या.

# लोकसभा निवडणूक : माळशिरसमध्ये पोलिसांचे पथसंचलन

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ५ मे-**
मंगळवारी सात मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणूक अनुषंगाने माळशिरस पोलीस स्टेशनच्या वतीने माळशिरस पोलीस स्टेशन हद्दीतील महत्त्वाच्या गावांमध्ये चार दिवस पंथसंचलन करण्यात आले.

सध्या देशात महत्त्वाच्या लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम सुरू आहे. या निवडणुका देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याने या निवडणुका व्यवस्थित पार पडाव्यात, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज



असून त्यासाठी तालुक्यातील महत्वाच्या गावांत हे पथसंचलन करण्यात आले. हे पथसंचलन माळशिरससह सदाशिवनगर, भांबुर्डी, मेडद, उंबरे, दहिगाव, तरंगफळ, मोटेवाडी, गारवाड, इस्लामपूर, कन्हेर, पिलीव, बचेरी, चांदापुरी, कुसमोड, शिगोर्णी येथे पोलिसांनी पथसंचालन करून नागरिकांना लोकसभा निवडणूक मतदान शांततेत पार पाडण्याच्या आणि निर्भय वातावरणात मतदान करण्याचे आवाहन केले. या पथसंचालनामध्ये माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन घोळकर, एसआरपीएफचे ४ अधिकारी, १०० जवान, आंध्रा एसआरपीएफचे ६० जवान, ३ अधिकारी, माळशिरस पोलीस स्टेशनचे १५ जवानांनी सहभाग घेतला.

# इंदापूर येथे निवडणुकीसाठी मतदारांना वोटर स्लीप वाटप

**इंदापूर, दि. ५ मे-**
इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखली इंदापूर तालुक्यातील ३३० मतदान केंद्रांचे केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी ३ लाख २३ हजार ५४१ वोटर स्लीपपैकी २ लाख १५ हजार ७६२ वोटर स्लीपचे वाटप केले असून त्याची टक्केवारी ६६.६९ टक्के आहे. शिल्लक वोटर स्लीपचे वाटप युद्ध पातळीवर



पूर्ण करण्याच्या सूचना विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे व तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी दिली आहे.

# ऊस उत्पादकांना न्याय देणाऱ्या मोदींना पुन्हा सत्ता द्या

## हर्षवर्धन पाटील : उसाच्या एफआरपीमध्ये भरघोस वाढ, इथेनॉल निर्मितीस प्रोत्साहन देणारे धोरण

**साखर उद्योग प्राप्तीकरातून कायमचा मुक्त**

**तभा वृत्तसेवा,**
**इंदापूर, दि. ५ मे-**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी उसाच्या एफआरपीमध्ये भरघोस वाढ करून इथेनॉल निर्मितीस प्रोत्साहन देणारे धोरण राबविले. देशातील साखर उद्योग प्राप्तीकरातून कायमचा मुक्त करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्याबरोबरच आगामी काळातही ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भरभराटीसाठी



मोदी सरकारकडेच पुन्हा सत्ता द्या, असे आवाहन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केले.

इंदापूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हर्षवर्धन पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकारने ऊस उत्पादक शेतकरी व साखर उद्योगासाठी १० वर्षांत घेतलेल्या अनेक चांगल्या धोरणात्मक निर्णयांची माहिती दिली. मोदी सरकारच्या शेतकरी हिताच्या निर्णयांमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्याला कायम न्याय देणाऱ्या मोदी सरकारला लोकसभा निवडणुकीत मतदान करावे, असे आवाहनही हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी केले.

केंद्रामध्ये काँग्रेस पक्षाच्या नेतृत्त्वाखाली सरकार अनेक वर्ष सत्ते होते. परंतु काँग्रेसच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने इथेनॉल संदर्भात शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका स्वीकारली नाही. सध्या पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण १२ टक्क्यांपर्यंत गेले आहे. सन २०२५ पर्यंत हे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्त्वाखालील केंद्र सरकारने घेतला आहे, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इथेनॉलमुळे साखर उद्योगाला सध्या सुमारे २१ हजार कोटी रुपये मिळत आहेत. मिश्रणाचे प्रमाण २० टक्क्यांच्या पुढे गेल्यासही उलाढाल ५० हजार कोटींपेक्षा अधिक होणार आहे. मोदी सरकारने ऊस कायदा १९६६ मध्ये बदल करून रसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी दिली आहे, असे त्यांनी सांगितले.

> **ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आगामी काळ भरभराटीचा**
> देशामध्ये ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी व सुमारे ७ लाख साखर कर्मचारी आहेत. साखर उद्योगात देशातील महत्त्वाचा उद्योग बनला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर साखर उद्योग व देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी आगामी १० वर्षांसाठी विकास आराखडा तयार केला जाईल. त्यामुळे आगामी काळ ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी भरभराटीचा राहणार आहे, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

## संक्षिप्त वृत्त

### जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी आठवडा बाजार राहणार बंद

**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघाचे मतदान मंगळवार दि.७ मे रोजी होणार आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, कलम ३७ (३) अन्वये सार्वत्रिक लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने मतदान केंद्राच्या परिसरात जिल्ह्यातील (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी मतदाना दिवशी जिल्ह्यातील सर्व बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत. बार्शी तालुक्यात आळगाव, भातंबरे ,नारी, घारी, अक्क्लकोट तालुक्यात हैद्रा, किणी, दुधनी, दक्षिण सोलाापूर तालुक्यात इंगळगी, वळसंग, तिल्हेहाळ मंद्रुप येथील कूसूर, तेलगाव, माळकवठे, माढा तालुक्यात माढा , वरवडे , भिमानगर, बेंबळे, करमाळा तालुक्यात वरकुटे ,हिवरे, घोटी, सालसे, रोपळे क, मोहोळ तालुक्यात कुरूल, सावळेश्वर, औंढी, येवती, मंगळवेढा तालुक्यात हुलजंती , गोणेवाडी ,लेंडवे चिंचाळे, सांगोला तालुक्यात पाचेगाव बुद्रुक, सोनंद, उदनवाडी, वाकी शिवणे, महिम, कटफळ, बलवडी तर माळशिरस तालुक्यात पिलीव, इस्लामपूर या गावात मंगळवार दि. ७ मे रोजी आठवडी बाजार भरविण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

### मतदान ओळखपत्राला पर्यायी १२ कागदपत्रे ग्राह्य धरणार

**सोलापूर, दि.५ मे-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येणार आहे. आयोगाच्या १९ मार्च २०२४ च मार्गदर्शक सूचनानुसार मतदार ओळखपत्र व अन्य १२ पुरावे ग्राह्य धरण्यात आलेले आहेत. मतदारांनी मतदार ओळखपत्र बरोबरच छायाचित्र असलेले खालील पुरावे मतदान केंद्रावर दाखवल्यानंतर त्यांना मतदान करता येणार आहे. ते पुरावे खालील प्रमाणे आहेत अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली. आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक/पोस्ट ऑफीसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅनकार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेव्दारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र/राज्य सरकार/सार्वजनिक उपक्रम/पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना/आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र,भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र तसेच प्रवासी भारतीय मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा केवळ मुळ पासपोर्ट आवश्यक राहील.

# जिल्ह्यातील बुथवर आज मतदान पेट्या होणार रवाना

**प्रत्येक बसेसला जीपीएस प्रणाली**

**प्रत्येक वाहनाला आरटीओ इन्स्पेक्टर अन् २ सहाय्यक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीम मध्यंतरी राबविण्यात आली असून, मंगळवार, दि. ७ मे च्या सकाळपासून मतदान प्रक्रिया चालू होणार असल्याने जिल्हा प्रशासनाची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. दरम्यान, सोमवार, दि. ६ मे रोजी सकाळपासून प्रत्येक बुथवर मतदान पेट्या रवाना होणार आहे. दरम्यान, या प्रत्येक बसेसला जीपीएस प्रणाली जोडण्यात आल्याची माहिती लोकसभा निवडणुकीतील वाहतूक व्यवस्थापक तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी रविवारी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

या मतदान पेट्या घेवून जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ४५९ एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. तर या व्यतिरिक्त ७१ बसेस कर्मचाऱ्यांची ने-आण करणार आहेत. तर १ हजाराच्या आसपास लहान चारचाकी वाहने करण्यात आली आहे. या वाहनांतून अधिकारी-कर्मचारी या दोन्ही मतदारसंघात पाहणी दौरा करणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दि. ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत मतदान होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करण्यासाठी प्रशासनाच्यावतीने विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीम राबवून त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.



मागील लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात सरासरी मतदान जवळपास ६१ टक्के इतके झालेले आहे. या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मध्ये किमान ७० टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील वाढते तापमान पाहता सावलीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मंडप उभारण्यात येणार आहे, त्यामुळे मतदारांना उन्हाचा त्रास होणार नाही. तसेच मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याबरोबरच ओआरएस चे पाणीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर मोठ्या रांगा लागल्यास मतदारांना बसता यावे यासाठी तेथे बेंचेस व खुर्चीची व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर जेष्ठ मतदारांच्या व दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी व्हील चेअर ची सुविधा देण्यात आली असून त्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवक ही नियुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे मतदान केंद्रावर रॅम्पचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मदत कक्ष उघडण्यात येणार आहे, त्या ठिकाणी बी. एल.ओ. ची नियुक्ती केलेली आहे. मतदारांच्या आरोग्यासाठी प्रत्येक मतदार केंद्रावर स्वच्छतागृह स्वच्छ करण्यात आलेले आहेत. मतदारांना हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच व पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र आहेत अशा ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्राला कलर कोडींग चा वापर केलेला असून मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे अत्यंत सुलभ करण्यात आलेले आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगून जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी दिनांक ७ मे रोजी आपले नाव असलेल्या मतदान केंद्रावर जाऊन सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत सशक्त लोकशाहीसाठी आपला मतदानाचा हक्क बजावा असे आवाहन केले आहे.




### हत्तुर-केगाव बायपासवर दुचाकीस्वारास लुटले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

हत्तुर-केगाव बायपास रोडवर दुचाकीस्वारास २० हजार रुपयांना लुटल्याप्रकरणी तिघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबबात ज्ञानेश्वर राधो नरोडे (वय २०, रा. रामनगर, ता. कन्नड, जि. संभाजीनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ मे रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास ज्ञानेश्वर नरोडे हे त्यांच्या दुचाकीवरून हत्तुर-केगाव बायपास रोडने जात होते.

त्यावेळी डोणगाव ब्रिजच्या बाजूला रोडवर नरोडे हे गाडीवरून जात असताना दुचाकीवरून आलेल्या तीन चोरट्यांपैकी दोघांनी नरोडे यांचे हात पकडले व तिसऱ्याने त्यांच्या पॅन्टच्या खिशातील दोन मोबाईल व रोख रक्कम असा २० हजारांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पवार पुढील तपास करीत आहेत.

### सोलापूर व माढा मतदारसंघात घरभेटी दरम्यान १० हजार ९०८ जणांनी बजावला हक्क

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांसाठी मतदानाची घरपोच व्यवस्था करण्यात आली होती. त्यानुसार १२ डी फॉर्म भरून घेवून जिल्ह्यातील १० हजार ९०८ नागरिकांचे मतदान आमच्या विशेष टिमने पूर्ण केले असून, अत्यावश्यक सेवेतील नागरिकांचेही याच धर्तीवर मतदान पूर्ण केले आहे. या मतपेट्यांचा तालुकानिहाय अहवाल जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे पाठविला असल्याची माहिती नोडल अधिकारी, टपाली मतपत्रिका तथा उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी दिली. माढा लोकसभा मतदार संघातील जेष्ठ नागरिकांसाठी आजतागायत ९ हजार ५६२ मतदान झाले आहे. तर सोलापूर मतदारसंघात १७६२ जणांनी या मतदानात सहभाग नोंदविला. तर शासकीय अत्यावश्यक ड्युटीवरील कर्मचाऱ्यांनी १०० टक्के मतदान केले आहे. माढा मतदारसंघात २४७-मोहोळ-१६४३, २४८-सोलापूर शहर उत्तर-९५४, २४९- सोलापूर शहर मध्य-१०४८, २५०- अक्कलकोट -१८९६, २५१- सोलापूर दक्षिण -२१८६, २५२- पंढरपूर -१७३५ असे एकूण ९ हजार ५८२ इतके मतदान झाले आहे. दोन वेळा घरी जावूनही काही मतदार सापडले नसल्याने त्यांना मतदान केंद्रावर मतदान करता येणार आहे.




# प्रत्येक मतदान केंद्रांवर आरोग्याच्या सुविधा उपलब्ध

**तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यावर दिली जबाबदारी**

**जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. नवले यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

सोलापूर व माढा लोकसभा सार्वत्रिक लोकसभा निवडणूक मतदार संघासाठी मंगळवार, ०७ मे २०२४ रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचनेनुसार व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १ हजार ६१७ मतदान केंद्रामध्ये जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून मतदारांच्या आरोग्याची काळजी घेणे व वाढत्या उन्हाची खबरदारी म्हणून मतदारांची काळजी घेतली जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली.

सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी मंगळवार, दि.७ मे २०२४ रोजी मतदान होत आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर आरोग्य पथके तैनात करण्यात आली आहेत. शिवाय पुरेशा औषधाचे किटही केंद्रावर ठेवण्यात येणार असून, त्याची जबाबदारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांवर देण्यात आली आहे.

सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी अत्यावश्यक त्या प्राथमिक उपचारांसाठी औषध किट व व्हिलचेअर सुविधा उपलब्ध करण्याबाबत जिल्हा परिषद आरोग्य विभागाने पंचायत समित्यांचे सर्व तालुका आरोग्य अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. सर्व मतदान केंद्रांवर एक आशा व पाच मतदान केंद्रापाठीमागे एक आरोग्य कर्मचारी व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना पुरेशा औषध किटसह मतदानादिवशी मतदान प्रक्रिया सुरू झाल्यापासून मतदान पूर्ण होईपर्यंत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.


#### किटमध्ये कोणती राहणार औषधे

मतदान केंद्रावर नियुक्त असलेल्या आरोग्य पथकाला जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत एक औषधाचे किट पुरवले जाणार आहे. या किटमध्ये ओआरएस ३० पाकीट परबुथ व ड्रेसिंग साहित्यासह प्राथमिक उपचाराचे साहित्य व औषधे असणार आहेत. उष्म्याचा त्रास जाणवला तर मतदारांना तातडीच्या उपचारासह प्रथम उपचार सेवा मिळणार आहे.

**-मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे**

#### कडक उन्हामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क

सध्या दिवसेंदिवस कडक उन्हाळा जाणवू लागला आहे. त्यामुळे उष्माघाताचा त्रास नागरिकांना जाणवू लागला आहे. मतदारांसह मतदान प्रक्रियेत राबणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. त्यामुळे मतदान जास्त होण्यासाठी चांगली मदत होणार असल्याचेही जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नवले यांनी सांगितले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● निवासी संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# रेल्वे स्टेशन परिसरातील तरूणाचा खून करणाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे-**

शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात तरूणाचा खून करणाऱ्या आरोपीस सदर बझार पोलिसांनी अटक केली.

गणपत उर्फ सुनिल गायकवाड (रा. पटवर्धन चाळ, रामवाडी, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. संतोष बाबूराव गुमटे (वय ४५, रा. राजेश कोठे नगर, मुक्ताई मंदीराजवळ, दमाणी नगर, सोलापूर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत विजयकुमार बाबूराव गुमटे (वय ३८) यांनी दिलेल्या फियादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारस रेल्वे स्टेशनच्या पाठीमागील बाजूस सिमेंट गोदामाजवळील मोकळ्या जागेत संतोष गुमटे या तरूणाचा खून करण्यात आला होता. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी गोपनीय माहितीवरून गणपत गायकवाड यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने हा गुन्हा केल्याचे कबुल केले. गणपत गायकवाड हा रेल्वे स्टेशन परिसरात मोबाईल चोरीचे गुन्हे करतो. त्याच्याकडून पोलिसांनी मयत संतोष गुमटे याचा मोबाईल जप्त केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सागर काटे पुढील तपास करीत आहेत.



## क्राईम वृत्त...

### उमेदवाराच्या माहितीच्या प्रचाराचे गठ्ठे चोरीस

**सोलापूर, दि. ५ मे-**

शहरातील जगदंबा चौकातून वाहनातून लोकसभा निवडणुकीतील उमेदवाराच्या माहितीचे प्रचाराचे ३ हजार ५०० रुपये किंमतीचे गठ्ठे चोरट्याने चोरून नेले. याबाबत योगेश सुभाष शिदगणे (वय २७, रा. सोनी नगर, मोदी, हुडको, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १ मे रोजी रात्री योगेश शिदगणे यांनी जगदंबा चौकात त्यांचे छोटा हत्ती वाहन लावलेले होते. चोरट्याने शिदगणे यांच्या वाहनात ठेवलेले ४२ सोलापूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ असे नमूद केलले उमेदवार प्रा. डॉ. अर्जुन गेता यांची माहिती लिहलेली प्रचाराचे गठ्ठे ठेवलेले होते. ते गठ्ठे अज्ञात चोरट्याने चोरून नेले. पोलिस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत.

### आसार मैदानातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ मे-**

शहरातील आसार मैदानातून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत विकास रघुनाथ कवडे (वय ४५, रा. मिथीला नगर, धुम्मा वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास कवडे यांच्या मित्राच्या नावावर असलेली एमएच १३ बीसी ६२६८ ही दुचाकी ३० एप्रिल रोजी कवडे यांनी आसार मैदान येथे पार्किंगमध्ये लावलेली होती. ती चोरट्याने चोरून नेली. हवालदार कटारे पुढील तपास करीत आहेत.

### कर्णिक नगर येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ मे-**

शहरातील कर्णिक नगर येथील पावन गणपतीच्या पाठीमागे लावलेली १० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत महेश गोवर्धन आडकी (वय ३५, रा. विजय नगर, नविन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे रोजी दुपार महेश आडकी यांनी त्यांच्या मित्राच्या नावावर असलेली एम एच १३ एआर ८७५४ क्रमांकाची दुचाकी ही पावन गणपतीच्या पाठीमागे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेली. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### ट्रॅक्टरखाली सापडून तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ मे-**

पायी जाणाऱ्या तरूणाच्या अंगावर ट्रॅक्टर पलटी होऊन ट्रॅक्टरखाली सापडून त्याचा मृत्यू झाला. मल्लिनाथ रामण्णा बंडगर (वय ३४,रा. चपळगाव, ता. अक्कलकोट) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत अंदप्पा आप्पांना बंडगर (वय ५८, रा. चपळगाव, ता. अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच १३ ईसी ४१०५ या क्रमांकाच्या ट्रॅक्टरचालकाविरुध्द अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास अंदप्पा बंडगर व मल्लिनाथ बंडगर हे दोघे संगोळगी गावात मुक्कामासाठी पायी जात होते. त्यावेळी संगोळगी गावच्या अलीकडे वळणात एमएच १३ इसी ४१०५ या ट्रॅक्टर क्रमांकाच्या चालकाने ट्रॅक्टर निष्काळजीपणे चालवून मल्लिनाथ यांच्या अंगावर पलटी केला. त्यामध्ये ट्रॅक्टरखाली सापडून मल्लिनाथ हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. पोलिस नाईक बहिरगोंड पुढील तपास करीत आहेत.

### खर्डी येथे ६ लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. ५ मे-**

खर्डी (ता. पंढरपूर) येथे चोरट्यांनी घरफोडी करून ६ लाख २० हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.याबाबत भगवान विठोबा रोंगे (वय ६५, रा. खर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ मे च्या रात्री चोरट्यांनी रोंगे यांच्या घराचे कुलूप उघडून घरात प्रवेश केला. कपाटामध्ये ठेवलेली ४ लाख रुपयांची रोकड, ५० हजार रुपये किंमतीची सोन्याची बोरमाळ, १ लाख रुपये किंमतीच्या सोन्याच्या पाटल्या, शाहू महाराजांचे चित्र असलेली सोन्याची अंगठी, सोन्याच्या दोन अंगठ्या, सोन्याचे बदाम असा ६ लाख २० हजार रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले. याबाबत पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक परिविक्षाधीन पोलिस अधिक्षक डॉ. शुभम कुमार पुढील तपास करीत आहेत.

# देशात स्मार्ट व्हिलेजेस तयार होण्यासाठी भाजपाला विजयी करा

## केंद्रीय रस्ते, वाहतूक मंत्री नितीन गडकरी

## टेंभुर्णी येथील महायुतीच्या प्रचारसभेत आवाहन




**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ५ मे-**

आत्याधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागातील जीवनमान प्रगतीपथावर नेऊन शेतकरी व शेतमजुरांचे जीव समृद्ध आणि संपन्न बनवण्यासाठी, स्मार्ट व्हिलेज तयार करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना विजयी करा असे आवाहन केंद्रीय रस्ते, वाहतूक विकास व तंत्रज्ञान मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

टेंभुर्णी येथील जाहीर प्रचारसभेदरम्यान ते बोलत होते. याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आमदार बबनराव शिंदे, आ. संजयमामा शिंदे, रणजितसिंह शिंदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, सरपंच सूरज बोबडे, प्रा. सुहास पाटील, सुहास जामगांवकर, कार्याध्यक्ष रामभाऊ शिंदे, रिपाइंचे अध्यक्ष लोंढे, राजकुमार पाटील, योगेश पाटील, दत्ता जाधव उपस्थित होते.

गडकरी म्हणाले की, सिंचन सुविधा सर्वत्र उपलब्ध करणे हे केंद्र सरकारचे प्रमुख ध्येय आहे. नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी आडवायचे हजारो सिंचन प्रकल्प तयार करायचे आणि नद्या जोड प्रकल्पाद्वारे लाखो एकर क्षेत्रासाठी पाणी पुरवायचे व त्याद्वारे शेतकऱ्यांचे जनजीवन सुखी आणि समृद्धी करायचे आमचे ध्येय आहे. उजनी धरणातील गाळ काढणे व पाण्याचा साठा वाढवणे, कृष्णा फ्लड डायव्हर्शन आणि नीरा-भिमाचे पाणी उजनीत आणून मराठवाडा व इतर भागातील शेतीसाठी उपलब्ध करून देणे, यासाठी करोडो रुपये देण्यासाठी केंद्र शासन तयार आहे. काही योजनांची कामे चालू आहेत तर काही प्रगती पथावर आहेत. माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस या तालुक्यातदेखील शेतीसाठी पाणी अपुरे पडणार नाही. यासाठी अनेक सिंचन सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. इथेनॉल व सीएनजीवर चालणारे तसेच इलेक्ट्रिसिटीवर चालणारे मोटरसायकल, फोर व्हीलर व यापुढे ट्रॅक्टर्स व विमानातदेखील हे इंधन वापरण्यात येणार आहे. रासायनिक खते शेतीला सध्या परवडत नाहीत म्हणून नॅनो युरिया, नॅनो डीएपी यासारखी विद्राव्य खतांची ड्रोन यंत्रणेमार्फत फवारणी करून शेतीला कमी खर्चात भरघोस उत्पादन मिळत आहे. या व इतर अनेक आत्याधुनिक बाबींचा विचार करता आगामी दहा वर्षांतील काळ महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था दिवसेंदिवस गतिमान होत असून जगात तिसऱ्या नंबरच्या स्थानावर जाण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. भविष्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे रूपांतर आर्थिक उन्नती साधण्यांमध्ये होणार आहे. या प्रकारे देशात सर्वत्र उन्नती, प्रगती आणि कृषी औद्योगिक क्रांती घडवून आणत असतानाच भारत हा विश्वात सर्वार्थाने सर्वश्रेष्ठ देश बनवण्याचे पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न साकारण्यासाठी व त्यांना साथ देण्यासाठी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन गडकरी यांनी केले. श्री. बावनकुळे म्हणाले की, खा. नाईक-निंबाळकर हे रेल्वे, रस्ते, पाणी टंचाई याबाबतीत हजारो कोटी रुपयांचा निधी आणला असून भविष्यातदेखील ते अतिशय यशस्वीरित्या आपली जबाबदारी सांभाळतील.

खा. नाईक-निंबाळकर यांनी मी जनतेचा सेवक म्हणून या पाच वर्षात मतदारसंघात विकासकामे केली व यासाठी मला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, नितीन गडकरी व राज्यांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले. यामुळे विकास करणे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी तुकाराम ढवळे, शंभू मोरे, नागेश खटके, दिलीप भोसले, शिवाजी पाटील-चांदजकर, संजय पाटील-भीमानगरकर, भाजपा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, महिला अध्यक्षा प्रतीक्षा गोफणे, बाळासाहेब ढगे, विनायक चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्हॉइस चेअरमन सुहास पाटील-जामगावकर यांनी केले.

### उजनी धरणातील गाळ काढा

उजनी धरणातील गाळ काढणे, कृष्णा फ्लड डायवर्षन योजना आणि नीरा-भिमा योजना कार्यान्वित करणे तसेच महाराष्ट्रातील महत्त्वाची दोन तीर्थक्षेत्रांना जोडणारा १२२ किलोमीटर तुळजापूर-शिंगणापूर महत्त्वाचा रस्ता आणि याचबरोबर मतदारसंघातील मोठे रस्ते तयार व्हावेत यासाठी निधी मिळावा, अशी मागणी करून आम्ही खासदार निंबाळकर यांना विजयी करण्यासाठी प्रयत्नांची परकष्टा करत आहोत आणि ते निश्चित विजयी होतील, असा ठाम विश्वास आ. बबनराव शिंदे यांनी व्यक्त केला.

# ‘दर्शना’च्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या प्रियकराविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे**

शहरातील एका महाविद्यालयात अभियांत्रिकेचे शिक्षण घेणाऱ्या दर्शना पाटील या विद्यार्थीनीच्या आत्महत्येप्रकरणी तिच्या प्रियकराविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत प्रविण विठ्ठल पाटील (वय ४८, रा. ओमसाई रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३०४, शिरसोली रोड, मेहरून तलाव जवळ, जि. जळगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन स्वयंम लब्बा (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दर्शना पाटील (वय २१, रा. सत्यम चौक, राज पॅलेस, चौथा मजला, रूम नं. २५, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थीनीचे नाव आहे. प्रविण पाटील यांची मुलगी दर्शना ही शहरातील एका महाविद्यालयात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होती. २६ एप्रिल रोजी सायंकाळी दर्शना ही ती राहात असणाऱ्या रूममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आली होती. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात अकस्मात मयत म्हणून नोंद झाल्यानंतर पोलिसांनी तपास केला. स्वयंम लब्बा याने दर्शना हिच्यासोबत गेल्या १ वर्षापासून जवळीक निर्माण केली होती. २५ एप्रिल रोजी त्यांच्यात किरकोळ भांडण झाल्याने लब्बा याने अचानक दर्शनाशी बोलणे बंद केले. तसेच दर्शना हिच्याशी लग्न करण्यास नकार दिल्याने दर्शना हिने गळफास घेऊन आत्महत्या केली. दर्शनाच्या आत्महत्येस लब्बा हाच कारणीभूत असल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक बांभिष्टे पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर : मुंबईतील चेंबूर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणच्या धर्तीवर सोलापुरातील जुना पूना नाका चौकातील धर्मवीर संभाजी महाराज पुतळा चौकाचे सुशोभिकरण करण्यात येत आहे. या पुतळ्याभोवती असलेल्या बुरुजांवर मावळ्यांचे पुतळे बसविण्यात आल्याने पुतळ्याचे सौंदर्य खुलून दिसत आहे.

# जांबवंत सेना मोची समाज शहर जिल्ह्याच्या वतीने भाजपचे आ. राम सातपुतेंना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे -**

जांबवंत सेना मोची समाज शहर जिल्ह्याच्या वतीने भाजपचे उमेदवार आ. राम सातपुते यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला असल्याची माहिती मोची समाजाचे ज्येष्ठ नेते बाबुराव संगेपांग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या ६० ते ७० वर्षापासून मोची समाज कायमस्वरूपी कॉंग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला आहे. मात्र या समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय प्रगती झालेली नाही. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय पातळीवर कॉंग्रेसकडून मोची समाजाला कायम उपेक्षित ठेवण्यात आले आहे. नोकरी व्यवसायाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बेकारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. समाजाची घरे बांधण्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या मोची समाजातील हजारो समाज बांधव मात्र स्वतःच्या हक्काच्या घरापासून वंचित आहेत, असा आरोप बाबुराव संगेपांग यांनी केला आहे.

सोलापूर शहर-जिल्ह्यातील मोची समाजाचा विकासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमुळे होईल असा विश्वास असल्यामुळे भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते यांना पाठिंबा जाहीर करत आहोत, असे बाबुराव संगेपांग यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस भिमराव आसादे, अनंत गोडलोलू, मारेप्पा कंपली आदी उपस्थित होते.



# सर्वोदय समाज मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेचा भाजपचे आ.सातपुते यांना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे -**

महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त जाती जमाती संचलित नियोजित सर्वोदय समाज मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भाजपचे आ. राम सातपुते यांना पाठिंबा असल्याची माहिती चेअरमन भारत जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून सेटलमेंट भागातील १४ समाजातील नागरिकांना गाजर दाखवून समाजाची दिशाभुल आजपर्यंत कॉंग्रेस पक्षाने केली आहे. सेटलमेंट, लिमयेवाडी, रामवाडी, सलगरवाडी, शहानगर, एक नंबर, दोन नंबर झोपडपट्टी, सह या भागातील अनेक भटक्या-विमुक्त च्या मताच्या जोरावर कॉंग्रेसचे पक्षाचे आमदार, खासदार निवडून गेले. मंत्री झाले. तरी या भागातील भटके भटकत राहिले, असा आरोप भारत जाधव यांनी केला.

कैकाडी, पारधी यांच्यासह चौदा समाजातील लोकांना सेटलमेंट येथे २ राखीव असलेल्या जागेवर कॉंग्रेसने कोणत्याच प्रकारचे समाजाला पुनर्वसन करण्यासाठी आमच्या हक्काची जमिन मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेला नाही. भटके विमुक्त समाजाचा विकास आजवर झाला नाही. भटके विमुक्त समाजासाठी शिक्षणाचीदेखील नीट सोय न झाल्यामुळे या समाजातील हजारो तरुण अल्पशिक्षित राहिले. परिणामी, त्यांच्या नोकरी, व्यवसाय, रोजगाराचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. या परिस्थितीला कॉंग्रेस व इतर अनेक पक्ष जबाबदार आहेत. भटके विमुक्त समाजातील हजारो नागरिकांकडे अद्याप स्वतःचे घर देखील नाही. ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, अशी टीका जाधव यांनी केली. सोलापुरातील रे नगर येथील कामगारांच्या रखडलेला गृहप्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळेच पूर्ण झाला आहे. भटके विमुक्त समाजासाठीचा गृहप्रकल्प भाजपाच्या माध्यमातूनच होऊ शकतो असा ठाम विश्वास भटके विमुक्त समाजाला आहे. या पत्रकार परिषदेस काशीनाथ जाधव, वसंत जाधव यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# रविवारी यंदाचे सर्वोच्च तापमान

## निवडणुकीप्रमाणे सुर्याचाही वाढला पारा

## सोलापूर @ ४४.४

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर आणि माढा मतदारसंघात आज जाहीर प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यामुळे राजकीय वातावरणही तापून सर्वोच्च पातळीवर पोहोचले होते. त्याचप्रमाणे आज वातावरणातील तापमान देखील या हंगामातील रेकॉर्ड ब्रेक असे ४४.४ अंश नोंदविले. यामुळे आज दिवसभर नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत होती.

या हंगामात ३० एप्रिल रोजी ४४ अंश तर २८ एप्रिल रोजी ४३.७ अंश तापमानाची नोंद झाली होती. तर आज या हंगामातील सर्वाधिक तापमान नोंदविले गेले. ९ मे १९८८ साली सोलापुरात आजवरचे सर्वाधिक असे ४६ अंश असे तापमान नोंदवले आहे तर २० मे २००५ रोजी ४५.१ अंश अशा तापमानाची नोंद हवामान खात्याकडे झाली आहे. ३० एप्रिल २००८ रोजी ४३.८ अंश, त्यामुळे आज प्रचार शिगेला आणि तापमान देखील शिगेला अशीच स्थिती सोलापुरात पाहायला मिळाली.





आज यंदाचे सर्वाधीक तापमान असल्याने अक्षरशः सूर्यदेव कोपले होते. या मे महिन्यात सोलापुरातील तापमान अजून वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सध्या महाराष्ट्रच नाही तर देशभरात सूर्य आग ओकू लागला आहे. प्रत्येक २४ तासांत तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसने वाढ होत आहे. त्यामुळे सकाळी १०-११ वाजेनंतर घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. तर सायंकाळी ५ पर्यंत देखील वातावरणात उकाडा आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार महाराष्ट्रातील काही भागात उष्णतेची लाट येणार आहे. तर उत्तर भारतात देखील तापमान सरासरीपेक्षा अधिक राहील. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा तसेच गुजरात या राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. कमाल तापमानसह किमान तापमानात देखील वाढीचा अंदाज असून याचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसणार आहे. त्यामुळे मे महिन्यात नागरिकांनी अधिक काळजी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे. दरम्यान, अधूनमधून अवकाळी पाऊस मात्र डोकावणार असल्याने तापमानसोबतच उकाड्यात देखील प्रचंड वाढ होणार आहे. विदर्भासह मध्यप्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्यात पावसाच्या सरी कोसळतील. वादळी वारे, विजांच्या कडकडात पाऊस येण्याचा अंदाज वर्तविण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांशी संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, मे महिन्यात अवकाळी पाऊस, वादळ आणि विजांच्या गडगडाट झाला तर ऐन जून महिन्यात पेरणीच्या वेळेस पाऊस येत नाही, असा अंदाज शेतकरी बांधवांचा आहे.



# उजनीतून १० मे ला सोलापूर शहरासाठी पाणी सोडण्यात येणार : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून दिनांक १० मे २०२४ रोजी पाणी सोडण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. सोलापूर शहर महापालिके कडून उजनी धरणातून सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या औज व चिंचपूर बंधाऱ्यात पाणी सोडण्याबाबतचे मागणी पत्र देण्यात आलेले आहे. दिनांक २० मे २०२४ पर्यंत उजनी धरणातील पाणी वरील बंधाऱ्यात पोहोचल्यास सोलापूर महापालिकेचा पाणीपुरवठा सुरळीत राहणार आहे. सोलापूर महापालिका हद्दीतील नागरिकांना महापालिकेच्या वतीने वेळेत पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिनांक १० मे २०२४ रोजी उजनी धरणातून पाणी सोडण्याचे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देशित केले आहे. हे पाणी औज व चिंचपूर बंधाऱ्यात पोहोचण्यासाठी दहा दिवसाचा कालावधी लागतो. अंदाजे साडेपाच टीएमसी पाणी उजनी धरणातून सोलापूर शहरासाठी सोडले जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ७७२ मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध

## लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हा ; जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रापैकी सोलापूर महापालिका हद्दीत ७७२ मतदान केंद्र येतात. या सर्व मतदान केंद्रावर मतदारांनी मतदान करण्यासाठी दिनांक ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत यावे, यासाठी मतदान केंद्रावर सावलीची सुविधा, पिण्याचे पाणी, प्रत्येक मतदान केंद्रावर ३० ओ.आर.एस. पॉकेट, मतदान रांगेत ठराविक अंतरात खुर्च्या किंवा बेंचची सुविधा, स्वयंसेवक, मोबाईल हेल्थ टीम, प्रथमोपचार किट या उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी दिनांक ७ मे रोजी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच दिनांक ७ मे रोजी मतदान होत आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात वाढत्या उष्णतेमुळे मतदानाचे प्रमाण कमी झाल्याचा अंदाज आल्याने सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सावलीची व्यवस्था केली जात आहे. त्याप्रमाणेच सोलापूर महानगरपालिका हद्दीतील ७७२ मतदान केंद्रावर व्हील चेअर, रॅम्पची व्यवस्था, मतदान केंद्राची आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता, शौचालयाची स्वच्छता सह अन्य सर्व सोयी सुविधा प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तरी सोलापूर शहरातील सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर येऊन मतदान करावे.

प्रत्येक मतदान केंद्रावर जेष्ठ मतदारांच्या व दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी व्हील चेअरची सुविधा देण्यात आली असून त्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवक ही नियुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे मतदान केंद्रावर रॅम्पचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मदत कक्ष उघडण्यात येणार आहे, त्या ठिकाणी बी. एल.ओ.ची नियुक्ती केलेली आहे. मतदारांच्या आरोग्यासाठी प्रत्येक म तदार केंद्रावर स्वच्छतागृह स्वच्छ करण्यात आलेले आहेत. मतदारांना हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच व पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र आहेत अशा ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्राला कलर कोडींगचा वापर केलेला असून मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे सुलभ करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी देऊन सर्व मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केले आहे.


# विकासाला विरोध नाही पण झाडे जगवली पाहिजे

## नागरिक व निसर्गप्रेमींची भूमिका

**तभा वृत्तसेव । सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि.५ मे-**

कन्नड तालुक्याला मराठवाड्याचे प्रवेशद्वार मानले जाते.उत्तर भारत व दक्षिण भारताला जोडणाऱ्या धुळे सोलापूर महामार्गामुळे केवळ दोन भाग नव्हे तर खानदेश व मराठवाडा भिन्न संस्कृती,भिन्न बोली भाषा असलेले प्रदेश जोडले गेले. या महामार्गामुळे रस्त्यावरील वर्दळ प्रचंड प्रमाणात वाढली.विकासाची गंगा कन्नड सारख्या दुर्लक्षित तालुक्या पर्यंत पोहचली.या महामार्गामुळे तालुक्याच्या वैभवात लक्षणीय वाढ झाली. अनेक कारणाने विकासापासून दूर असलेला हा तालुका जगाच्या नकाशावर आला.जागतिक दर्जाच्या महामार्गामुळे दळणवळण सुविधेत वाढ झाली.इंधनाचा खर्च कमी झाला.या सर्व कारणांमुळे कन्नड





भाग ६

**सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड**

तालुक्याचे अर्थकारण सुधारले आहे.त्यामुळे महामार्गाच्या रूपाने झालेल्या विकासाला नागरिकांचा विरोध नाही मात्र हा महामार्ग ओसाड झाला याला विरोध आहे.

या महामार्गाच्या बांधकाम काळात येथील ऐतेहासिक व वैभवशाली वृक्ष तोड करण्यात आली.त्याऐवजी महामार्ग प्राधिकरण प्रशासनाने इंडियन रोड काँग्रेस यांच्या निकषांनुसार रस्त्याच्या मध्यभागी शोभिवंत झाडे व दुतर्फा वृक्ष लागवड करण्याचा खासगी कंपनीला कंत्राट दिला.मात्र गेल्या तीन वर्षात या कंपनीने या कामाकडे दुर्लक्ष केल्याने हा महामार्ग ओसाड झाला आहे.

**- प्रतिक्रिया -**

अनादी काळापासून या रस्त्यावर झाडे आहेत.या झाडांना या परिसरातील शेतकरी व नागरिक जीवापाड जपत होते.महामार्ग बांधकाम करतांना हे वृक्ष तोडण्यात आले.त्याऐवजी चौपट ते पाचपट वृक्ष लावण्याचे आश्वासन महामार्ग प्राधिकरणाने दिले होते.त्या आश्वासनांचा आधारावरच नागरिकांनी व निसर्ग प्रेमींनी जुने वृक्ष तोडण्याची संमती दिली होती.मात्र प्राधिकरणाने आपले आश्वासन पाळले नाही.हा महामार्ग ओसाड केला.या महामार्गाला पूर्व वैभव प्राप्त झाल्याशिवाय आम्ही कंपनीला सोडणार नाही.या उन्हाळ्यात कंपनीने आहे त्या झाडांना जगविणे,पावसाळ्यात बाद झालेले सर्व झाडे लावणे व दुतर्फा सर्व झाडांना सुरक्षा जाळी बसवणे.अन्यथा लोकशाही मार्गाने आम्ही जन आंदोलन उभारू.कायद्याप्रमाणे न्यायालयात दाद मागू.

**-उदय गवळी :- सामाजिक कार्यकर्ता,**

या महामार्गामुळे परिसराचा विकास झाला,आमचा या विकासाला विरोध नाही मात्र झाडे जगली व वाढली पाहिजे अशी आमची भूमिका आहे.रस्त्यालगतची झाडे केवळ सावली देत नाही तर हे झाडे ऑक्सीजन देतात,कार्बन डाय ऑक्साईड शोषून प्रदूषण कमी करतात. महामार्गावरील गाड्यांचा आवाज शोषून ध्वनी प्रदुषण कमी करतात. वाहनातील इंजिन मधील ज्वलनातून निर्माण झालेले घातक प्रदूषके शोषून हवा स्वच्छ करतात. शेतकरी थेट ग्राहकाला शेतीमाल विकत असल्याने शेतकऱ्यांच्या पदरात दोन पैसे जास्त पडतात. मात्र हा महामार्ग ओसाड झाल्याने वरील सर्व फायद्याला आपण मुकत आहोत.

**-डॉ.रमेश सुर्यवंशी, इतिहासकार,निसर्गप्रेमी**

झाडांना जोपासने हे कर्तव्य आहे आणि आम्ही त्या पद्धतीने काम करत आहोत,पण बरेच शेतकरी झाडे तोडून टाकतात,काही जनावरांनामुळे झाडे तुटत आहेत त्यामुळे झाडांचे संगोपन करताना मोठा त्रास होत आहे त्यातचं मुरूम मिश्रित माती असल्याने झाडे जगवताना मोठी कसरत होत आहे.

**-रवींद्र इंगोले, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

महामार्गाच्या दुतर्फा लावलेल्या झाडांना सुरक्षा जाळी लावणे आवश्यक होते. मात्र कंपनीने निकष डावलून जाळ्या लवल्याच नाही. उलट प्राधिकरणाचे अधिकारी म्हणतात की, आम्ही सुरक्षा जाळ्या लावल्या होत्या, त्या चोरीला गेल्या. आमचे प्राधिकरणाला सांगणे आहे की, आमच्या पूर्वजांनी आतापर्यंत येथील झाडांची स्वतः जोपासना केली. असे शेतकरी या जाळ्या कशा चोरणार? जाळ्या लावल्याच नाही तर चोरण्याचा प्रश्नच नाही.

**-जगन्नाथ खोसरे**
**शेतकरी,सामाजिक कार्यकर्ते, गल्लेबोरगाव.**

तालुक्यातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांची निगा,संगोपन करण्यात कंत्राटदार सपशेल अपयशी झालेल्या आहे. आम्हाला आमच्या तालुक्याचे वैभव परत हवे आहे. त्यासाठी आम्ही गावागावतील ग्रामपंचायतमध्ये ठराव घेवून मोठया प्रमाणात जनआंदोलन उभारू, आमचे एवढेच म्हणणे आहे.

**-साहेबराव अकोलकर-**
**शेतकरी,सामाजिक कार्यकर्ते, हतनूर**

# राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत ‘श्राविका’चे 31 विद्यार्थी पात्र



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

उमाबाई श्राविका विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या राज्य इयत्ता ८ वी परीक्षा तसेच इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.

परीक्षेत इयत्ता ८वी मधील पृथ्वी शरद कोळी या विद्यार्थिनीने सोलापूर जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. यश संपादन केल्याबद्दल श्राविका संस्थेच्या सीईओ देवई शहा व वरिष्ठ दीप्ती शहा यांच्या हस्ते विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. तसेच १ मे रोजी जाहीर झालेल्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या अंतरिम निकालानुसार प्रशालेतील इयत्ता ५ वीचे २६ विद्यार्थी पात्र ठरले यात प्रतिक काकडे २४६, वेदांत कुलकर्णी २१६, प्रणिती लवंड २०० गुण मिळवित प्रशालेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. इयत्ता ८ वीचे पाच विद्यार्थी पात्र ठरले. सचिव हर्षवर्धन शहा, मुख्याध्यापक सुकुमार म्होळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

# अधिकारापलीकडे जाऊन रोहित पवार उड्या मारताहेत

## राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांची टीका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

तीन वेळा मुख्यमंत्री आणि दोन वेळा या देशाचे पंतप्रधान पद सांभाळणारे नरेंद्र मोदी हे मोठे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या विरोधात वक्तव्य करण्याइतपत आमदार रोहित पवार मोठे नाहीत. केवळ एक झेडपी टर्म आणि अर्धी आमदारकीची टर्म पाहिलेले रोहित पवार हे अधिकाराच्या पलीकडे जाऊन उड्या मारत असल्याचे दिसून येते, अशी टीका राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका सभेमध्ये माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना कुटुंब सांभाळता आले नाही अशी टीका केली होती. त्यावर आमदार रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत पंतप्रधान मोदी यांना बायको सांभाळता येत नाही, अशी टीका केली होती. त्यावर बोलताना प्रवक्ते उमेश पाटील यांनी पलटवार केला. उमेश पाटील पुढे म्हणाले, नरेंद्र मोदी यांनी गुजरात मध्ये तीन वेळा मुख्यमंत्रीपद सांभाळले. त्यानंतर ३०० हून अधिक जागा घेऊन पंतप्रधानपद दोन वेळा भूषवत आहेत. देशासाठी, देशाच्या विकासासाठी त्यांनी मोठा त्याग केला आहे. अशा महान व्यक्तीच्या विरोधात वक्तव्य करण्याइतपत आमदार रोहित पवार यांना अधिकार नाही. वास्तविक पहाता रोहित पवार यांनी एक झेडपीची टर्म आणि अर्धी आमदारकीची टर्म आत्ता सांभाळली आहे असे असताना अधिकाराच्या पलीकडे जाऊन ते उड्या मारत असल्याचे दिसून येते, असा उपरोधिक टोला मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी लगावला. पहाटेच्या शपथविधी आणि इतर गोष्टी संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर विनाकारण टीकाटिपणी केली जात आहे. वरिष्ठांच्या सल्ल्यानेच सर्व काही होत होते. निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना नव्हता. मात्र सातत्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना व्हीलन बनविण्याचा प्रयत्न झाला. तो चुकीचा आहे, असेही मुख्य प्रवक्ते उमेश पाटील म्हणाले.

# एप्रिल महिन्यात ९१९ वेळा तिकीट तपासणी

## १ कोटी ५२ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

सोलापूर रेल्वे विभागाकडून एप्रिल महिन्यात ९१९ वेळा तिकीट मोहीम राबविली असून त्यामध्ये २५ हजार जणांवर कारवाई करून १ कोटी ५२ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरजकुमार दोहारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक योगेश पाटील आणि सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक कल्पना बनसोडे यांच्या देखरेखी खाली खऱ्या अर्थाने आरामदायी आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली आहे. यावेळी रेल्वे प्रवाशांना वैध प्रवास तिकीट घेऊन प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आले. शेवटच्या क्षणी आरक्षण सुविधा देण्यासाठी, चार्ट तयार झाल्यानंतर आणि ट्रेनच्या नियोजित प्रस्थानाच्या ३० मिनिटे आधी प्रवासी चालू आरक्षण सुविधेचा लाभ घेऊ शकतात. रांगेत उभे राहू नये म्हणून प्रवाशांना निवडक स्थानकांवर (स्वयंचलित तिकीट



वेंडिंग मशिन्स) वरून तात्काळ अनारक्षित तिकिटांची सुविधा मिळू शकते. त्रास मुक्त सेवा आणि सुविधा देण्यासाठी रेल्वेने प्रयत्नशील असताना मोबाइल अँप उपलब्ध करून दिले आहे.

# श्री स्वामी समर्थांचा इतिहास

### स्वामी समर्थांचे पूर्वायुष्य

**स्वामी महाराजांचा जन्म कोठे झाला?, केव्हा झाला?, कोणत्या प्रांतात झाला?, त्यांचे आई वडील कोण होते?, त्यांची जात कोणती?, त्यांनी दिक्षा कोणाकडून घेतली? म्हणजेच त्यांचे गुरु कोण? याबद्दल कोणतीच माहिती उपलब्ध नाही. मात्र त्यांच्या तोंडी अनेक वेळेस वेदांतील, पुराणातील वाक्ये होती यावरून ते ब्राह्मण होते असा अंदाज लावता येतो.**

श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्त संप्रदायातील श्री दत्तात्रयांचे तिसरे पूर्ण अवतार होय. पहिले श्रीपाद श्रीवल्लभ तर दुसरे श्री नरसिंह सरस्वती होत. श्री स्वामींच्या काही इतर चरित्रकार असे म्हणतात की, श्रीनृसिंह सरस्वती हे तीर्थाटन करीत भ्रमंती करीत असता श्रीशैलच्या जंगलात म्हणजेच कर्दळी वनात गुप्त झाले व साधारण ३०० वर्षे समाधी अवस्थेत असताना एका लाकूडतोड्याच्या कुऱ्हाडीचा एक घाव वारुळावर पडून त्यांची समाधी भंग पावली. तेच श्री नृसिंह सरस्वती पुढे कलकत्ता, भुवनेश्वर, काशी अशी तीर्थक्षेत्रांना भेटी देत मंगळवेढा, सोलापूर व अक्कलकोट असा त्यांचा प्रवास झाला. हा त्यांचा प्रवास स्वतः स्वामी समर्थांनी कलकत्यातील पारशी गृहस्थांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. समर्थांचे २१-२२ वर्ष अक्कलकोट येथे वास्तव्य होते. समर्थांचे प्रकट वास्तव्य एकूण ४० वर्षाचे होते असे मानले जाते. ( शके १७६० ते १८०० )

### प्रकट दिन

स्वामी महाराज हे प्रथम मंगळवेढा येथे शके १७६० म्हणजेच सन १८३८ च्या सुमारास आल्याचे बोलले जाते. मात्र ते कोठून आले? त्यांचा जन्म काळ कोणता? हे समजत नाही. त्यांच्या जन्माबाबत किंवा प्रकट होण्याबाबत काही भक्तजनांनी स्वामी महाराजांनाच वेगवेगळ्या प्रसंगी विचारले असता महाराजांनी दिलेल्या उत्तरानुसार दत्तनगर मूळ पुरुष वडाचे झाड ! म्हणून म्हणत. याशिवाय मूळ मूळ याप्रमाणे अनेक वेळेस उच्चारीत असत.

नवनाथांपैकी एक गोरक्षनाथांनी सिद्धसिद्धांतपद्धती मध्ये अवधूत अवस्थेबद्दल सांगितले आहे. त्यानुसार स्वामी महाराज हे अवधूत होते म्हणजेच ते कोणताही विधीनिषेधांच्या अतीत असा, सर्वसामान्यांच्या विपरीत प्रकृतिविकारांचा त्याग केलेला, सर्वसंग परित्याग केलेले, षडरिपूपासून दूर असलेले श्री स्वामी महाराज होते. हिंदू धर्मानुसार चार वर्ण, चार आश्रम यांच्या व्यवस्थेत न बसणारे आत्मस्वरूपात स्थिर झालेले होते.


### स्वामी समर्थांची जन्मपत्रिका

गोपाळ बुवा केळकर यांच्या ग्रंथात स्वामी महाराजांची जन्मपत्रिका असून अक्कलकोट येथील नानाजी बापूजी रेखी ( पिंगला ज्योतिषी ) यांच्याकडून स्वतः स्वामी महाराजांनी ती आज्ञा देऊन करून घेतली होती. त्यानुसार जन्मकाल बहुधान्य नाम संवस्तरे १०७१ चैत्रशुद्ध द्वितीया, अश्विनी नक्षत्र दुसरे चरण, प्रीती योग गुरुवार जन्म दोन घटका दिवसास धरणी दुभांग होऊन ८ वर्षाची बालकमूर्ती प्रकटली. स्थळ हस्तिनापूरपासून ( जुनी दिल्ली ) १२ कोस दूर छेली या खेडेगावी, आद्य नाडी, देवगण यजुर्वेदी ब्राह्मण, काश्यप गोत्र, टोपणनाव नृसिंहभानू, जन्मनाव चैतन्यस्वामी, मेष रास राशी स्वामी मंगळ जन्मलग्न मीन याप्रमाणे माहिती आहे (सदरची जन्मपत्रिका मूळ प्रत ‘अक्कलकोट स्वामीमठ’ अहमदनगर येथे उपलब्ध आहे.)

### महाराजांचे वर्णन

श्री स्वामी समर्थ महाराज हे कसे दिसत होते हे समकालीन शिष्याने लिहून ठेवलेल्या पोथ्या व बखरीतून दिसून येते. त्यातील वर्णनानुसार स्वामी हे अजानुबाहू होते. म्हणजेच त्यांचे हात गुडघ्यापर्यंत लांब होते. त्यांची उंची साधारण व्यक्ती पेक्षा जास्त म्हणजे सहा ते साडेसहा फूट किंवा त्यापेक्षा जास्त होते. स्वामी महाराज जेव्हा जुन्या राजवाड्यात जात असत. तेव्हा ते राजवाड्याच्या मुख्य दरवाज्याच्या वरच्या बाजूस असलेल्या श्री गणेशास हात लावून हे माझ्या गण्या असे संबोधित असत. रुंद खांदे, विशाल उदर - महाराजांचे पोटमात्र मोठे आणि गोल असल्याचे वर्णन मिळते. नजर भेदक व तीक्ष्ण भिवयांच्या रंग सफेद पांढरा, वर्णगोरा आणि क्रांती तेजस्वी होती. महाराजांचे कान मोठे होते, डोक्यावर जरीची कानटोपी व अंगावर सेवेकरी शाल पांघरत. स्वामी समर्थ यांना झोप लागलेले कोणीही पाहिले नाही मात्र ते डोक्यावर पांघरून घेऊन निजत असत. त्याच अवस्थेत ते अभंगाची कडवी, श्लोक म्हणत असत. त्यामुळेच ते जागे आहेत असे सर्वांनाच वाटत असे.

### अक्कलकोट येथे आगमन



**पुण्यतिथी विशेष**

स्वामी महाराजांचे अक्कलकोट येथील आगमन हे सन १८५७ च्या प्रारंभीचे मानले जाते. तर काही ठिकाणी माणिकप्रभू या मराठवाड्यातील दत्तपरंपरेतील अधिकारी पुरुष (साधू) यांच्या समवेत तीन दिवस राहून सप्टेंबर किंवा ऑक्टोबर १८५६-५७ मध्ये अक्कलकोट येथील एस.टी. स्टँड समोरील खंडोबाच्या मंदिरात आल्याचे मानले जाते.

### अक्कलकोट येथील वास्तव्य

एकंदरीत स्वामी महाराजांच्या अक्कलकोट येथील वास्तव्य हे २१-२२ वर्षांचे होते. स्वामी महाराजांबद्दलची माहिती ही जेव्हा स्वामी अक्कलकोट येथे आले तेव्हापासूनचेच आहे. त्याअगोदरची माहिती ही स्वतः स्वामींनी वेगवेगळ्या प्रसंगी जिज्ञासू किंवा शिष्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून उपलब्ध होते. एकदा कर्वे नावाच्या शिष्याने आपली ज्ञाती कोण? असा प्रश्न महाराजांना केला असता, आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण आमचे नाव नृसिंहभानू, कश्यप गोत्र, मीन रास असे सांगितल्याचे उल्लेख मिळतात. स्वामी महाराज जात-पात मानत नसत. ते कोणाकडेही भोजन करीत असत. यातून असे दिसून येते की सर्व मानव जात एकच आहे आणि संन्याशी अवधूतांना कोणतेही विटाळ स्पर्श करू शकत नाही. इतकच काय स्वामी महाराजांनी राजा किंवा सामान्य प्रजा, अक्कलकोटचे मामलेदार, न्यायाधीश, कोतवाल यांनाही श्रीमुखात दिलेले होते. त्यांच्या बोलण्यात हिंदी वाक्य सारखी असत. त्यात शिव्याही देत असत. मात्र त्यांच्याशी कोणीही उद्धट बोलत नसत. कारण ज्यांनी अक्कलकोट नरेशाची तमा बाळगली नाही, त्यांच्यासमोर सामान्य जणांची काय बिशाद?त्यांचा हा निडरपणा पाहून भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे वाक्य सार्थ वाटते.

### समाधी मठ

स्वामी समर्थ यांनी चैत्र वैद्य त्रयोदशी शके १८०० ( ३० एप्रिल १८७८ ) मध्ये समाधी घेतली. चोळप्पांचे निवासस्थान व नंतरचे समाधी स्थान हे बुधवार पेठेत आहे. या जुन्या वाड्याचे सध्या नूतनीकरण चालू आहे. जवळच स्वामींनी पुनर्जीवित केलेली विहीर, स्वयंभू गणपती, स्वामींचा दंड, पादुका या प्रासादिक वस्तु येथे दर्शनास उपलब्ध आहेत. दररोज सकाळी येथे पूजा, अभिषेक, लघुरुद्र, महापूजा इत्यादी धार्मिक विधी भक्त अत्यंत श्रद्धेने करताना दिसतात. अभिषेकानंतर समाधी वस्त्रांनी पुसून त्यास सोवळे व करवत काठी उपरणे पांघरतात. समाधीवर स्वामींचा मुखवटा ठेवून त्यावर फुलांची आरास करतात. हे दृश्य अतिशय नयन मनोहर असते. प्रदक्षिणा करून नमस्कार करताना स्वामींच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचा भास होतो हे मात्र नक्की. स्वामींच्या काळापासूनच या वास्तूला महत्त्व आहे.

### श्री वटवृक्ष मंदिर

मंदिर परिसरात स्वामी समर्थकालीन एक मोठे वडाचे झाड अद्यापही आहे. त्या झाडाखाली स्वामी समर्थ रोज बसत असत म्हणूनच त्या मंदिराला वटवृक्ष मंदिर असे म्हणतात अक्कलकोटची भूमी ही स्वामींच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे व भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे स्वामी आजही येथे आहेत अशी भक्तांची पूर्ण श्रद्धा आहे. अक्कलकोटचा विकास मुख्यत्वे या मंदिरास केंद्रस्थानी ठेवूनच झाला आहे येथे एक भव्य स्वामी मंदिर आहे. त्यात मुख्यतः श्रींच्या पादुका, शिवलिंग स्वामींच्या स्मृती वस्तू, प्रवचन हॉल, छोटीशी निवास व्यवस्थाही आहे. स्वामींनी अनेक लीला याच परिसरात केलेल्या आहेत. या परिसरात वटवृक्षाखाली छोट्याशा मंदिरात स्वामींच्या पादुका आहेत. त्याला कान लावल्यावर अनेक वाद्यांचे आवाज येतात असा भक्तांचा अनुभव आहे. स्वामींचे त्यांच्या जीवनकाळात सर्वत्र वावर होता. पण जास्त येथे व चोळाप्पांच्या मठात होता. वटवृक्ष मंदिरात सकाळी अभिषेक, रुद्रपठण चालते. येथे अनेक जुने फोटो लावलेले आहेत. येथेच मारुती मंदिर व शिवलिंग आहे. सातत्याने येथे भजन किर्तन व आध्यात्मिक प्रवचने चालतात. त्रिकाल आरती होते. जवळच मंदिर संस्थानचे ऑफिस आहे. येथे भक्त द्रव्य रुपाने सेवा अर्पण करू शकतात. सदर मंदिर ट्रस्टमार्फत भक्तनिवासाची व्यवस्था आहे. तसेच छोटेखानी उपहारगृह आहे. येथेच स्वामींचे कायमस्वरूपी संग्रहालय आहे. यात स्वामींच्या जीवनदर्शन घडवणारे फोटो व वस्तु आहे. त्यातील काही फोटो अचंबित करतात येथे स्वामींची एक मूर्ती आहे. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे या स्वामी वाक्यांचा प्रत्यक्ष प्रत्यय मंदिरात येतो.

### अक्कलकोट नरेशांचे भविष्यातील प्रकल्प-अनुभूती

अक्कलकोट येथे पंचायतन गणपती मंदिर आहे. हे मंदिर अत्यंत प्राचीन असून तब्बल दीडशे वर्षांपूर्वी याच मंदिरात मालोजीराजे द्वितीय व स्वामी समर्थ महाराज यांची भेट झाली होती. सध्या मंदिराची पडझड झाल्याने अक्कलकोट नरेश मालोजीराजे तृतीय यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतले आहे. त्याचबरोबर अक्कलकोट नरेश मालोजीराजे भोसले तृतीय यांनी अत्यंत महत्त्वकांक्षी प्रकल्प अनुभूती हाती घेतला आहे. या प्रकल्पाला अनुभूती हे नाव का दिले? असे मुलाखतीत प्रश्न विचारले असता त्यांनी मला प्रत्यक्ष स्वामींची अनुभूती आली म्हणूनच मी या प्रकल्पाला अनुभूती हे नाव दिले असे त्यांनी सांगितले. सदर प्रकल्प ४२ एकरमध्ये उभारण्यात येणार असून या प्रकल्पासाठी ३०० ते ३५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून हा प्रकल्प ४ ते ५ वर्षात पूर्ण होणार आहे. यामध्ये श्री स्वामी समर्थ यांचा १०८ फुटी पुतळा तलावाच्या मधोमध उभारण्यात येणार असून या माध्यमातून अक्कलकोट परिसराचा सर्वांगीण विकासास मदत होणार आहे. हे क्षेत्र धार्मिक पर्यटन स्थळ तर आहेच त्याचबरोबर लवकरच ऐतिहासिक व नैसर्गिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध होणार आहे यात शंका नाही.

**- प्रमोद हंचाटे, -मुख्याध्यापक**
**हिंगुलांबिका प्राथमिक शाळा**
**(मो.८१४९१८२१३५)**

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एटीएसई परीक्षेत आगळगाव जि. प. प्राथमिक शाळेचे यश



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे-**

राज्यस्तरीय अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत आगळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या १५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये ईश्वरी संताजी थिटे, श्रुती अमित थिटे, आयुष सुशेन डमरे, जानवी सुनील नांदवटे, स्वराज विश्वास डमरे, विश्वजीत आनंद कोरे, यश नेताजी थिटे, सम र्थ प्रवीण डमरे, जय नवनाथ गायकवाड, सुहानी अमोल सुतार, ज्ञानेश्वरी राहुल करडे, मंथन राहुल विधाते, वैष्णवी सुनील डमरे, नयन नेताजी थिटे, क्रांती उम ाकांत उकिरडे, श्रेया धनाजी डमरे, अक्षय धनवटे, विराज डमरे, समीर तांबोळी, श्रेयश दरपे, सार्थक गंभीरे, विराज लंगोटे, प्रथमेश गिराम, प्रीत करडे, रेहान पठाण, जियान मणियार, श्रेया करडे, संस्कृती ओमन, श्रद्धा डमरे, ईश्वरी नवले, वैष्णवी गिराम, तेजश्री सुतार, स्नेहल विधाते, सिमरन तांबोळी, सानवी विधाते, शांभवी कुलकर्णी यांनी यश संपादन केले. त्यांचे मुख्याध्यापिका अनिता थोरात, सुभद्रा नाईकवाडी, शशिकला भगत, कल्याण नांदवटे, राजाभाऊ मुंडे, सरला गाडे, पालक अश्विनी डमरे, स्नेहा गिराम, प्रतिभा थिटे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### 'सह्याद्री'च्या विद्यार्थ्यांची बंगळुरुच्या आयुरपार्क हेल्थकेयर फार्मसी कंपनीला भेट

**सांगोला, दि. ५ मे -**

मेथवडे येथील सह्याद्री फार्मसी कॉलेजच्या बी. फार्मसी विद्यार्थ्यांची बंगळुरु-म्हैसूर सहलीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी बंगळुरु-म्हैसूरमधील जगप्रसिद्ध ऐतिहासिक अशा प्रेक्षणीय स्थळास भेटी दिल्या. तसेच बंगळुरु येथील आयुरपार्क हेल्थकेयर या औषधे तयार करणाऱ्या कंपनीस भेट दिली. कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना कंपनीत असणारे विविध विभाग व त्यांची कार्यप्रणाली याविषयी संपूर्ण माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. महाविद्यालयातर्फे आयुरपार्क हेल्थकेयर युनिट हेड शिवकुमार व प्रोडक्शन इन्चार्ज अलोक यांचा सत्कार करण्यात आला.हि शैक्षणिक सहल व फार्मा कंपनी भेटी यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले,प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. एस. पी. जोकार, डॉ. ए. एम. तांबोळी, डॉ. एस. एम. मोरे, डॉ. एन. ए. तांबोळी,, प्रा. ए. डी. माळी, प्रा. एस. एम. माळी यांचे योगदान लाभले.



### उडगी हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**अक्कलकोट, दि. ५ मे-**

तालुक्यातील उडगी हायस्कूल येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक संजय जानराव यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहण पुणे बोर्डचे वरिष्ठ लिपीक मल्लिकार्जुन जिगजंबगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नागेंद्र नारायणकर, दत्तात्रय धर्मसाले, गेनसिद्ध पुजारी, संतोष बिराजदार, शामकांत शिंदे, शंकर हारकूड, श्रीदेवी बिराजदार, अंबादास शिंदे, खांडेराव म्हेत्रे, श्रीमंत नारायणकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये करकंबच्या एस.पी. स्कूलचे २५ विद्यार्थी पात्र

**करकंब, दि. ५ मे-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पायल फाउंडेशन नांदोरे संचलित एस. पी. स्कूलचे पाचवी व आठवीतील २५ विद्यार्थी पात्र झाले. श्रुती बनसोडे २३२ गुण, सई तळेकर २२४ गुण, आर्यन शिंदे २१८ गुण, आदर्श भोसले २०८ गुण, अक्षरा व्यवहारे २०६ गुण, तन्वी बाबर २०४ गुण, आरोही उलभगत २०२ गुण, प्रणव थिटे २०२ गुण, आसावरी गायकवाड १८६ गुण, अनुष्का पांढरे १८२ गुण, रणवीर व्यवहारे १६८ गुण, प्रिया भिंगारे १६८ गुण, यशश्री केचे १६२ गुण, प्रगती काटकर १५८ गुण, गार्गी बोबडे १५२ गुण, सूर्यप्रताप तळेकर १५२ गुण, तनिष्का बाबर १५० गुण, श्रावणी तळेकर १४८ गुण, प्रथमेश इंगळे १४८ गुण, सिद्धी कुलकर्णी १४६ गुण, पृथ्वीराज व्यवहारे १४२गुण तर आठवीमधून जयराजे भोसले २५८ गुण, राज भोसले १९६ गुण, स्नेहल सरवदे १८४ गुण, आदित्य यजगर १४४ गुण मिळवून यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांना कादर मुलाणी, विद्या कोरके, करुणा हजारे, अमरनाथ इंगोले, साईनाथ कुंभार, शहाजी साठे, रामचंद्र सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक डॉ. नंदकुमार होनराव, संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, खजिनदार विक्रम भिंगारे, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण, उपमुख्याध्यापक ूरज अलगुडे यांनी केले.



### सांगोल्याच्या विद्या मंदिरमध्ये महाराष्ट्रदिनी मान्यवरांच्या हस्ते उत्साहात ध्वजारोहण

**सांगोला, दि. ५ मे-**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज येथे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्यो हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास ह. द. माळी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी चित्रकला स्पर्धेतील यशासाठी मार्गदर्शक शिक्षक राजेंद्र जाधव व अमोल उकळे, सेवानिवृत्त होणारे प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, पर्यवेक्षक अजय बारबोले, पोपट केदार, राजेंद्र जाधव यांचा संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म ल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य चंद्रशेखर अंकलगी यांनी सत्कार केला. प्रास्ताविक प्रा. धनाजी चव्हाण, ध्वजारोहण निवेदन डी. के. पाटील, सत्कार निवेदन सुनील भोरे यांनी केले. सूत्रसंचालन उन्म ेष आटपाडीकर यांनी तर आभार पर्यवेक्षक पोपट केदार यांनी मानले.

## संविधान बोलेगा, मोदी चलेगा : नितीन गडकरी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ मे-**

सबसे बडा संविधान आहे. या देशात संविधानाशिवाय काहीच मोठे नाही. संविधान बोलेगा, मोदी चलेगा, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

अक्कलकोट येथे भारतीय जनता पार्टी-महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारार्थ रविवारी आयोजित केलेल्या अक्कलकोट बसस्थानकासमोरील सभेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उमदेवार आ. राम सातपुते, खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, शहाजी पवार, आनंद चंदनशिवे, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, रासपचे सुनिल बंडगर, आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, शिवराज स्वामी, सुरेखा होळीकट्टी, ज्योती उण्णद, रामचंद्र होनराव, आणप्पा बाराचारी, स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील, माजी जि. प. सदस्य शिवानंद पाटील, शिवसेना महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षा चव्हाण, वसंत देडे, महेश हिंडोळे, ताराबाई कुभार आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले, आतापर्यंत अक्कलकोटचे विकास शेकडो कोटीने झाले आहे. यापुढील काळातसुद्धा विकासाचे आलेख पुढे नेण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांना साथ द्या, असे आवाहन करत देशातील गरीब हटाव नारा काँग्रेसचे गांधी घरण्यानी सत्तर वर्षे सतत दिले. मात्र काहीच केले नाही. वारंवार संविधान बदलण्याचा पाप काँग्रेस पक्षाने केले आहे. काँग्रेसने साठ वर्षांत प्रत्यक्षात काहीच केले नाही. भाजपाचा विचार समाज बदलायचं आहे. गावाकडचे लोक शहराकडे मोठ्या प्रमाणात वळत आहे. ते आहे त्या ठिकाणी थांबवण्यासाठी सरकारला पावले उचलावे लागणार आहे. पुणे, मुंबईकडे गेलेल्या तरुणांना गावाकडे आकर्षित करणे आवश्यक आहे. काँग्रेसकडे लोकांना सांगण्यासारखे काहीच नाही. भाजपबद्दल अपप्रचार करत आहेत. संविधान कोणीच बदलू शकत नाही. जातीवादाचे प्रयोग करून काँग्रेस निवडणूक लढत आहे. मानवतेच्या आधारतेवर राष्ट्र उभा होणं आवश्यक आहे. काँग्रेसने साठ वर्षात देशाला वंचित ठेवण्याचे पाप केले. केला.

श्री. बावनकुळे म्हणाले, मागच्या चाळीस वर्षांत काँग्रेसने अक्कलकोट तालुक्याची दुर्दशा केली होती. आता त्यांच्याकडे प्रचारात मुद्दे नसल्याने जातीयवादी बी पेरून निवडणूक लढवत आहे. या जाहीर सभेस यशवंत धोंगडे, शिवशरण वाले, मीलन कल्याणशेट्टी, बाळा शिंदे, चंद्रकांत दसले, धनंजय गाढवे, विश्वनाथ नागूर, अप्पू परमशेट्टी, आनंद चंदनशिवे आदी उपस्थित होते.

### गडकरींमुळे सहा हायवे

गेल्या ६५ वर्षांत जी प्रगती साधली नाही. ती प्रगती गेल्या दहा वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात झाली आहे. तालुक्यात रस्त्याची अतिशय वाईट स्थिती होती. आज तुम्ही काही वेळातच तडवळ भागात पोहोचू शकतात. सहा हायवे अक्कलकोट तालुक्याला रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहेत, असे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

### हायवेमुळे व्यावसायाला भरभराट

केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सहा महामार्ग दिल्याने या भागात हॉटेल व्यवसाय, धाबे, विविध प्रकारचे व्यवसाय वाढले आहेत. आर्थिक देवाण-घेवाण वाढली आहे. रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली आहे. गेली सत्तावीस वर्षे अक्कलकोट तालुक्याला उजनीचे पाणी मिळाले नाही. पण थोड्याच दिवसात उजनीचे पाणी हे अक्कलकोट तालुक्याच्या कुरनूर धरणामध्ये येणार आहे. याची चाचणीदेखील झाली आहे, असे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

## अहिल्यादेवी होळकरांच्या प्रेरणेने कार्य करणाऱ्या भाजपाला निवडून द्या : आ. गोपीचंद पडळकर



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ मे-**

बहुजन समाजाचे आराध्य दैवत असणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे अपूर्ण राहिलेले काशीविश्वेश्वर मंदिर जिर्णोद्धार व राममंदिर पुनर्निर्माण करण्याचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी भाजपाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करीत आहेत. सुशिलकुमार शिंदे व शरद पवार यांचे विचार अहिल्यादेवी होळकर यांच्या विरोधातील आहेत, असे मत आ. गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केले.

हत्तूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे भाजपाचे राम सातपुते यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. संस्कृती सातपुते, सुनिल बंडगर, अमोल कारंडे, किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष किसन भेगडे, माऊली हळणवर, अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर, शिरीष पाटील, औजचे शिलसिद्ध महाराज, राजेंद्र कुलकर्णी, सुजित खुर्द, जगन्नाथ गायकवाड, दीपाली व्हनमाने, श्रीमंत हक्के आदी उपस्थित होते. आ. पडळकर म्हणाले, भाजपाने अहिल्यादेवी होळकर यांचा सन्मान करण्यासाठी सोलापूर विद्यापीठाचे नामकरण, अयोध्येतील राम मंदिर परिसरात पुतळा उभारणी, अहमदनगरचे नामकरण अशा कार्यातून अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव केला आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांनुसार बहुजनांच्या कल्याणासाठी मोदी काम करीत आहेत म्हणून त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सातपुते यांना निवडून देण्याचे आवाहन आ. पडळकर यांनी केले.

### सोलापूरला पुर्नवैभव प्राप्त होईल

अप्पासाहेब पाटील म्हणाले की, काँग्रेसने तरूण व महिलांना फुकट पैसे देण्याऐवजी तरूणांच्या हाताला रोजगार मिळवून द्यावे. तरूणांना सोलापुरात रोजगार मिळाल्यास सोलापूरला पुर्नवैभव प्राप्त होण्यास मदत होणार आहे म्हणून तरूणांच्या रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणाऱ्या राम सातपुते यांना निवडून देण्याचे आवाहन केले.



## करकंब येथील न्यू इंग्लिश स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ५ मे-**

महाराष्ट्र परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत करकंब येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. वेदांत गुट्टे, वेदांत टेके, प्रथमेश देवकते, आरती राऊत, स्वरांजली देसाई, सायली जगताप हे विद्यार्थी शिषयवृत्तीस पात्र झाले. विद्यानिकेतन एंट्रन्स एक्झामध्ये वेदांत गुट्टे, साईराज मेहकर, रोहन गणेश राऊत, प्रथम ेश सतीश बोचरे, वेदांत बाळकृष्ण टेके, प्रथमेश देवकते, नीरंजन संजय शिंदे, अनेय महेश सरगुले, संस्कार संतोष कोरके, आदित्य मारुती नलवडे या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. गुणवंत विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे मार्गदर्शक अजिनाथ देवकते, अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर, पर्यवेक्षक शिंदे यांनी अभिनंदन केले.

## सांगोल्यात रोटरी क्लबतर्फे पाणपोई सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ मे-**



रोटरी क्लब सांगोल्याच्यावतीने नागरिकांसाठी महात्मा फुले चौक, नेहरू चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक अशा तीन ठिकाणी पाणपोई सुरू करण्यात आली. वाढलेल्या उन्हात थंड जारचे पाणी लोकांना मिळावे या उद्देशाने रोटरी क्लबने पाणपोई सुरू केली आहे. पाणपोई उद्घाटनासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. साजिकराव पाटील, सचिव ॲड. सचिन पाटकुलकर, दीपक चोथे, हमीदभाई शेख, मधुकर कांबळे, विकास देशपांडे, विलास बिले, विजय म्हेत्रे, श्रीपती आदलिंगे, डोंबे उपस्थित होते. रोटरी क्लबच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पंढरपुरात शिवबा काशीद यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ मे-**




नाभिक समाजाचे स्वाभिमान असलेले छत्रपती शिवाजी म हाराजांचे अतिविश्वासू अंगरक्षक पन्हाळ्याच्या वेढ्यातून छत्रपती शिवरायांना सुखरूप बाहेर काढणारे नाभिक समाजातील हिंदवी स्वराज्य भूषण शिवबा काशीद यांची जयंती आज पंढरपूर येथील शिवबा काशिद चौकात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. आ. समाधान अवताडे व माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या हस्ते मूर्तीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक नागेश भोसले, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष दीपक वाडदेकर, शिवसेनेचे नेते अनिल सावंत, समाजसेवक कीर्तीपाल सर्वगोड, नितीन कांबळे, समाजसेवक उत्तम चव्हाण, अभिराज उबाळे, सूर्यकांत शिंदे, दीपक सुरवसे, अनिल सप्ताळ, मारुती भोसले, सुमंगल नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन हरिभाऊ राऊत उपस्थित होते. हिंदवी स्वराज्य भूषण शिवबा काशीद यांच्या जयंतीच्या निमित्ताने शनिवारी ११ मे रोजी शिवस्वराज्यचे निष्ठावंत शिलेदार वीर शिवा काशीद ह्या विषयावर इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान होणार आहे अशी माहिती कार्यक्रम ाचे आयोजक सतीश चव्हाण यांनी दिली.

## ३३७ मतदान केंद्रांवर तीन हजार ७१० कर्मचारी

**सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे**

**चोख पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाचे मतदान मंगळवारी ७ मे रोजी होणार आहे. यासाठी ३३७ मतदान केंद्रांवर तीन हजार ७१० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने विविध माध्यमातून जनजागृती केली आहे. नव मतदार आणि महिलांनीही या लोकशाही उत्सवात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेऊन लोकशाहीला बळकट करण्यासाठी आपले मतदानाच्या अधिकाराचा वापर करावा, असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे. ५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख ५५ हजार १३८ मतदार आहेत. त्यापैकी एक लाख ८३ हजार २९२ पुरुष, एक लाख ७१ हजार ८२३ महिला व २३ इतर मतदार तसेच ५५५ सैनिक मतदारांचा समावेश आहे. मतदारसंघात ३३७ मतदान केंद्रे आहेत. मतदार संघात ३३७ मतदान केंद्रे असून त्यात आदर्श मतदान केंद्रांतर्गत महिला व्यवस्थापित दोन मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापित एक मतदान केंद्र आणि युवा कर्मचारी व्यवस्थापित दोन मतदान केंद्र ही मतदान केंद्र विशेष राहणार आहेत. मतदान प्रक्रिया पारदर्शकपणे व सुरळीत पार पाडण्यासाठी केंद्रावर पोलीस बंदोबस्तासह तीन हजार ७१० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदार संघातील १७३ मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. लोकशाही मजबूत बनविण्यासाठी आपण मतदान करणे गरजेचे आहे. मत आपला अधिकार आहे, तशीच आपली जबाबदारीदेखील आहे म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजवावा व जास्तीत-जास्त मतदारांनी मतदान करावे, असे आवाहनही सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

प्रत्येक मतदान केंद्रावर वाढती उन्हाची तीव्रता लक्षात घेता मतदारांना मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांना व्हील चेअर, मतदान केंद्रात रॅम्प, ओआरएस पाकिटे, वैद्यकीय सुविधा, हिरकणी कक्ष, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, स्वतंत्र प्रसाधनगृह, पुरेशी प्रकाश व्यवस्था आदीबाबी उपलब्ध राहणार आहेत. मतदारांना आपले मतदानाचे केंद्र, मतदार यादीतील क्रमांक याची माहिती सुलभरित्या उपलब्ध होण्यासाठी बीएलओमार्फत घरोघरी मतदार चिठ्ठ्या वाटप केल्या आहेत.

### स्वयंसेवकांची नियुक्ती

एकाच ठिकाणी पाच किंवा पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी मदतीसाठी स्वयंसेवक असणार आहेत. माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून नेम ण्यात येणार असून, मतदारांचे नाव कोणत्या मतदार यादीत आहे. त्यांचे मतदान केंद्र कोणते याची माहिती हे स्वयंसेवक देणार आहेत.